श्रीरामकृष्णस्त्रोत
स्वामी प्रभानंद

प्रकाशन क्र. सात
प्रकाशक. वि. कृ. जवळकर
' नवसाहित्य' प्रकाशन, समादेवी रस्ता, बेळगांव.
प्रथम आवृत्ती. पंचवीस आक्टोबर एकोणीसशे चौऱ्याहत्तर.
सर्वहक्क. स्वामी प्रभानंद,
श्रीरामकृष्ण आश्रम, कारवार.
मुद्रक. वा. द. हणमशेट
समर्थ मुद्रक, बेळगांव.
मुखपृष्ठ. अनंत सालकर; पुणे.
मूल्य.

सर्व धर्मसरिता ज्या स्त्रोतामधिं ओतिल्या
सर्वधर्मरुप रामकृष्णा नमितों तया ।।
काव्य नसे मज ठावें शब्दालंकार वा
परी वाटतें गावें या अपूर्व मानवा ।।
जात्यतीत जो असे नि गुणातीतही तसा
तोचि मात्र मानवा दिसेल जगीं देवसा ।।
देवा ऐशा गातों हा माझा दोष का ?
दोष जरी होई तो लवतों मम मस्तका ।।
क्षमा करा क्षमा करा कवि तुम्ही सज्जन
रामकृष्णस्त्रोतीं मज द्या करण्या मज्जन ।।

शुद्धिपत्र

(अर्थबोध होण्यास आवश्यक तेवढ्याच चुका येथे दाखविल्या आहेत. कानामात्रादींच्या किरकोळ चुका दाखविल्या नाहीत.)

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
13	16	सचला	संचला
26	15	त्यांचा	त्याचा
		सानंनें	सानंदें

सुधारेल.	सुधारेल-
कळवळन	कळवळून
हीणे	होणे
करीं	करि
जन्म व स्थिती-,	जन्म, स्थिती व
लयास	लयास
म्हणे,	म्हणे
मुखर्णि गेहीं	मुखर्जिगेहीं
(Chemicale)	(Chemical)
वावरणारे.	वावरणारे,
कल्याणावस्तच-	कल्याणास्तवच-
रंगतो	रंगतां
वतूंस्त	वस्तूंत
करात	करता
जगब्रह्मात्मैक्य	जग
ज्ञानानंतर	ब्रह्मात्मैक्यज्ञानानंतर
दृष्टासच	दृष्टीसच
युिक्युक्त	युक्तियुक्त
' मी च ब्रह्म आहे'	' मी ब्रह्म आहे'
श्लो. 12 पाहा	श्लो. 10 पाहा
असे अद्वैताविषयी उपहासात्मक	असे उपहासात्मक
श्रीराकृष्णांना	श्रीरामकृष्णांना
एकासांगून	एकामागून
नाचारिलें	नाचरिलें
मध्ये असे	मध्ये तू असे

टीपः पान 150, ओळ 10 मधील ' नाम ' याचा अर्थ विषयांचे चिन्तन- जे ' शब्दरुप ' असते व ' रुप ' याचा अर्थ चित् (ज्ञान) स्वरुप ब्रह्माला झाकळणारे पदार्थांचे ' आकार ' असा करावा.

ॐ ध्याननिष्ठं तपोनिष्ठं सत्यनिष्ठं निरन्तरम्
वैराग्यभास्करं वन्दे रामकृष्णं जगद्गुरुम् ।।

1

श्रीरामकृष्ण परमहंसांचे चरित्र म्हणजे जड व चैतन्य यांना जोडणारा दुवा होय. त्यांच्या जीवनातील घटनांचे आलोडन केल्यास आम्हांला त्यांचे शरीर प्रकृतीच्या जड द्रव्यापासून बनलेले आहे का तो शुद्ध चैतन्याचा जड प्राकृत रुपात होणारा केवळ आभास आहे हे सांगणे कठीण होते. त्यांच्यामध्ये व्यक्त होणारे भाव पाहिल्यास आम्हांला वाटते की प्रकृती आपल्या गुणांच्या सा-या मर्यादा ओलांडून चित्स्वरुप पुरुषाशी जवळीक करीत आहे; अथवा वाटते, निर्गुण निरवयव ब्रह्मच ' अघटितघटनापटीयसी ' मायेचा आश्रय करुन जडाशी लपंडाव खेळत आहे. श्रीरामकृष्ण चरित्र हे प्रकृती व पुरुष, जड व चैतन्य, यांच्यातील भेदाच्या अभावाचे दर्शन घडविणारा, अंतिम वेदान्ततत्त्वाचा साक्षात्कार करुन देणारा, एक अलौकिक इतिहासच होय. भगवान् श्रीकृष्ण जे गीतेत म्हणतातः

जन्म कर्म च मे दिव्यमेवं - यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ।।'

ते याच अर्थाने. भगवज्जन्म व भगवल्लीला हे मायेच्या दालनात पडणारे मायातीत तत्त्वाचे कवडसे होत. अवतारी पुरुषांचे शरीर हे असीम अशरीरी ब्रह्मतत्त्वालाही प्रतिबिंबित करणारे अजब दर्पण होय. अशा अवतारी पुरुषांच्या चरित्रगंगेत अवगाहन करणा-यांचा अज्ञानरुपी मल पार धुवून निघतो; त्यांचे दुःख, दैन्य. भय, परवशता ही सारी गळून अंती ते भगवत्स्वरुप होतात, असा शास्त्रांचा सिद्धांत आहे.

जेव्हा जेव्हा धर्माचा क्षय व अधर्माची वृद्धी होते, तेव्हा तेव्हा धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी, म्हणजेच जगात शांती, सुख, समाधान स्थापिण्यासाठी, जगकल्याण साधण्यासाठी, देव मानव रुपात अवतरतो अशी आपली श्रद्धा आहे.

अवतरण म्हणजे खाली येणे. शिडीच्या अगदी वरच्या पायरीवर चढलेल्या मनुष्याला उतरताना जसे वरच्या पायंड्यांवरुन खाली उतरुन यावे लागते तसेच अवतारी पुरुष देखील अति उच्च पातळीवर गेलेल्या माणसाच्या उदरीच जन्म घेऊन जगात येत असतो. हा पूर्णत्वास पोचलेला

पूर्णकाम, सिद्धपुरुष स्वतःसाठी काहीही मिळवावयाचे नसूनही, केवळ दीन, दुबळ्या, दुःखीजनांच्या कळवळ्यामुळे, त्यांच्या उद्धारासाठी, स्वेच्छेने जन्म घेत असतो. हा मायातीत असूनही मायाबंध स्वीकारतो.

धर्मा ये अवकळा तेधवां देव येई भूतळा
दावि दयाधन स्वयें आक्रमुनि धर्मपथा सोज्वला ।।
सुष्टां तारी दुष्टां मारी धर्म रक्षिण्याला
दीनांसाठीं लीन होउनी स्वीकारी तनुला ।।

2

श्रीरामकृष्ण सुद्धा असेच ' शुचीनां गेहे ' जन्मले. त्यांच्या पित्याचे नाव खुदीराम चतर्जी व मातेचे चंद्रामणी. त्यांचे दैवत श्रीरामचंद्रप्रभू असून त्यांनी आपले जीवित या दैवताला वाहिलेले होते. त्यांच्या या भक्तीमुळे प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांच्या कुशीत जन्म घेतला.

बंगालमधील देरेपूर ग्रामी ते राहात असत. त्यांच्या निःस्वार्थी व प्रेमळ स्वभावामुळे ते सा-या ग्रामस्थांचे जणू मायबापच बनले होते.

होतें नांदत वंगिं ब्रह्मयुगुल श्रीरामभक्तींत जें
रंगोनी भवतापपीडित जनां सेवीतसे आदरें ।।
ग्रामस्थां सकलां स्वकीय पितरांहूनी जरी वंद्य तें
लागे दैववशें तया त्यजुनि द्यावीं ग्रामगेहादिकें ।।

3

खुदीराम जरी एका सुखवस्तू घराण्यात जन्मले होते, सर्व परींनी दैव जरी त्यांना अनुकूल दिसत होते, तरी ते आपली चाळीशी ओलांडीत नाहीत तोच त्यांची दैवगती फिरली.

देरेपुरीं दुष्ट रामानंद राय । पीडी असहाय दीन जनां ।
प्रार्थी खुदिरामा साधण्या स्वकामा । साक्ष खोटी देण्या दुर्जन तो ।।
सत्यपरायण खुदिराम जाण । सांडूं म्हणे प्राण न परी सत्य ।।
उखडील माझा संसार तो दुष्ट । जरी त्याचें इष्ट न साधीं मी ।।
मजसी हें ठावें तरी न उपाय । राघवाचे पाय मज प्रीय ।।
सत्यासी सोडीतां राम दुरावेल । अनंत जन्मींचा पाठीराखा ।।
जळो ती दौलत असत्यें रक्षीली । रामा मी वाहीली चिंता माझी ।।
रामनाम हेंची माझें खरें धन । अर्पूनीही प्राण जपीन तें ।।

येर धन आम्हां भक्तां नसे ठावें । ठेवीलें राघवें तैसे राहूं ।।

4

आपण दुष्ट व कावेबाज रामानंदराय याचे ईप्सित न साधल्यास, त्याच्या बाजूने खोटी साक्ष न दिल्यास, आपल्याविरुद्ध काहीतरी कुभांड रचले जाईल, आपली वडिलोपार्जित व स्वकष्टार्जित जमीनही तो हिरावील, याची खुदीरामांस पूर्ण जाणीव होती. ते आता पेचात पडले. सत्य राखावे तर घर, जमीन या सर्वास मुकावे लागेल. बरे, रामानंदाची मर्जी सांभाळावी म्हटले तर आपले शील गमवावे लागेल; अशा संकटात ते सापडले.

अशा या संकटप्रसंगात खुदीराम सापडले असताना त्यांना आपल्या कुलदेवतेचे स्मरण न झाले तरच आश्चर्य !

ते आपल्या कुलदेवतेस श्रीशीतलादेवीस प्रार्थू लागलेः

सहृदय विनति तुला श्री शीतले दावि सुपथ मज या विपदांतुनि ।
मार्ग दिसत ना मजला माते घोर तिमिर जणुं दाटे ।
सत्यवचन जरि जाऊं बोलों अनिकेतन म्यां व्हावें ।
अनृत वचें मज तव पदकमलां लागे मात मुकावें ।

5

खुदीरामांनी खोटी साक्ष दिली नाही. त्यांना असत्यवचनाची कल्पनाच सहन होईना. शेवटी त्यांना या आपल्या सत्यनिष्ठेचे, शालीनतेचे, धार्मिकतेचे मोल आपल्या सा-या संपत्तीच्या त्यागानेच द्यावे लागले. अशाप्रकारे उघड्यावर टाकले गेलेले पापभीरु खुदीराम, आपण एवढ्या संयमाने व तपाने घडविलेल्या आपल्या चारित्र्याचे अधिकच जागरुकतेने जतन करु लागले.

देरेपुरात खुदीरामांची स्वतःची अशी टीचभर देखील जागा उरली नाही. आपल्या दोन कोवळ्या लेकरांसह सा-या हळहळणा-या ग्रामस्थांचा निरोप घेत घेत, हे दांपत्य केवळ लज्जारक्षणार्थ घेतलेल्या आपल्या वस्त्रांनिशी, गावाच्या वेशीबाहेर पडले. लोक कुजबूजू लागले, ' जणू रामसीताच वनवासास निघाले. ' कुजबूज बंद झाली. उसासे, निःश्वास व अधून मधून आयाबायांचे हुंदके ऐकू येत. लोकांच्या नेत्रातून झरणारे अश्रू जणू काही देवाची प्रार्थनाच करीत होतेः

चंद्रा अमुची माता खुदिराम पिता त्यांसी का हो नेतां दूरी देवा ? ।

खुदिराममूख पाहतां हो सूख निवे तानभूक त्यांच्या वचें ।
आम्हांसी संसारीं होते ते आधार त्यांसी सीमापार केलें तुम्ही ।
आम्हां पापीयांचें पाप त्यां भोवलें निष्पापा ताप हे ना तरी का ? ।
आम्हां आत्मीयत्वें त्यांनी देखियेलें हेंही न साहलें देवा तुम्हां ।
देवा आतां तरी करा उपकार सुखाने संसार त्यांचा चालो ।

6

देरेपूरचे घर गेले तरी खुदीराम अनिकेत झाले नाहीत व प्रभुरामचंद्राच्या कृपेने त्यांना अशनआच्छादनाची विवंचना पण फारशी राहिली नाही.

मुमुक्षूंनी मोक्षमार्गास उपकारक होईल एवढेच, शरीरनिर्वाहास अवश्य असेल तितकेच, धन जवळ बाळगावे; न पेक्षा ते अनर्थकारी होण्याचा संभव अधिक. " अर्थमनर्थं भावय नित्यम् " हा उपदेश साधकाने विसरता कामा नये. मानवी जीवनाचे उद्दिष्ट, मन वा इंद्रियांचे लाड पुरविणे हे नसून, अमृतत्व प्राप्त करुन घेणे हे आहे. हे अमरपद मिळविण्यासाठी, शरीरधारणेस अनावश्यक अशा भौतिक संपत्तीचा त्याग केलाच पाहिजे म्हणून खुदीरामांच्या ठायी संसाराविषयी पूर्ण औदासीन्य उपजावे याच हेतूने श्रीरामचंद्रांनी त्यांची पन्नास एकर जमीन व घर नेले आणि ख-या मुमुक्षूच्या उदरनिर्वाहास पुरेलसे साधन त्यांना उपलब्ध करुन दिले असावे.

रामानंदाने केलेल्या खोट्या फिर्यादीमुळे खुदीरामावर जो दारुण प्रसंग ओढवला त्याची वार्ता मेदिनीपुराहून जवळच असलेल्या, कामारपुकूर येथे राहाणा-या, सुखलाल गोस्वामी नामक खुदीरामाच्या एका मित्राच्या कानी आली. त्याने लगेच खुदीरामांस बोलावून आपल्या घराचा एक भाग राहण्यासाठी दिला व अत्यंत सुपीक अशी अर्धा एकर जमीनही त्यांना बहाल केली. अर्धा एकरच जमीन; पण ती खुदीरामांच्या विरागी जीवनातील सा-या गरजा भागविण्यास पुरेशी ठरली.

एकाएकी आलेले संकट आणि अनाहूतपणे झालेले संकट निवारण, यांमुळे खुदीरामांची श्रीरामभक्ती दुणावली. या काळीं -

कोणा एका काजास्तव खुदिराम पायिं गेले ।
निकटवर्ति खेड्यांत परततेवेळिं पथीं पहुडले ।।
श्रांत शरीरा तरुपल्लव शीतल घालिति अनिला ।

'राम राम' रव हलके हलके नीरव प्रेमिं विरला ।।
अधरावरला 'राम राम' रव हृदयीं जो विरला ।
साकारुनि तो खुदिरामांच्या स्वप्नीं अवतरला ।।
हरितगात्र सुकुमार बाळ श्रीराम म्लान वदन ।
म्हणे ' कितिक दिन स्थानिं असें या पडुनी अन्नाविन ।।'
' खुदिरामा मज ने तव गेहीं पुसे न कोणि मला ।'
देवदर्शनें तसेंहि वचनें भक्त हृदीं धाला ।।
परि अपुल्या दारिद्र्या, चिंतुनि कातर होई मनीं ।
म्हणतो, ' देवा, असें अकिंचन तुला कसा सेवुं मी ? ।।
' अपराध निरन्तर मम हस्तें घडतिल तुज सेवितां' ।
रघुवीर म्हणे, ' बाधती न तुज प्रमाद तव घडतां' ।।
खुदिरामहि श्रीरामप्रेमें स्वप्नीं गहिंवरले ।
दुवा देत देवासी स्फुंदत जोडुनि कर बैसले ।।
रघुवीरें दाविल्या जागिं जाउनि पाहती तों ।
शालिग्रामशीलेवरि पसरुनि फणा फणी रक्षितो ।।
उरिं धरण्या त्या लिंगा हर्षें भक्त करा घाली ।
ज्याची त्या अर्पुनी ठेव तैं निघे तिथुनि व्याली ।।

7

बाळ रघुवीराने स्वप्नात येऊन खुदीरामांस अंगुलीनिर्देशानेच आपण पडून असलेले स्थान दर्शविले आणि आपणास त्यांच्या घरी नेण्यास त्यांस विनविले. खुदीरामांस संकेतितस्थळी ' रघुवीर शालिग्राम' दिसला. एवढ्यात, स्वप्नी पाहिलेल्या त्या कांतिमान किशोराचे मलूल मुख त्यांस आठवले आणि कळवळून, ' रघुवीर रघुवीर ' असे आक्रंदीत आसवांच्या सरींनी त्या लिंगास त्यांनी न्हाऊ घातले.

अशा प्रकारे आपल्या प्रेमास प्रभुप्रीतीची साद मिळाल्याचे पाहून खुदीराम अधिकाधिकच श्रीरामभजनात रंगू लागले. आपल्यास रामकृपेने प्राप्त झालेल्या रघुवीरलिंगाची अत्यंत तन्मयतेने ते पूजा करु लागले. त्यांच्यामध्ये व्यक्त होणारे भाव पाहून सारे लोक त्यांना गुरुस्थानी मानीत. देवतुल्य समजत. नतमस्तक झाल्याविना सहसा कोणीही त्यांच्यासमोर येऊ धजत ना.

प्रभुकृपा खुदीरामांच्या घरी आली ती दारिद्र्याचे वाहन करुन ! त्यामुळे नैवेद्यासाठी मूठभर धान्य मिळणेसुद्धा त्यांना कधी कधी दुरापास्त होई. अशा प्रसंगी चंद्रामणी त्रस्त होत असे. पण श्रीरामाच्या सा-या खोड्या ठाऊक असलेले खुदीराम रामावरच सारी भिस्त टाकून निःशंक राहात. ऐन वेळी कुठून तरी मदत येऊन प्रसंग टळे.

खुदीरामांची भक्ती अनन्यसाधारण होती.

खुदिराम भक्त थोर । नित्य पूजी रघुवीर ।
अर्चनी आरक्त ऊर । आणि वक्त्र तयाचे ।।
' नसे मूठभरहि धान्य । नैवेद्यासी कुठले अन्न ? '
पुसी चंद्रादेवी दीन । पतिसी परी शांत तो ।।
निवेदुनी सर्व काम । रामापायी हो निष्काम ।
ऐसा तो खुदीराम । चंद्रामणीसी म्हणे ।।
' करु वाटे उपवास । आज जरी राघवास ।
तरी वर्ज्यू भोजनास । आम्ही उभयता तशी ' ।।
वदता ऐसे खुदिरामे । गृहकार्यी गृहिणी रमे ।
भार घेतला रामे । स्वये तयांचा शिरी ।।
राम संकटे आणितो । पुनः तोची निवारितो ।
असे नित्य जो पाहतो । देही असुनी मुक्त तो ।।

8

खुदीराम कोणत्या श्रेणीतील भक्त होते याची जाणीव करुन देणारी त्यांच्या जीवनातील एक घटना उल्लेखनीय वाटते.

कामारपूकूराहून चाळीस मैलांवर असलेल्या मेदिनीपूर या गावी खुदीरामांची बहीण व भाचा राहात असत. ब-याच दिवसात त्यांच्याकडून पत्र वगैरे नसल्याने खुदीराम त्यांना भेटण्यास निघाले.

मेदिनीपुरा बहुत दिनांनी भाच्याते भेटण्या
तसेच अपुल्या आवडत्या भगिनीसीही पाहण्या ।
कामारपुकूराहुनि निघती पायी खुदिराम
वीस क्रोशिंच्या पये गाठण्या भगिनीचे धाम ।।
श्रीरामाचे ध्यान हृदी नी अधरि वसे नाम
रामप्रेमे धुंद स्वकाजा विसरति खुदिराम ।।

अष्टक्रोश पथ तुडवुनि गेले परि न भान त्याचे
नवपल्लव त्या दिसति तेधवा बिल्वतरुवरचे ।।
श्रीरामी जे लीन जाहले होते खुदिराम
देखुनि बिल्वदले प्रेमभरे घेति शंभुनाम ।।
रामचंद्र जणुं शिवा पूजिण्या हरित बिल्वपत्रे
अधिर मनी खुदीराम स्वधामी येती मोदभरे ।।

9

मार्गात केवळ कोवळी बेलाची पाने दिसताच बहिणीकडे जाण्याचे विसरुन, बत्तीस मैल कराव्या लागणाऱ्या प्रवासाचे मुळीच भान न ठेवता एवढ्या उतावीळपणे शिवपूजेस घरी परतणाऱ्या खुदीरामाची ईश्वरभक्ती कोणत्या कोटीतील होती, याची कल्पनाच करावी. नवविधाभक्तीतील शेवटची पायरी म्हणून जी गौरविली जाते ती आत्मनिवेदन भक्ती हीच नव्हे का ? खुदीरामांचे सारे कामच रामार्पण झाले होते. ' राम' हाच त्यांचा एकमेव काम झाला होता. म्हणूनच ते पूर्णकाम होते.

प्रभुसेवेत अशा प्रकारे आपले जीवन व्यतीत करीत असता भक्तांचा कनवाळू भगवान् खुदीरामांच्या निष्काम भक्तीस भाळला व एके समयी आपल्या पितरांस पिंडदान करण्यासाठी गयेस गेलेल्या खुदीरामांस त्याने स्वप्नात दर्शन दिले.

त्रिगुणांच्या रज्जुनी बांधुनी मायाचक्रावरी
फिरवी सकला तो प्रभु वांछी भक्ताची चाकरी ।।
खुदिरामाच्या भावा अंकित होई गयेचा पति
स्वप्नी अपुले रुप चतुर्भुज कांतियुक्त दर्शवी ।।
पिण्डप्रदाने संतुष्ट तशा पितरांच्या पंक्ती
उभ्या दुतर्फा मधे शोभतो सिंहासनि यदुपती ।।
स्नेहल स्वरे म्हणे गदाधर अपुल्या भक्ताप्रति
होउनि सुत तव उदरी येइन प्रिय मज तव संगति ।।

10

स्वप्नात, सिंहासनस्थ गदाधराचे व त्याच्या सेवेत असलेल्या आपल्या पितरांचे दर्शन होताच खुदीरामांचे सारे सात्त्विक भाव उचंबळून आले. पितरांचे आशिर्वाद व देवाने आपला पुत्र होऊन येणार म्हणून दिलेले

अभिवचन यांच्या आनंदात खुदीराम पूर्ण विरघळूनच गेले असते.... पण त्यांना आपले दारिद्र्य आठवले. " हा लक्ष्मीपती माझ्या घरी येणार ! त्याची सेवा मी कशी करु ? " या भीतीने, या विषादाने त्यांना सावरुन धरले. ते कळवळून म्हणतात.

अनाथांचा तू अससी नाथ शरण तुज आलो मी यदुनाथ ।।
दीन अकिंचन अबल असे मी तूहि तिन्ही भुवनांचा स्वामी
अनंत मम तव पदि प्रणिपात ।।
' अक्षम त्रिपादभूमी देण्या अर्पी मस्तक तुज बलिराणा
तो तू येसी मम गेहात ।।
ज्याचे पद श्री सदा सेविते अखिल अवनि ज्या भावे पुजिते
तया कसा मी सेवू तात ।।

11

सजीव शरीरात येणाऱ्या भगवंताची सेवा आपण आपल्या अशा या ओढग्रस्त परिस्थितीत कसे करु शकणार ही काळीज खाणारी काळजी आणि त्याचबरोबर देव आपला पुत्र होणार या कल्पनेने झालेला त्यांचे स्वत्त्वही हिरावून नेऊ पाहाणारा आनंद, या परस्पर विरुद्ध भावनांच्या आघातांनी जाग आणलेले खुदीराम आपल्या स्वप्नाविषयी विचार करु लागले. देवस्वप्न कधीही खोटे ठरणार नाही अशी त्यांच्या श्रद्धाळू मनाने त्यांस ग्वाही दिली. ते आता गावी परतण्यास अधीर झाले.

थोड्याच अवधीत खुदीरामांनी गयेच्या गदाधराचा निरोप घेतला. ते कामारपुकूरास निघाले. प्रेम व कृतज्ञता यांचे पंख करुन भगवच्चिंतनात विहरणाऱ्या त्यांच्या मनाला देहाचे भान राहिले नाही. अर्धबाह्य मनःस्थितीतच आनंदाच्या लहरीवर जणू तरंगत तरंगत ते कामारपुकूरी येऊन थबकले.

खुदीराम गयेला गेले असता त्यांच्या पत्नीस पण एक अद्‌भुत अनुभव आला. एके दिवशी ती धनीलोहारिणी समवेत आपल्या घरासमोरील शिवमंदिराकडे पाहात उभी असताना एक विलक्षण घटना घडली.

धन्य धन्य ती चंद्रमणी खुदिराम धर्मपत्नी
शिवासी शिवमंदिरि नमुनी पाहते प्रणयपूर्णनयनी
दाटती तेजोमय रश्मी तेधवा शिवलिंगामधुनी

शिरति ते स्वाङ्गी हे देखुनी निपचिता होई चंद्रामणी
कातर होउनी मनी धनी तिज प्रेमे गोंजारुनी
अनिला सहचारिणी घालिते जागे चंद्रामणी ।।
वायु वाटे उदरी भरला मोद उरी संचला
' शिवचि ', म्हणे ती, ' शरीरी शिरला' अपुल्या सहचरिला ।।

12

चंद्रामणीला आता असे अनेक अनुभव येऊ लागले. गयेहून खुदीराम परतताच तिने त्यांना शिवलिंगातून आलेल्या प्रकाशाचा झोत कसा आपल्या उदरी शिरला, त्यावेळेपासून गर्भार असल्याचे आपल्याला कसे भासू लागले, या साऱ्या गोष्टी सांगितल्या.

खुदीरामांना आपल्याला गयेस पडलेले स्वप्न थोड्याच अवधीत साकारणार याचा आता तिळमात्र संशय राहिला नाही.
आपल्या प्रिय पत्नीस त्यांनी या दृष्टांताविषयी सांगितले; पण त्याचबरोबर या साऱ्या गोष्टी अत्यंत गोपनीय असल्यामुळे, त्यांची वाच्यता इतरांशी न करण्यासही तिला त्यांनी बजावले.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. आपण गर्भवती असल्याची चंद्रादेवीची मनोमन खात्री झाली. अनेक देवदेवतांची तिला आता दर्शने घडू लागली. या देवतांच्या अंगाचा सुगंध तिच्या खोलीत दरवळत असे. हे देव तिच्याशी प्रत्यक्ष बोलत आणि चंद्रामणीस सुद्धा आजवर अननुभूत असे त्यांच्याविषयी वात्सल्य वाटे. क्रमाक्रमाने हा वात्सल्य भाव वाढू लागला व आपल्या साऱ्या नैसर्गिक सीमा उल्लंघून अखिल भूतमात्रांवर प्रेमाची खैरात करु लागला. तिच्या उदरीच्या गर्भाच्या स्पर्शाचाच हा प्रभाव नव्हे का?

शिवमंदिरातील तो दैवी अनुभव घेतल्याला चंद्रेस आज पुरे नऊ महिने होऊन गेले आणि-

फाल्गुन शुद्ध द्वितीयेसी । प्रसवे चंद्रा बालकासी ।
दिव्य तयाच्या तेजासी । बघुनी जन लुब्ध ते ।।
वाद्ये ग्रामी निनादती । मधुर गीते विहग गाती ।
जनमनेहि आल्हादती । डोलती तरुवर मुदे ।।
चंद्रागेही आनंद भरे । दाहि दिशातुनि तो पसरे ।
स्थिरचराते व्यापुनि उरे । जणु ब्रह्म अद्वय ।।

13

आपल्या नवप्रसूत अर्भकास पाहून चंद्रा म्हणते,

प्रभु आले माझ्या घरी,
दिशांदिशातुनि दिव्य उफाळति आनंदाच्या सरी ।
हृदयतडागी चरणकमल ते प्रेमगंध जणु उधळु लागती
त्यांसी पाहता क्षुद्र वाटते, मजसी इन्द्रपुरी ।।
त्रिलोकेश मायेचे लेणे लेउनि आले दीन होउनी
पावन करण्या दासिस अपुल्या क्रीडति अवनिवरी ।।

14

शिशुदर्शनाच्या आनंदाचे पान करीत करीत बेहोष झालेली चंद्रा अंथरुणावर लवंडली. किंचित् कालाने उठून पाहते तों बाळ जाग्यावर नाही. ती म्हणते,

' बाळ माझे गेले कोठे । पहावे ते गूढ वाटे ।
कोणीही येथें दिसेना । गूढ मज उकलेना ।'
ऐसे म्हणोनी ती माय । मनी बहू कष्टी होय ।
परी परीसा कौतूक । बाळ फासोनीया राख ।
किंचिदन्तरी चुलीत । दिसे शिवासम शान्त ।
देव आपुली आपण । देई माते ओळखण ।
भस्मलिप्त हा ईशान' । स्मरुनी दृष्टान्ता म्हणे ।

15

चंद्रादेवीला आपल्या नवजात अर्भकास चुलीत पाहून अचंबा वाटला; पण लगेच तिला शिवमंदिरातील दृष्टांत आठवला 'हा भस्मभूषित शंकरच मला आपली ओळख पटवून देऊ इच्छीत नसेल ना? ' हा विचार तिच्या श्रद्धाळू मनास चटकन् चाटून गेला; आणि त्याबरोबरच तिच्या मायाभरल्या नेत्रातून कृतज्ञतेचे आंसू टपकू लागले. आदरयुक्त प्रेमाने तिने बाळास जवळ घेतले व त्याच्या अंगास लागलेली राख हलक्यानेच पुसून काढली.

धरुनी वपु हर भजतो चंद्रामणिच्या विशुद्ध उदरातें ।
तापत्रयभयतप्तां दीनजनां ज्ञानवारि देण्यातें ।।
आचरुनी नव नवले दावी शंभू स्वकीय मायेतें ।

होई त्रस्तहि जननी नेणुनि हरिच्या अगम्य लीलेतें ।।

16

चंद्रेच्या उदरी शिरणारे शिवलिंगातील किरण आणि गयेस गेले असता खुदिरामांना विष्णूने दिलेले वचन, आज ज्या अर्भकाच्या रुपाने साकारले ते एकच एक भगवत्तत्त्व नव्हे का? शिव व विष्णू, हर व हरि यांतील अभेदाचा हा जिवंत दाखला नव्हे का?

गयेतील दृष्टान्तानंतर जन्मलेल्या या अर्भकाला गयेच्या विष्णूचे ' गदाधर ' हेच नाव ठेवण्यात आले. बाळास लडिवाळपणे गदाई असेही संबोधीत.

अवतारी पुरुषांच्या ठायी जन्मापासूनच अलौकिक ज्ञान, असामान्य वैराग्य व असाधारण योगबल दिसून येते. कारण जे आपल्या पूर्वजन्मीच पूर्णत्त्वास पावलेले असतात तेच, ' बहुजनहिताय बहुजनसुखाय' पुनः या जगी जन्म घेत असतात. अशांनाच आम्ही अवतार मानीत असतो. गदाईच्या अंगीदेखील अशा योगसिद्धी दिसून येत.

घेतां कडे तो लघुकाय होई । गुर्वी तनू दावि कधीं गदाई ।।
शय्येमध्ये गोंडस बाळ झोपे । तेथें दिसे वृद्ध नि वत्स लोपे ।।

17

गदाईला उचलून घेता चंद्रेस कधी वाटे, " किती हलकं मूल ! फुलाला देखील वजन अधिक असावं ! ' कधी तो एवढा जड होई की त्याला उचलणेच अशक्य वाटे. कधी बाळाला झोपविल्या जागी एखादा धिप्पाड पुरुष दिसायचा व बाळ अदृश्य व्हायचा.

या साऱ्या गोष्टींमुळे साहजिकच चंद्रा गांगरुन जावयाची. ' काही भुताटकी तर नसेल ना ! ' तिला वाटायचे. पण खुदीराम तिचे सांत्वन करीत.

ज्या आध्यात्मिक अवस्था प्राप्त करुन घेण्यास साधकास दीर्घ कालपर्यंत आदरयुक्त अंतःकरणाने अविरत योगाभ्यास करावा लागतो त्या गदाधराला सहजच प्राप्त होत्या. एके समयी सहा वर्षांचा तो शिशु शाळेस

जात असता केवळ सृष्टिसौंदर्य पाहून समाधिमग्न झाला !

ज्येष्ठ मासिंच्या रम्य प्रभातीं शेतांतुनि जात
होता बाळ गदाधर घेउनि कुरमुरि हातांत ।।
काळ्याभोर उषेच्या माथीं मेघपंक्ति पाहुनी

त्यांतचि धवल खगांची माला लुकलुकती देखुनी ।।
गदाधराचें भान हरपलें समाधि त्या लागली
श्वेतमाल्यधारी कृष्णाची स्मृति त्यासी जाहली ।।

18

गदाईची समाधी ही मूर्च्छा, तंद्रादीसारखी मानसिक किंवा शारीरिक विकृतीमुळे वा दुर्बलतेमुळे आलेली अवस्था नव्हती. कारण या समाधीच्या पूर्वी अथवा नंतर त्याची प्रकृती निकोप व सुदृढ असल्याचे दिसून आले होते. त्या प्रसंगी गदाधर स्वतः म्हणाला होता, ' मला आलेली मूर्च्छा रोगाची नव्हती, तर त्या स्थितीत मला अत्यंत आनंदाचा अनुभव येत होता. ' त्याच्या ठायी मनाचा कमकुवतपणा तर नव्हताच. त्याची स्मरणशक्ती अत्यंत दांडगी, निश्चयदार्ढ्य वाखाणण्यासारखे; विवेक तर प्रौढांच्या ठिकाणीही कौतुकास्पद ठरेल असा होता. त्याला पटेल तेच तो करावयाचा आणि ते रास्तही ठरावयाचे. दरडावून किंवा रागावून त्याच्या मनाविरुद्ध कोणीही काही त्याच्याकडून करुन घेऊ शकत नसे.

साधारणपणे प्रचलित धर्मरुढींविषयी गदाईस आदर होता; पण त्याहून तो ईश्वरभक्तीला, सत्यनिष्ठेला, निष्काम प्रेमाला अधिक मानी.

नऊ वर्षांचा होताच गदाईची मुंज करण्यात आली. यापूर्वीच सरळ, प्रेमळ स्वभावाच्या धनी नामक शूद्र स्त्रीने, 'उपनयनानंतर प्रथम भिक्षा तू माझ्याकडूनच घेतली पाहिजेस,' म्हणून अत्यंत जिव्हाळ्याची विनवणी गदाईस केली होती. जरी हे प्रचलित धर्मरुढीच्या विरुद्ध होते तरी गदाईने तिच्या विनंतीस रुकार दिला होता. म्हणून मौंजीबंधन उरकताच धनीकडूनच आपण भिक्षा घेणार. असा गदाईने हट्ट धरला. ज्येष्ठ मंडळींनी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ. ' मी वचन दिले आहे. वचन मोडणा-याला, असत्य बोलणा-याला यज्ञोपवीत धारण करण्याचा हक्कच कुठे ? ' तो विचारु लागला. मंडळी निरुत्तर झाली. भिक्षामातेचा मान धनीसच मिळाला. कृतकृत्य झाल्याच्या आनंदात ती गदाईस म्हणते.-

' नाहिं रुढि मानिली । लोकरीति सांडिली
शैशवींहि त्वां जनांसि । सत्यभक्ति दाविली ।।
जेथ प्रेम दिसतसे । तेथ देव वसतसे

जाति अंधतेसि स्थान । प्रेमिं कदापि नसे ।।
हेंचि सत्य शिकविण्या । विश्वधर्म स्थापिण्या
ब्रह्मपुत्र असुनि माय । शूद्रा स्वीकारिली ।।
धनी धन्य जाहली । होइ देव-माउली
क्षुद्र शूद्र अङ्गनेचि । आस शिवें पुरविली ।।

19

गदाईच्या जननापूर्वी चंद्रमणीस झालेले सारे देवदृष्टांत धनीस ज्ञात होते. म्हणूनच तर तिची गदाईच्या ठायी अपार श्रद्धा, अलोट भक्ति होती. प्रभु शंकरच गदाईच्या रुपात अवतरला आहे. असा तिचा दृढ विश्वास होता.

गदाधर केवळ धर्मरुढींहून ख-या धार्मिकतेस, निष्काम भक्तीस अधिक आदरीत असे; कारण तो स्वतः उच्चकोटीतील भक्त होता. त्या किशोर वयात देखील देवगीते गाता गाता त्याचे देहभान हरपे. तो भावसमाधीत जाई.

एकदा, कामारपुकूरातील काही स्त्रियांनी आणूर येथील विशालाक्षी देवीच्या दर्शनास जाण्याचे ठरविले. गदाईने आपणही येणार म्हणून हट्ट धरला.

आणुर ग्रामीं विशालाक्षि देवीच्या भेटीला
गदाधरासमवेत निघाल्या पायिं कांहीं महिला ।।
एक क्रोशिंचा पथ आक्रमितां गावें देवीसी
म्हणुनि प्रथिंती सकल अङ्गना बाल गदाईसी ।।
स्मरुनि अन्तरीं गाइ गदाई गोड स्वरीं गाणीं
आळवितां देविस भक्तिभरें भावविवश होई ।।
नीर नयनिं दाटे तनु पुलके होई श्वास रुद्ध
अवलोकुनि त्या दृश्या सा-या अबला हतबुद्ध ।।
कोणि म्हणे बाळातें ककर्श भानुकरें ताडिलें
वाटे कोणा भूतपिशाचें असेल वा बाधिलें ।।
नीर नयनिं सिञ्चिती घालिती वारा त्या अबला
परी कशी ती शुद्ध न येई बाळ गदाईला ।।
वृद्ध जाणती होति तयामधिं साध्वि एक महिला
तिने देविचा मंत्र शिशूच्या कर्णीं उच्चारिला ।।

नवल तेधवां अगा वर्तलें शुद्ध आली बाळा
दुवा देति त्या सकल अंगना हर्षें देवीला ।।

20

असाच आणखी एक प्रसंग. तो होता शिवरात्रीचा दिवस-

शिवरात्रींच्या मंगल दिनीं । जागण्या रात्रीं शिवचिंतनीं
कामारपूकूर ग्रामस्थांनी । नाटक करणें योजिलें ।।
त्या प्रयोगीं शिवाचें पात्र । घेण्या न दिसे सत्पात्र
एका गदाईविणें मात्र । कामारपुकूरीं तेधवां ।।
सारे प्रार्थिती गदाईसी । तूंचि एकटा समर्थ होसी
टाळण्या या संकटासी । शिवपात्रासी स्वीकारुनी ।।
गदाई जो स्वयें शंकर । आला घेओनी अवतार
तयासी नेतां रंगभूवर । शिववेशा लेववुनी ।।
गदाधर नी उमावर । यांतील लोपलें अंतर
दिसे तैं रंगभूमीवर । साक्षात् हर भाविकां ।।

21

शिवाच्या वेषात गदाईस सजविल्यावर तो प्रत्यक्ष शंकरच भासू लागला.

आशुतोष जो वेष घेउनी आला अवनीवरी
मानवि तनुतें धारण करुनी विहरतसे भूवरी ।।
त्यास लेववुनि वेष शंभुचा नाट्यमंदिरांत
होई आणितां मनहि तयाचें मग्न समाधींत ।।
लाट विरतसे जेविं सिंधुच्या फिरुनी पाण्यांत
तेंवि वृत्तिही गदाईची हो लीन असीमांत ।।
अवलोकुनि त्या शिशुगण सगळे अचल शंकरातें
धावा करिती ' शंकर शंकर ' जागविण्या त्यातें ।।

22

शिवाचे पात्र वठविणाऱ्या एखाद्या नटाला आपण मनुष्य असून, केवळ शंकराचा वेष आपण घेतलेला आहे, अशी सतत जाणीव असते. पण इथली परिस्थिती अगदी वेगळी होती. येथे जो प्रत्यक्ष शंकरच गदाधराचा वेष घेऊन जगात आलेला, त्याला आपल्या खऱ्या स्वरुपात -

सच्चिदानंदरुपात- राहण्याची संधी मिळाली होती. तेथे कोणताही अभिनय करण्याचा, इतर कोणते पात्र वठविण्याचा प्रसंगच नव्हता. त्यामुळे गदाईस त्याच्या नैसर्गिक, अकृत्रिम अवस्थेतून कृत्रिम जीवस्थितीत आणणे साहजिकच दुष्कर झाले. रंगभूमीवरील मुले घाबरली, गांगरली. ती शिवास प्रार्थू लागली.

' जय शिव शंकर उमावरा जागवि बाळा गदाधरा ।।
सुरसरिताधर महेश्वरा सचेत करि या गदाधरा ।।
शंकर शंकर शंभो शिव हर करुणाकर प्रभु दातारा ।।
नटनप्रिय हे नटेश्वरा नाट्यिं येउं दे गदाधरा ।।'

23

एखाद्या क्षुल्लक कारणाने देखील गदाधराचा दिव्यभाव- त्याची आपल्या दिव्यत्त्वाची, सच्चिदानंदरुपत्त्वाची जाणीव-प्रबल होई आणि तो प्रकृतीचे सारे बंध तोडून त्रिगुणातीत चैतन्यात विलीन होई. त्याच्या या अवस्था भावनावशतेमुळे येणाऱ्या नव्हत्या. त्या भावनातीत तत्त्वाच्या, आत्मतत्त्वाच्या, दर्शनाने घडणाऱ्या होत्या; कारण भावनांना आळा घालणारा विवेक त्याच्या ठायी सदैव जागृत होता.

अगदी शैशवावस्थेपासून प्रत्येक गोष्ट गदाधर आपल्या विवेकाच्या निकषावर घासून पाही, व मग ती स्वीकारी वा करी. केवळ लोक सांगतात म्हणून ती तो मानीत नसे. त्याच्या बालपणातील एक घटनाः

स्नाना जाती ज्या घाटावर महिला तेथें जाइ गदाधर
घेउनि संगें किशोर सहचर सुहृदांसह क्रीडि तो ।।
तुषार बालक परस्परांवर उडविति ते पडती नारींवर
क्रोध स्त्रियांचा होइ अनावर पिटाळिती पोरांना ।।
स्नानीं असता स्त्रियां पाहणे पुरुषां अनुचित लाजिरवाणे
लागे का हे तुम्हा सांगणें? 'म्हणती त्यां अङ्गना ।।
चार दिनांनी स्त्रियां भेटतो भेटुनि त्यांसी गदाई म्हणतो
प्रत्यहिं मी तुम्हासि पाहतों स्नान करित असतां ।।
तरुवरुनी मी तुम्हा पाहिलें चार दिन परी काहिं न झालें
पाहतां तुम्हा काय लागले दोष मजसि सांगा ।।

24

एकदा कामारपुकूर येथील धर्मदास लाहा यांच्या घरी काही ख्यातनाम पंडितांची तत्त्वज्ञानांतील एका कूट प्रश्नावर चर्चा चालली होती. कोणालाच समाधानकारक उत्तर देता येईना. ही चर्चा ऐकत जवळच उभ्या असलेल्या गदाईने आदरयुक्त स्वरात लीलेनेच या प्रश्नाचे उत्तर सुचविले. शंकेचे निरसन झाले.

इवल्याशा पोराकडून आलेले हे उत्तर ऐकून पंडित दचकले, चमकले. वामनाला तीन पावले टाकताना पाहून बली दचकला तसे.

गदाईने दिलेल्या उत्तराची वार्ता गावात पसरली. गावकरी गदाईस कौतुकाने म्हणतात

' शुद्धसत्त्वघटित काय गदाई तुझी न काय
पंडितांहि अप्रमेय तत्त्व प्रकटिलें तुवां ।।
धर्मदासभुवनिं वाद पंडितवर्यांत होत
असतां त्यां करिसि चकित उचित उत्तरें ।।
ज्ञानमूर्ति तूं असशी भक्ति जगीं जागविसी
कर्ममार्गही दाविसि शैशवीं जनां ।।'

25

सा-या दृश्य जगतास, देहमनादिकांसही विवेकाग्नीत विसर्जून चिन्मयरुपी लीन होणारा हा श्रेष्ठ ज्ञानयोगी, सगुण भजने गाता गाता भावाविष्ट होणारा हा अद्वितीय भक्त, तसेच केवळ लोकसेवा व लोकरंजन यासाठीच जगणारा, कोणतीही स्वार्थपर भावना न बाळगणारा, एवढेच काय, ' ती पोटभरु विद्या कशाला हवी ? ' म्हणून शालेय शिक्षणात रस न घेणारा अभूतपूर्व कर्मयोगी असा हा बटु मानव का देव मानावा ?

गदाईस शालेय शिक्षणाची विशेषतः गणिताची तीव्र नावड होती.

अर्थकरी विद्येची अरुची । तीव्र अनास्था संसाराची ।
अलौकिक जरी मेधा त्याची । गणितीं न गती गदाधराची ।।
रामायण भागवत मुखोद्गत । पुराणिकांच्या कथा कंठिं स्थित।
एकवार जरि होती त्या श्रुत । वदुनि पाठ करि श्रोत्यां विस्मित ।।
लोभस रुप नि कंठ मनोहर । स्वर्णछटा झळके गात्रांचर ।
करितो नकला गोड गदाधर । लुब्ध देखितां त्या नारीनर ।।
रम्य अभिनयें रिझवितो जनां । गंधर्वोपम गाई गाना ।

किशोरकालिंहि अनुपम प्रतिमा । करि देवांच्या गदाई नाना ।।
साधूंवरि करि प्रेम विलक्षण । बुद्धि तयाची असे विचक्षण ।
निःसारित जे संतमुखांतुन । टिपे आदरें बाल्यिं ज्ञानकण ।।
परविद्येचा गौरव करण्या । अपरा विद्या गौण ठरविण्या ।
विद्यार्थ्या अर्थार्थि न होण्या । जणु ये शंभू स्वये शिकविण्या ।।

26

जनमनरंजन आणि लोकशिक्षापन हे जणू गदाईच्या जीवनाचे सूत्रच बनले होते. अनेक देवदेवतांच्या मूर्तिही तो घडवी. या कलेतील त्याचे कसबही अजब होते. त्याला या देवदेवतांचे प्रत्यक्ष दृष्टांत होत आणि आपल्या दिव्य दृष्टीस दिसलेल्या या अमरांचे चित्रण तो आपण घडविलेल्या मूर्तीत करी.

गदाधराचा साधुसंन्याशांकडे विशेष ओढा होता. जगन्नाथपुरीस जाणारे त्या काळचे यात्रेकरु कामारपुकूरमार्गे जात व लाहाबाबूंनी बांधलेल्या तेथल्या धर्मशाळेत उतरत असत. या विरागी सर्वसंगपरित्यागी साधूंची सेवा करणे, त्यांच्या उपदेशाचे आकंठ पान करणे हा त्याचा बालपणीचा छंद.

आपण पाहिलेल्या नाट्यातील विविध पात्रांची भाषणे गदाई साभिनय करुन दाखवी. एकदाच ऐकलेली गाणी किंवा काही भाषणे देखील त्याला मुखोद्गत झाल्याचे दिसून येई. एवढे असूनसुद्धा रोजच्या उजळणीतील पाढे पाठ करणे त्याला अवघड वाटे. त्याचे रम्य अभिनय, पुराणिकांच्या नकला वगैरे पाहून लोक म्हणत-

' अजब तुझी ती स्मरणशक्ति तूं अजब कलावंत
नर्तन नकला मोहविति जनां तसें नाट्यगीत ।।
देवद्विजगुरु प्राज्ञांसी तू भावभरें पूजिलें
माता साधू यतिजनांसिही सानंदें सेविलें ।।
कधिं गंभीर नि कधीं खेळकर तुझे भाव भासती
विरोध सारे तुझ्यांत विरती अनलिं जेंवि आहुती ।।

27

खऱ्या धार्मिकतेस आणि लोकोन्नतीस पोषक अशाच जनरुढींना मानणाऱ्या गदाधराचा, पोकळ दिमाखासाठी वा आत्मगौरवासाठी पाळण्यात

येणा-या लोकरिवांजावर कटाक्ष होता.

कामारपुकूरात त्यावेळी पडदानशीन चालीचे कट्टे अभिमानी असे दुर्गादास पाइन नामक एक गृहस्थ राहात असत. ' आमच्या अंतःपुरात कोणाच पुरुषाचा शिरकाव होऊ शकत नाही; आमच्या स्त्रियांना कधी कोणी परपुरुषाने पाहिले नाही,' असे ते मोठ्या आढ्यतेने सांगत. हे ऐकून गदाधराने, ' मी तुमच्या अन्तर्गृहात प्रवेश करीन, ' असे त्यांस आव्हान करुन सांगितले होते.

एके दिवशी संध्यासमयी गदाधराने स्त्रीवेष घेऊन दुर्गादासांच्या अंतःपुरात प्रवेश मिळविला.तो सा-या बायकांत मिसळला. घरभर फिरला; आणि शेवटी बराच वेळपर्यंत घरी न आल्यामुळे जेव्हा गदाईचा थोरला बंधू रामेश्वर याने, ' गदाई गदाई' म्हणून दुर्गादासांच्या घराबाहेरुन हाका मारल्या, तेव्हा गदाईने आतूनच ' ओ ' दिली. गौप्यस्फोट झाला. दुर्गादास प्रथम रागावले. पण गदाईची गोड वागणूक, मोकळा निरागस स्वभाव, सात्त्विक खेळकर वृत्ती, यांनी त्यांच्या क्रोधावर मात केली - नव्हे ; क्रोधाचे आता आदरात रुपान्तर झाले. गदाईस ते उभयलिंगातीत मानू लागले. कामगंधहीन अशा या दिव्य व्यक्तीच्या ठायी स्त्री वा पुरुष असा भेदच उरु शकत नाही, असे त्यांचे मत झाले.

ही गोष्ट गावभर पसरली व सा-या गावक-यांच्या कौतुकाचा विषय होऊन बसली. त्याच्यामधील जे सूज्ञ व गुणग्राही होते ते गदाईस म्हणू लागले-

बहुरुपधरा हे गदाधरा । पाइनबाबुच्या गर्वहरा ।
लिंगभेद हे असती जीवा न गुणातीता परात्परा ।।
क्षणांत नर तू क्षणांत नारी । नरनारींहुनि भिन्न परी ।
मार्ग भक्तिचा जनां दाविण्या अवतरलासी अवनिवरी ।।

28

1843 मध्ये विजयादशमीच्या दिवशी सालेमपूर येथे आपल्या भाच्याच्या घरी दुर्गेच्या प्रतिमेचे विसर्जन झाल्याबरोबर खुदीरामांनीही ' रघुवीर रघुवीर ' असा नामघोष करीत आपल्या पार्थिव देहाचे विसर्जन केले. पित्याच्या देहावसानानंतर संसाराचा सारा भार गदाईचे ज्येष्ठ बंधू रामकुमार यांच्यावरच पडला. कामारपुकूरातच राहून वाढत्या संसाराच्या

खर्चाची तोंडमिळवणी करणे असंभाव्य वाटल्यामुळे रामकुमार कलकत्त्यास गेले व तेथील झामपुकूर या भागात त्यांनी एक शाळा उघडली. तेथीलच शेजारच्या काही घरांतील देवपूजा पण त्यांनी स्वीकारल्या.

1853 मध्ये रामकुमार घरी आले. त्यावेळी रामकुमार, रामेश्वर व चंद्रादेवी यांच्यात बरीच चर्चा होऊन शेवटी, गदाईस पण कलकत्त्यास पाठवावे असे ठरले.

गदाई आता सतरा वर्षांचा झाला होता. पण अजून त्याचे अभ्यासाकडे मुळीच लक्ष जाईना. रामकुमारासमवेत कलकत्त्यास गेल्यावर त्यांच्या नजरेखाली गदाधर सुधारेल- अभ्यासात थोडेफार मन घालील - अशी सर्वांची अपेक्षा होती.

कलकत्त्यास रामकुमार एकटेच होते. त्यांची पत्नी आधीच निवर्तली होती. घरकाम उरकून आळीतील लोकांघरच्या देवपूजा करुन शाळा चालविणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे होते. त्यांना एका हस्तकाची निकड होतीच. तेव्हा, गदाधर रामकुमारांचा मदतनीस म्हणून झामपुकूरमध्ये राहू लागला. तेथील आळीतील रामकुमारांनी स्वीकारलेल्या देवपूजा तोच करी. जसा कामारपुकूरमध्ये, तसा इथेही तो सा-या शेजा-यांच्या गळ्यातील ताईत बनला. त्याच्या स्वभावातील, त्याच्या आवाजातील, एवढेच काय, त्याच्या शरीरातील प्रत्येक हालचालीतील गोडवा काही आगळाच होता. लोक सहजच त्याच्याकडे आकृष्ट होत. त्यास सुपूर्द केलेली पूजादी कामे तो अनन्यभावाने व उत्कृष्टपणे करी. पण अभ्यासात मात्र त्याची प्रगती होईना. उलट, उत्तरोत्तर ही शालेय शिक्षणाविषयीची त्याची अनास्था वाढतच असल्याचे दिसून आले.

गदाईचे हे अभ्यासाविषयीचे वाढते औदासीन्य पाहून रामकुमारांनी त्यास एके दिवशी जवळ बोलावले व शालेय शिक्षणाची महती पटवून देण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रापंचिक कर्तव्याची, जबाबदारीची त्यास जाणीव करुन देण्यासाठी अनेकपरींनी उपदेश केला. गदाईने शांतपणे सर्व ऐकले व शेवटी तो म्हणाला-

नाहीं विद्या अथवा धन ख-या सुखासी कारण
सांडा ममता नी मीपण संत सांगती ||
साधु संत जे का झाले निजानंदीं बुडुनी गेले

होते ते का मूर्ख सारे बरा त्यांचा पंथ ।।
हृदयीं कालिकेचे चरण प्रेमें सदैव ध्याईन
देवकार्यासी अर्पीन काया मन ।।

29

इतर उनाड पोरेदेखील आलस्यादिकांमुळे अभ्यासात टंगळमंगळ करतात. गदाईचे अभ्यासाशी जे वाकडे दिसून येई ते निराळ्याच कारणामुळे. त्याच्या सर्व क्रिया उदात्त विचारांनीच प्रेरित झालेल्या असत, हे त्याच्या उत्तरावरुन स्पष्ट होते. रामकुमारही जाणून होते की, ' जैसा बोले तैसा चाले ' ही गदाईची जात; शिवाय, जे त्यास पटत नाही ते तो करीत नाही. तेव्हा शिक्षणाचा नाद टाकावा व कायमचा वाद मिटवावा, हेच बरे.

रामकुमारांची आर्थिक परिस्थिती आताशा फारच बिकट झाली. शाळेतील मुलांची संख्या बरीच घटली. जिवापाड कष्ट करुनही काही चीज होईना. यजन याजन व अध्यापन एवढेच ब्राह्मणास सांगितलेले अर्थार्जनाचे उपाय, रामकुमारास अवगत होते. अशा परिस्थितीत केवळ परमेश्वराची करुणा भाकीत दिवस कंठीत असता, त्यांना आपली सांपत्तिक स्थिती उन्नत करुन घेण्याची संधी प्राप्त झाली.

कलकत्त्याच्या उत्तर भागात, गंगेच्या काठी, दक्षिणेश्वर येथे, राणी रासमणी नामक एका धनाढ्य व भक्तिमती स्त्रीने 1855 मध्ये, एक भव्य कालीमंदिर बांधले. येथील अर्चक म्हणून रामकुमारांची नियुक्ती करण्यात आली. अर्थातच गदाधरपण दक्षिणेश्वरी राहण्यास आला.

रामकुमार पुजारी म्हणून काम करीत असता, गदाधर देवीची वेषभूषा वगैरे करण्यात त्यांना मदत करी. तदनंतर थोड्याच दिवसात गदाधराने शक्तिदीक्षा घेतली व तो कालीमंदिरात मुख्य अर्चक बनला.

रामकुमारांना 1857 मध्ये देवाज्ञा झाली. आपल्या पितृतुल्य वडीलभावाच्या निधनानंतर गदाधराचे संसाराविषयीचे औदासीन्य अधिकाधिकच बळावू लागले. त्याचा सारा वेळ पूजाध्यानादिकातच जाई. तो आता देवीच्या दर्शनास अधीर झाला. त्यास अन्य काहीच सुचेना. तो देवीस आळवू लागला-

अहो कालीमाय काय । करिसी तू हाय हाय
दिनापाठी दिन जाय । परी तू न भेटसी ।।

काय म्यां तें पाप केलें । जें त्त्वां मज अव्हेरिले
तान्हुल्यासी या सांडिले । आणि माय म्हणविसी ।।
नको मज गे अव्हेरुं । मजवरी रोष करुं
तुझेंच ना मी लेकरु । ये ना मात सत्वरी ।।

30

अहंकाराचा नाश झाल्याविना, सारा उच्च नीच भेद गळाल्याविना, लज्जा, घृणा, भय. कुल, शील, जाती, मान व अभिमान हे अष्टपाश तोडल्याविना मुक्त होणे शक्य नाही, देवदर्शन घडणे असंभ्याव्य, असे गदाईने संतमुखातून ऐकले होते,

अष्टपाश नाही गेले । असे कधीं मुक्त झाले
लज्जा घृणा तैसें भय । तोडोनी द्यावें त्रितय ।।
समदृष्टि जो न झाला । देव त्या कधीं लाभला ।।
म्हणत उच्छिष्टान्न खाई । शौचकुपें झाडि गदाई ।।
' माती सोने, सोने माती ' । म्हणत नाणीं आणि माती
धरोनिया दोन्ही हातीं । विसर्जी गङ्गौघि अंतीं ।। '

31

अहंकारनिर्मुलनासाठी, लज्जादी अष्टपाश तोडण्यासाठी काली मंदिरात भिका-यांना वाढलेल्या प्रसादान्नाचे उच्छिष्ट भक्षण करणे वगैरे गोष्टींची गदाईस आवश्यकता होती का ? असल्यास त्याला अवतार का मानावे ? नसल्यास, त्याने या गोष्टी का केल्या ? 'माती सोने, सोने माती ' म्हणत गंगेत नाणी व मातीची ढेकळे का फेकली ?

ज्याला समाधी वगैरे सहजच सिद्ध होत्या, ज्याला मन काबूत ठेवणे कधीच कठीण झाले नाही, त्याला अशा साधनांची गरज होती म्हणणे रास्त दिसत नाही. ज्याचे मन चंचल, विषयाभिमुख असते, ज्याचा देहात्मभाव दृढ व बलवान असतो, अशालाच या साधनांचे प्रयोजन.

अवतारी पुरुषाचे इहलोकी आगमन बहुजनसुखासाठी बहुजनहितासाठी होते असे मानल्यावर त्याच्या सा-या क्रिया इतरांसाठीच व्हाव्या हे उघडच आहे. तेव्हा गदाधराने जी ही साधने केली ती केवळ स्वतःसाठी नसून सामान्य साधकांस मार्गदर्शक व्हावीत म्हणून केली, असे मानणे अधिक सयुक्तिक होईल.

' धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । महाजनो येन गतः स पन्थाः ।' हे मौलिक तत्त्व आपण विसरता कामा नये. जसा एखादा एम्. ए. झालेला विद्यालयातील अध्यापक, विद्यार्थ्यांचे धडे प्रथम आपण वाचून, अभ्यासून नंतर मुलांना शिकवितो, तसेच अवतारी पुरुष देखील प्रथम आपण साधने करुन नंतर ती इतरांस करण्यास सांगतो. जीवाने शिवपदी कसे आरुढ व्हावे- आपल्यामधील ' शिवत्त्व ' कसे ओळखावे- हे दाखविणेच अवताराचे मुख्य कार्य नव्हे का ? नाही तर शिवाने जीव का व्हावे ?
दुसरी गोष्ट म्हणजे लोभमोहादिकांचा त्याग करण्यास सांगणारी जी शास्त्रे आहेत त्यांनासुद्धा महापुरुषांच्या आचरणामुळेच प्रामाण्य येते. जे महाजनांनी केले तेच आमचे शास्त्र झाले.

रामकृष्ण परमहंस म्हणून ख्यातनाम झालेला गदाधर, पुढे आपल्या शिष्यांस सांगत असे, ' मी जी साधने केली त्याच्या सोळाव्या हिश्शाने तुम्ही ती केलीत तरी पुरे. ' यावरुन गदाधराचा या सगळ्या साधनांमागील हेतू काय असावा हे दिसून येते. इतरांच्या सोळापट साधने करणे गदाईस अवश्य होते का ? कदाचित् गदाईने ही साधने लोकांना मार्गदर्शक व्हावीत, हाच हेतू मनात बाळगून केलेली नसावीत. जाणूनबुजून, लोकसंग्रहार्थ म्हणून त्याने ही साधने जरी केली नसली, तरी त्याच्या ठायी वास करणारी परमात्मशक्ती, ज्या शक्तिचा अवलंब करुन गदाई अवतरला ती शक्ती, त्याच्या देहमनादिकांकडून या गोष्टी जगत्कल्याणास्तव करवून घेत असावी असे आम्हांस मानावे लागेल. असे न मानल्यास आपल्याला या गोष्टींची नीट संगती लावता येणार नाही.

परमात्मा आपल्या प्रकृतीचा- मायानामक शक्तीचा- आश्रय करुन जन्म घेतो व धर्मसंस्थापनेचे कार्य करतो. सामान्य मनुष्यदेखील अशीच शक्ती घेऊन जन्मतो; पण तो केवळ स्वार्थपर कर्मे करतो. सामान्य माणसाची प्रकृती मलिनसत्त्वमयी असते. त्याच्या ठिकाणी पूर्वजन्मींचे जे स्वार्थपर विचारांचे व कर्मांचे संस्कार असतात ते त्याला संसारातच गुरफटून ठेवतात. हे संस्कार त्याचे कर्मक्षेत्र मर्यादित करतात. ज्या मनांदिकातून ही शक्ती कार्य करीत असते त्यांच्यावरच या शक्तीच्या कर्माचे स्वरुप अवलंबून असणार मन म्हणजे ज्यात ज्ञान, भावना व इच्छा प्रकट होतात ते अंतरिंद्रिय. यात अनंत जन्मांचे संस्कार साठविलेले असतात.

सामान्य माणसाच्या बाबतीत हे मलिन वासनायुक्तच असल्यामुळे त्यांचे आचारविचारदेखील स्वार्थमूलकच असतील हे उघडच आहे.

सामान्य आणि असामान्य पुरुष या दोघांच्याही ठायी ही शक्ती त्यांस आपली स्थिती उन्नत करुन घेण्यास, सुखसंपादनाच्या कार्यी प्रयत्नशील राहाण्यास, लावते. पण ' वसुधैव कुटुंबक ' अशा लोकोत्तर पुरुषाची कर्मभूमी अधिक व्यापक, त्याचे विचार अधिक उदात्त असणे सहजच आहे. ' मला या तिन्ही लोकांतील सुखे नकोत. या जगातूनच काय, परलोकातूनसुद्धा मला काही मिळवावयाचे नाही; तरी पण मी सदैव कार्यरत असतो, ' असे म्हणणाऱ्याचा, केवळ जगत्कल्याणाच्या हेतूनेच जन्म घेणाऱ्याचा, पिंड निराळा. त्याच्या मनाची घडणच निराळी. धर्मसंस्थापनेच्या वासनेनेच तो जगात येत असल्यामुळे- त्याचे ज्ञान, भावना, इच्छा या लोकोद्धाराच्या वासनेशी निगडित असल्यामुळे - त्याने केलेली सहज कर्मेदेखील लोकोपकारकच होतील हे स्वाभाविकच आहे. विश्वकल्याणासाठी आपण ही कर्मे करतो अशा जाणीवेतूनच ती उपजली पाहिजेत असे नाही.

जीव जरी शिवरुपच असला तरी त्याला आपल्या शिवरुपास सच्चिदानंदरुपास, झाकळणाऱ्या मायेचे आवरण काढून टाकल्यावाचून आपल्या दिव्यत्त्वाचा साक्षात्कार होत नाही; आणि या मायेस दूर सारण्यास त्याला मायाधीशाचीच कृपा हवी असते. ही कृपा संपादण्यासाठी अन्य सर्व विषयांची आसक्ती टाकून, त्याच्याशी प्रेमाचे नाते जोडावे लागते. केवळ पूजादी कर्मे केल्याने भागत नाही. म्हणून मृण्मय मूर्तीस माता मानून गदाईचे समाधान होईना. ' जिच्यात मला चैतन्य दिसत नाही, त्या ' मूर्तीला ' आई म्हणून कसे संबोधावे ? केवळ लोक तिला आई म्हणतात म्हणून मी म्हणावे का ? शास्त्रवाक्य व संतांचे अनुभव खोटे नसतील. पण मला अनुभव हवा. ' या विचारांनी त्याचे मन व्यापले, आणि त्याच्या सर्व कामना कालीमातेच्या पायीच लीन झाल्या. तो देवीच्या प्रतिमेसमोर उभे राहून कळवळून म्हणतो-

व्यर्थ काय तुझी कीर्ति । फोल वा तुझी प्रीती
केवळ मृत्तिका मूर्ति । असशी तूं का ।।
तुझा बाळ म्हणवूनी । राहिन तुज बिलगोनी
ऐसी आस जोपासुनि । उरीं राहिलो ।।

तुजवीण जगीं अन्य । वाटे मज सर्व शून्य
म्हणुनी प्रेमीं अनन्य । तुझ्या रंगलों ।।
आतां नको अंत पाहूं । कैसा तुजवीण राहूं
तव पदीं शिर वाहूं । मात्र इच्छितों ।।

32

गदाधराची विरहव्यथा शिगेस चढली - असह्य झाली.

विरहवह्नि उसळला गात्रिं दाह वाढला ।
शमविण्यासि अंतरिंचा अग्नि अधिर जाहला ।।
बाजुस असि लोंबते दृष्टिस जणु झोंबते ।
घेउनि ती घालण्यास उरीं तेथ पातला ।।
उचलुनि घेई करीं खुपसतो क्षणीं उरीं ।
एवढ्यांत जगन्मात दर्शन देई मुला ।।

33

परमात्मा मात्र सत्य, शाश्वत; बाकी सर्व असत्य नाशिवंत; ईश्वरसाक्षात्कार करुन घेणे हेच मानवी जीवनाचे ध्येय, अशी शिकवण मिळालेल्या गदाधराला कालीच्या दर्शनावाचून जीवनच फोल वाटू लागले. अनित्य, दुःखमय संसाराच्या बुडाशी असणारे, पण बहिर्मुख मनास अगम्य अप्राप्य वाटणारे, चिरंतन सुख संपादिण्यातच खरा पुरुषार्थ आहे असे मानणाऱ्या गदाधराला देवीदर्शनाचा अमृतकुंभ हस्तगत करण्याचा ध्यास लागला.

' मरणं प्रकृतिर्जीवितं विकृतिः शरीरिणाम् ' हे सत्य गदाईस पटले होते. सामान्य जीवाचे, अज्ञानी माणसाचे, देहच आपण असे मानणाऱ्या मायामुग्ध मनुष्याचे, जीवन म्हणजे क्षणोक्षणी घडणारे मरणच होय. कारण आमचा देह प्रत्येक क्षणाला विकार पावत असतो. आमच्या देहाची घटक द्रव्ये सतत बदलत असतात व प्रत्येक सात वर्षांनी आम्हाला नूतन देह प्राप्त होत असतो, असे वैद्यकीय शास्त्र सांगते; पण आपल्या लक्षात ही गोष्ट येत नाही. या जगातील साऱ्याच वस्तूंना उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्था असतात. त्या एकामागून एक येतात. एकीच्या पोटी दुसरीचा जन्म होतो. एकीचेच दुसरीत रुपान्तर होते. फार काय, एकाच अदृश्य अगोचर तत्त्वावर विविध रुपात भासणाऱ्या, पण वस्तुतः अभिन्न अशा या अवस्था होत, असे

तज्ज्ञ सांगतात. आपल्या इंद्रियांस ज्ञात होणाऱ्या साऱ्याच वस्तू सीमित असल्या पाहिजेत. असीम तत्त्व आम्हास नेहमीच अगोचर राहाणार.

आकाशाचेही प्रत्यक्ष ज्ञान व्हावयाचे असल्यास ते आकाशदेखील व्याप्य, मर्यादितच झाले पाहिजे. नाहीतर आकाशाची आम्हास केवळ कल्पना मात्र करता येईल; ' पूर्ण आकाश मी पाहिले ' असे कधीच म्हणता येणार नाही. जसे आकाशाविषयी वा देशाविषयी तसेच कालाविषयीही आम्हास मानावे लागणार.

कोणतीही एखादी घटना घेऊन आम्ही कालगणना करीत असतो. उदाहरणार्थ, मध्यान्ही सूर्य जेव्हा डोईवर येतो त्या क्षणापासून वेळेची गणती करण्याची प्रथा आहे. काही महापुरुषांच्या जन्मदिनापासून आमचा वर्षारंभ होत असतो. सूर्योदयादी किंवा वस्तूंच्या वा व्यक्तींच्या जन्मादी घटना नसत्या तर कालाची कल्पनाच उद्‌भवली नसती. दोन वस्तूंमधील अंतर म्हणजे देश व दोन घटनांतील अंतर तो काल असे सर्वसाधारणपणे आम्ही मानतो. तेव्हा देशाच्या कल्पनेला वस्तूची व कालाची कल्पना यावयाला घटनेची अपेक्षा असते. म्हणजेच त्यांचे ज्ञान सापेक्ष असल्यामुळे अशुद्ध व मर्यादित आहे. पण ते देहादिकांच्या व्यवहारास पोषक ठरते, उपकारक होते, म्हणून मनुष्यास हवे. पण हे ज्ञान आम्हास असीम तत्त्वाकडे नेऊ शकत नाही.

जे ज्ञान देशकालातीत असून सर्व कल्पनांचे अधिष्ठान आहे, जे देशकालातीत म्हणून अशरीरी; अशरीरी म्हणून अविक्रिय; अविक्रिय म्हणून मरणरहित व दुःखरहित; तसेच जे सर्व कल्पनांचेही अधिष्ठान आहे, उगमस्थान आहे, त्या असीम, अमर दुःखरहित ज्ञानरुप तत्त्वालाच देव म्हणतात. देव सगुण साकार असून निर्गुण निराकारही आहे. कारण सगुण, साकार, निर्गुण, निराकार या साऱ्या आपल्या कल्पना आहेत. शुद्ध ज्ञान वा परमात्मा सर्व कल्पनांच्या अतीत असल्यामुळे अनिर्वाच्य आहे.

भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात, **' ये मां यथा प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । '** भक्ताच्या भावानुरुप भगवान त्यास दर्शन देतो. भगवान सगुण आहे व निर्गुणही आहे; आणि या दोहोंच्या अतीत पण आहे.

सगुण म्हटल्यावर निर्गुणाची कल्पना, साकार म्हटल्यावर निराकाराची कल्पना, सीमित म्हटल्यावर असीमाची कल्पना आपल्या

मनात निदान अप्रत्यक्षपणे डोकावते. ते का? या कल्पनांच्या साहचर्याच्या बुडाशी कोणते तत्त्व आहे ते आपण पाहिले पाहिजे.

मुळात गुणांची कल्पना असल्यावाचून सगुण वा निर्गुण असा शब्दप्रयोगच होऊ शकणार नाही. गुणांची कल्पना येण्यास ज्याच्या आश्रयाने गुण राहतात अशा द्रव्याची कल्पना करावी लागेल. गुण व द्रव्य यांचे निराळे असे स्वतंत्र अस्तित्व कधीच असू शकत नाही. गुणांवाचून द्रव्याचे ज्ञान होऊ शकत नाही, व द्रव्यावाचून गुण प्रकट होऊ शकत नाहीत. त्यांचे नित्य साहचर्य कशाचे द्योतक आहे बरे? गुण म्हणजे पदार्थामध्ये वसणारी, त्या पदार्थास विशिष्ट प्रकारे, विशिष्ट रुपात ज्ञात करुन देणारी, शक्ती. द्रव्य (Matter) व गुण (Energy) म्हणजे शक्तिमान व त्याची शक्ती ही वस्तुतः एकच आहेत.

या सृष्टीतील विविध पदार्थ, विविध जड द्रव्ये एकाच शक्तीची रुपे होत. तिनेच या विश्वास व्यापले आहे; आणि या दृश्य सृष्टीच्या ती अतीतपण आहे. हीसच गदाधर आई म्हणून संबोधितो.

जसे द्रव्य व गुण, शक्ती व शक्तिमान अभिन्न, तसेच साकार व निराकार, सीमित व असीम अभिन्न. साकार किंवा सीमित म्हटले की त्याला सीमित करणारे, त्याच्या मर्यादा ठरविणारे दुसरे एखादे तत्त्व असलेच पाहिजे. सा-या वस्तू मर्यादित आहेत त्या एकमेकांना मर्यादित करतात. अमर्याद अशी कोणतीच वस्तू नाही असे म्हणणेही रास्त दिसत नाही. या सा-या दृश्य वा ज्ञेय विश्वालासुद्धा मर्यादा असल्याच पाहिजेत. नाहीतर ते दृश्य वा ज्ञेय होणेच शक्य नाही. तेव्हा या विश्वाच्या पलीकडे या विश्वालाही मर्यादित करणारे असे एक असीम, अगोचर काहीतरी असलेच पाहिजे असे मानणे प्राप्तच आहे. हे असीम तत्त्व जड असणे शक्य नाही. कारण जड वस्तूस आकारादी असलेच पाहिजेत; ते तत्त्व इंद्रियगोचर झालेच पाहिजे. अतएव ते मर्यादित होणे अपरिहार्य आहे. तेव्हा असीम तत्त्व हे चैतन्यरुप, ज्ञानरुप किंवा ज्ञातृस्वरुप असून, इंद्रियांस अगोचर असणार असा निष्कर्ष काढणेच योग्य होणार.

आता या दृश्य विश्वाचा या असीम, अगोचर, ज्ञानरुप तत्त्वाशी संबंध काय? हे विश्व व या विश्वाहून भिन्न मानलेले असीम तत्त्व ही मुळात भिन्न आहेत का ? का ती अभिन्न आहेत ? भिन्न असल्यास त्यांचा एकमेकांशी

संबंध कसा जोडला जातो? हे प्रश्न सहजच उद्‌भवतात.

या प्रश्नाचे उत्तर असे की-

' गुणांचे अपत्य जाण । विश्व' म्हणे संतवचन ।
ब्रह्म गुणां अधिष्ठान । गुणातीत जरी ते ।।
गुणी आणि गुण एक । भेद नसे त्यात देख ।
रुपें नाना भौतिक । निर्गुणची नटे तें ।।
निर्गुण नी सगुण आन । नसति जरी दिसति भिन्न ।
कल्पिते स्वयें आपण । अज्ञाना करुनि ते ।।
चिन्मयाची गूढ शक्ति । जडरुपें अभिव्यक्ति ।
पावुनि करि जगनिर्मिति । अचिन्त्या अतर्क्य ती ।।
ब्रह्म जें स्वयें निर्गुण । देइ भक्तां तें दर्शन ।
भक्त वांछिती त्या जाण । रुपीं सगुण होउनी ।।

34

चैतन्य व जड यातील मुख्य फरक हा की जड तत्त्व आकारवान, गुणयुक्त, इंद्रियें, मन वा बुद्धी यांचे विषय होणारे असते. तद्विरुद्ध चैतन्य हे अशरीरी, ज्ञानरुप इंद्रियादिकांस अगम्य असे असते. जे अशरीरी आहे, ते सर्वव्यापक असलेच पाहिजे. हे सर्वव्यापक आहे असे मानल्यावर जडांतदेखील चैतन्य असणारच; मग तेथे आम्हाला त्याचे अस्तित्त्व दिसून येवो वा न येवो.

याच गोष्टीकडे आपण दुसऱ्या एका दृष्टिकोनातून पाहू. ज्या सूक्ष्म घटक मूल द्रव्यापासून जड पदार्थ बनलेले असतात त्यास आपण ' एलिमेंट ' म्हणतो. ते अणुरुपी असतात. हे इलेक्ट्रॉन, प्रोटॉन व न्यूट्रॉन नामक शक्त्यंशापासून तयार होतात, असे आपले भौतिक शास्त्र सांगते. हे एवढे सूक्ष्म असतात की त्यांना जड का अजड मानावे हा प्रश्न पडतो. यांना ' युनिट्स ऑफ एनर्जी' अथवा ' शक्त्यंश ' असेही म्हणतात, तर कधी 'wavicles' म्हणजे ' तरंगगतीने फिरणारे ' असे संबोधतात. तेव्हा सारे जड पदार्थ यांचेच संघात असल्यामुळे ते केवळ शक्तीचीच आकार पावलेली रुपे होत असे मानणे प्राप्त आहे. अणूतील हे इलेक्ट्रॉन सदैव कार्यरत असतात. पण त्यांच्या हालचाली आम्हास दिसत नाहीत. एखाद्या मेजाचेच उदाहरण घ्या ना. ते कोट्यवधी अणूपासून बनलेले असते. या अणूमध्ये

अगणित शक्त्यंशांची अविरत हालचाल होत असते. पण तिची आम्हाला जाणीव होते का? ही शक्ती किंवा ' एनर्जी ' जशी जडात दडते, तसेच चैतन्य, ज्ञान देखील या विश्वाचे अधिष्ठान असूनही आम्हास प्रतीत होत नाही ते सर्व विश्वात ओतप्रोत भरुन आहे.

शुद्ध ज्ञान कधीच ज्ञेय होणार नाही. ते इंद्रिय वा मनाचा विषय होणे शक्य नाही. कारण ते गुण जाणणारे आहे. द्रव्यासारखे गुणवान नव्हे. ते आकार पाहणारे आहे; आकारवान नव्हे. ते असीम, निराकार. जड हे सीमित, साकार. पण सीमित व असीम ही परस्पर भिन्न मानल्यास, जेथे सीमित आहे तेथे असीम नाही व जेथे असीम आहे तेथे सीमित नाही असाच निष्कर्ष निघणार. याचा अर्थच असा की एक दुस-याला मर्यादित करते; पण असे म्हटल्यास ' वदतो व्याघात ' हा दोष येईल. असीमास मर्यादित केले जाते असे कसे म्हणता येईल? फार तर ते मर्यादित झाल्यासारखे दिसते असे आपण म्हणू !

दुसरी गोष्ट म्हणजे जड व चैतन्य ही स्वतंत्र व भिन्न तत्त्वे आहेत असे मानल्यास त्यांच्यात व्यवधान आणणारे, त्यांस पृथक् रुपात दाखविणारे, तिसरे कोणते तरी तत्त्व असावयास हवे. जसे मेज व खुर्ची या वस्तूंस वेगळे करुन दाखवणारे, त्यांच्या मध्ये राहणारे, आकाश आपण पाहतो. हे तिसरे तत्त्व पण स्वतंत्र, जड किंवा चैतन्याहून निराळ्या स्वरुपाचे असावे लागणार, हे उघडच आहे. आता ही केवळ तीनच तत्त्वे आहेत असे मानूनही भागणार नाही. कारण, जे आपण तिसरे तत्त्व मानले, त्याच्या जडाशी वा चैतन्याशी कसा संबंध जोडला जातो? तिसरे तत्त्वही स्वतंत्र व जडचैतन्यांहून भिन्न मानल्यावर त्याच्यात आणि जडात, त्याच्यात आणि चैतन्यात, व्यवधान राहणारच. या तिस-या तत्त्वाला जडाशी सांधणारे चवथे व चैतन्याशी जोडणारे पाचवे अशा आणि दोन तत्त्वांचे अस्तित्त्व मानावे लागेल. पण अशी कितीही तत्त्वे आपण मानीत गेलो तरी शेवटपर्यंत आपला प्रश्न मिटणे शक्य नाही. म्हणून येथे ' अनवस्था ' हा दोष येतो. तेव्हा जड व चैतन्य अशी दोन स्वतंत्र तत्त्वे नाहीतच. केवळ एकरसत्त्वाने सर्वत्र असणारे असे चैतन्य मात्र सत्य असून दृश्य सृष्टीतील सारे जडादी पदार्थ त्याच्यावर केवळ भासमान होतात असे मानणे तर्कशुद्ध वाटते. असेही आम्हास गृहीत धरावे लागते की या चैतन्याच्या ठायी अचिंत्य, अवर्णनीय शक्ती वसते जी

सा-या वस्तूंच्या जन्म, स्थिती व लयास कारणीभूत होते. या अचिंत्य, अनिर्वचनीय शक्तीमुळेच जगातल्या काही वस्तू जड, अचेतन, निष्क्रिय वा अचल भासतात तर काही गतिमान सक्रिय पण ज्ञानशून्य दिसतात. तिसरा प्रकार आढळून येतो तो सचेतन ज्ञानयुक्त प्राणिमात्रादिकांचा. या तिहीव्यतिरिक्त चौथा प्रकार कोणाच्याही आढळात आजवर आलेला नाही. म्हणून चैतन्याच्या या शक्तीला त्रिगुणमयी म्हणतात. संस्कृतात गुण या शब्दाचा राजू असा अर्थ होतो. रज्जूंनी बांधावे तद्वत् या गुणांनी ही चैतन्यशक्ती, जीस परमेशशक्ती म्हणतात ती, सा-या भूतमात्रांस बांधते, आपल्या काबूत ठेवते. ज्याच्यामुळे जाड्य, नेणतेपण वगैरे उत्पन्न होतात तो तमोगुण. ज्याचेमुळे गती, क्रियाशीलतादी व्यक्त होतात तो रजोगुण; आणि ज्यातून ज्ञान, आनंदादिकांची अभिव्यक्ती होते तो सत्त्वगुण. सारे जीव या गुणांचे दास व परमात्मा, ज्याच्या आधीन राहून हे गुण कार्य करतात, तो त्यांचा स्वामी. स्वतः कोणत्याच प्रकारे विकार न पावता हा परमात्मा सृष्टीचे सृजनपालनादी करतो व तोच जीवांस गुणांच्या दास्यातून मुक्त पण करतो. यास कोणी देव म्हणून आळवितात तर कोणी देवी म्हणून आराधितात. स्वतः तो उभयलिंगातीत आहे. या चैतन्यरुपी परमात्म्यात जरी गुण प्रतीत होतात तरी तो त्यांनी अस्पृष्ट आहे. कारण त्याचे हे गुण केवळ त्याच्यात भासणारे आहेत. त्यांना सत्य मानता येत नाही. रज्जूच्या ठिकाणी सर्पभ्रांती झाली असता तो सर्प जसा रज्जूच्या स्वरुपात कोणताही बिघाड आणू शकत नाही, तसे हे विश्व परमात्म्याहून उत्पन्न झाले तरी त्याच्यात काही न्यूनता आणू शकत नाही. शास्त्र सांगतेः

चैतन्य साकारे तरी निराकार उरे
प्रसवुनी आकारातें त्यांतचि तें शिरे ||
अव्यक्तची व्यक्त झालें रुपा जरी आलें
एकरसत्त्वा स्वकीय न तयें सांडिलें ||
अनंगचि 'वि' विधत्त्वें 'स्व'तः प्रकटलें
म्हणोनि त्या ' विश्व' ऐसें नाम प्राप्त झालें ||
ब्रह्म जैसें पूर्ण तैसें विश्व असे पूर्ण
सुवर्णालंकार जैसे असती सुवर्ण ||
जयापासोनि हें झालें तेंचि हें निश्चितें

जगरुपे भासण्या कारण अज्ञान तें ||
अज्ञान हें मायाधीश्वराची असे माया
तयाचीच दया हवी तियेसी तराया ||
जयांतूनि उपजे विश्व जेथे लीन हो तें
ज्याच्या तेजें प्रकाशें तें चैतन्य सत्य तें ||

35

हे शास्त्रांचे व संतांचे मत गदाधरास पटले होते. देहच आपण समजून देहाच्या रक्षणार्थ व पोषणार्थ रात्रंदिन राबणारी विषयलोलुप माणसे, चालती बोलती मडी होत, असे त्यास वाटे. सर्व विकारांनी, उत्पत्तीस्थितिलयादी अवस्थांनी, अस्पृष्ट असे जे चिरंतन तत्त्व आहे ते जाणून घ्यावे ही त्याची तळमळ होती. केवळ शास्त्रवाक्य व तर्क यांनी त्याचे समाधान होईना. त्यास स्वानुभुती हवी होती. श्रुती, युक्ती व अनुभूती यांच्या कसोटीस उतरेल तेच स्विकारावयाचे असा त्याचा बाणा होता. ही अनुभूती जर प्राप्त करुन घेता येत नसेल तर जगावे तरी का? निष्फळ मरणतुल्य जीवन जगण्याऐवजी स्वानंद साम्राज्याचे आधिपत्य मिळवण्याच्या प्रयत्नी प्राणाहुतीही देणे बरे नव्हे का? असा विचार करुन गदाईने पूजागृहात बाजूला भिंतीवर लोंबत असलेली तलवार काढून घेतली.

या मर्त्य जगातील विषयांची आसक्ती व तिजमुळे उत्पन्न होणारे देह इन्द्रियादिकांचे दास्य झिडकारुन, ख-या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी, गदाई लढत होता. 'जे शरीर, तत्त्वसाक्षात्कार करुन घेण्यात, देवीदर्शनाच्या प्राप्तीत, अडथळा आणते, त्यास मी का कवटाळावे? ' असा विचार करुन आपल्या उरात तो तलवार खुपसणार, एवढ्यात देवीने आपल्या या वीर पुत्रास दर्शन दिले.

विरहाग्नीने होरपळत असलेल्या गदाईच्या हृदयावर या देवीदर्शनाने जणू अमृतसिंचन केले. या दर्शनानंतर उणेपुरे दोन दिवस गदाई आनंदसागरात डुंबून होता. बाह्य विश्वात काय चालले आहे याचे त्याला मुळीच भान नव्हते.

आपल्या दर्शनाचे गदाधर असे वर्णन करतोः

उठति ऊर्मि दिव्य भंवतिं नाद तुमुल करित येति
बुडवूं मज झणिं पाहति अनंतीं अनंत त्या ||

देह गेह मंदिरादि दीप्तिंत झणिं गुप्त होति
उरे उज्ज्वल ज्योतिः- सागर तो अपार ||
ज्योतिः सिंधुचे कल्लोळ तेचि चैतन्याचे लोळ
कवटाळुनी मजसि खोल नेति बळें कर्षुनी ||
बाह्य संज्ञा हरपली देहबुद्धिही निमालि
अनिर्वाच्य स्थिति जाहलि वर्णूं केंवि तियेसी ||

36

देवीचे गदाधरास सजीव दर्शन, सचेतन शरीरात, घडले; एवढेच नव्हे, तर आपली आई सगुण साकार असून गुणातीतही आहे, असा त्यास अनुभव आला ! देवीच्या कांतीमान देहातून जी तेजोवलये दाटू लागली, ते चैतन्य सागराचेच तरंग होते; ते मोठा घोष करीत, सा-या विश्वाला ग्रासीत, सर्व मूर्त रुपांना गिळीत, चहूबाजूंनी अतिवेगाने येऊन गदाधरावर धडकू लागले! देहभानाच्या सीमेवर असलेल्या गदाईचा कडेलोट झाला ! त्याचे देहभान हरपले. विश्व त्याच्या बुद्धीतून निसटले; मंदिरादी सारे दृश्य जगत् चैतन्यातच विरुन गेले. अनिर्वाच्य स्थिती झाली. त्या स्थितीचे वर्णन कुणी करावे? ही स्थिती आली नि गेली. पण जाता जाता गदाईच्या मनावर अवर्णनीय आनंदाचा ठसा उमटवून गेली.

हा आनंद कितीही थोर असला तरी नित्य नव्हता. जे दर्शन नित्य नाही, त्यापासून अखंड सुखाची प्राप्ती कशी होऊ शकेल? गदाईने जे दर्शनसुख मिळविले ते त्याला नित्य प्राप्त करुन घ्यावयाचे होते. त्यास आता क्षणभरदेखील जगदंबेचा विरह सहन होईना. त्याने जमिनीवर लोळण घ्यावी; ओक्साबोक्शी रडावे, आणि असा काही आकांत मांडावा की भोवताली गर्दी लोटावी; पण गदाईस मात्र त्याचे मुळीच भान असू नये. अशा असह्य विरहवेदनांनी भुईवर कोसळून पडल्यावर मातेची चिन्मयी मूर्ती त्यास दिसावी. श्रीदेवी त्याच्याशी बोले, हसे. नानाप्रकारे त्याचे सांत्वन करी व अनेक गोष्टी त्यास शिकवी.

या दर्शनानंतर गदाधराला काही काळ श्रीदेवीची पूजादी नित्यकर्मेदेखील करणे अशक्य होऊ लागले. कारण त्याची बुद्धी आता कर्तव्याकर्तव्यतेच्या कल्पनांचे तट ओलांडून गेली होती. ज्याप्रमाणे अंतराळात पृथ्वीच्या गुरुत्त्वाकर्षणाच्या कक्षेतून आपण सुटलो असता

दुस-या कुणीकडे तरी जोराने खेचले जातो तद्वतच गदाईचे मन देहगेहादिकांपासून व तत्संबंधित कर्मांपासून असीमाकडे खेचले जात होते. गुणांच्या मर्यादा ओलांडल्या असता असेच व्हावयाचे. आमची सारी आध्यात्मिक साधने त्रिगुणांचे पाश तोडण्यासाठीच असतात. हे पाश तोडले गेले म्हणजे आपण होऊनच आम्हाला अनेक प्रकारचे आध्यात्मिक जगतातील अनुभव येऊ लागतात. तेथे स्वतःच्या प्रयत्नांनी जाणून घ्यावयाचे असे काहीच उरत नसते. तेव्हा अतींद्रिय ज्ञानाची कवाडे आपोआपच उघडली जातात. त्रिगुणांच्या दाव्याने अहंकाररुपी खुंटास मनुष्य बांधला गेलेला असतो. हा अहंकारच उन्मळून टाकावयाचा; म्हणजे देहबुद्धीचे बंध निखळून पडतात व साधक परमात्म्याकडे आपोआपच खेचला जातो. त्याला आध्यात्मिक जगतातील अनेक गोष्टी प्रयत्नाविना दिसतात; अनेक दिव्य दर्शने होतात; आणि आपल्या प्राकृत स्थितीत तो जेव्हा येतो तेव्हा त्याचा त्यालाच या गोष्टींचा अचंबा वाटतो. गदाधराचेदेखील असेच झाले. ध्यानाला बसताक्षणीच त्याला कधी कधी काजव्याच्या पुंजक्याप्रमाणे ज्योतिर्बिंदूंचे पुंजके दिसत. कधी रजतरसाच्या सागरासारखा लखलखीत ज्योतिःसमुद्र सभोवर पसरला आहे असे दिसू लागे. ध्यानात डोळे मिटलेले असताच असे नव्हे, तर स्वच्छ उघड्या डोळ्यांनादेखील हे सारे दिसावयाचे. पण ही दर्शने बरी का वाईट हे त्या श्रीकालीच्या भाबड्या बालकाला कळत नसे. तो कालीमातेस कळवळून म्हणे:

मंत्र तंत्र न मी जाणे । विविध वा पूजाविधाने ।
त्वांचि सर्व शिकवावें । अज्ञ अर्भका या ।।
तुझ्या हातिचें मी यंत्र । बुद्धि नसे मज स्वतंत्र ।
तव इच्छेपरी मात्र । वर्तूं इच्छितो ।।
जे जे म्यां वाटे करावें । तें त्वां बाळा या सांगावें ।
मजकडुनी करुनी घ्यावें । माते इतुकी याचना ।।

37

श्रीकालीच्या दर्शनानंतर आपले कुलदैवत श्रीरामचंद्र याचा साक्षात्कार करुन घेण्याची गदाईस उत्कंठा लागली व भक्तश्रेष्ठ श्रीमारुतिरायाप्रमाणे दास्यभावानेच आपण श्रीरामकृपा जोडावी असे त्याच्या

मनाने घेतले. लगेच स्वतःस श्रीहनुमान मानून त्याने या साधनेस सुरुवात केली. ही साधना करताना गदाधर आञ्जनेयाशी एवढा तन्मय होऊन गेला की त्याचे सारे आहार विहारदेखील वानरागत झाले. तो प्रायः वृक्षांवरच वास करी; फलपर्णादिकांनी उदरनिर्वाह चालवी. त्याचे नेत्रसुद्धा या काळी वानराच्या डोळ्याप्रमाणे चंचल दिसावयाचे. धोतर नेसताना त्याचे एक टोक तो मागल्या बाजूस माकडाच्या शेपटीप्रमाणे लोंबत ठेवीत असे. नित्य व उत्कट अशा मारुतिध्यानामुळे या साधनेच्या काळी त्याच्या पाठीचा कणा एक इंचभर वाढून तो शेपटीप्रमाणे दिसत होता. काय ही धारणा ! किती लोकविलक्षण ही साधना !! या विस्मयजनक साधनेच्या शेवटी हे शेपूट पण हळूहळू संकोच पावून अंती दिसेनासे झाले.

हनुमद्भावापन्न गदाई झाडाच्या एका फांदीवरुन दुसऱ्या फांदीवर झोके घेई:

' अयोध्येचा पति जो श्रीराम माझा तो स्वामी निष्काम ।।
टुण्टुण् फांद्याफांद्यावरुनी वायुसुतासम उड्या मारुनि
तन मन मम श्रीरामा अर्पुनि राहिन गात मी नाम ।।'
म्हणत गदाई रामीं रंगला रामप्रेमें पूर्ण भारला
अञ्जनीसुत जणु सकलां गमला करी तरुवरि निजधाम ।।

38

या साधनेच्या काळी एके दिवशी सहजच पंचवटीत बसून असता ज्योतिर्मयी सीतेचे दर्शन आपणास कसे घडले ते गदाई सांगतो-

पंचवटिंत मी बसतां दिसली मज कांतियुता
अनुपम लावण्यखाणी वनिता मजप्रति येतां ।।
न ही नारी न देवता चिंतित ऐसें असतां
अवचित कपि हुंकारा देत चरणीं येइ तिच्या ।।
ओळखिली मी सीता घालूं जातों दंडवता
तैं अर्पित स्वीय स्मिता मजसी मजमधीं शिरे ।।

39

श्रीरामचंद्रदर्शनासाठी आतुर झालेल्या गदाधरास प्रथम श्रीरामदर्शन न होता सीता व मारुती यांचे दर्शन का व्हावे हे गूढ वाटते. पण सूज्ञांस याचे कारण सहज हेरता येण्याजोगे आहे. गदाई स्वतःच श्रीरामचंद्र

असल्यामुळे त्याने श्रीरामचंद्राच्या दर्शनाची अपेक्षा करणे म्हणजे स्वतःच्या ठिकाणीच दुजाभाव ठेवण्यासारखे होईल; हे सुचविण्यासाठी श्रीरामाची शक्ती सीता व त्याचाच दास हनुमान गदाई समोर आले व सीता गदाईत प्रविष्ट झाली. प्रवेश करीत असता, ' मी माझ्या अधरावरचे स्मित तुला अर्पण करते' असे म्हणत सीता गदाईत लीन झाली. गदाधराच्या ओठावर हे दिव्य स्मितसदैव विलसत असे.

गदाधरास आता कालीच्या चिन्मयी मूर्तीचे नित्य नसले तरी वरचेवर दर्शन होत असे. त्याच्या पूजादी कर्मात दिव्य उन्माद दिसून येई. वैधीभक्तीच्या सा-या नियमांच्या तो अतीत गेला होता. हा कालीमातेचा एकांतिक भक्त पूजासमयी क्वचित् प्रसंगी बिल्वपत्र, पुष्प, दूर्वादिकांचे अर्घ्य वाहात असता त्या अर्घ्याने आपल्या शरीराच्या सर्व अवयवांस आपादमस्तक स्पर्श करुन मग ते तो जगदंबाचरणी अर्पीत असे. कधी, ' काय ? मला अगोदर खा म्हणतेस? ' असे म्हणून, नैवेद्यास आणलेल्या अन्नाचा काही अंश आपण प्राशून, ' हा पहा, मी खाल्ला, आता तू खा पाहू' म्हणत तोच घास श्रीदेवीच्या मुखात घाली. एके दिवशी तर, ' काय? मला आपल्याजवळ झोपायला सांगतेस ? ' असे म्हणून श्रीकालीच्या पलंगावरच जाऊन तो झोपला. अशाप्रकारे भावविव्हल होऊन-

दक्षिणेश्वरीं गदाधर मातृदर्शना अधीर
तप आचरतो घोर जनीं वनीं स्मशानीं ||
बहू काकुळती येतो आई नामें आक्रंदतो
जगदंबेसी आळवितो क्षिती न करी कुणाची ||
तयाचें आगळें वर्तन अमनस्क स्थिति देखोन
म्हणती गावींचे जन वेड गदाईसी लागलें ||
चंद्रा पुत्रा आणिते गेहीं अपुल्या ठेविते
उपाय नाना योजिते परी सारे निष्फळ ||
' संसारीं हा उदासीन नसे यासी रोग आन'
देखोनी म्हणे चंद्रा, ' लग्न गदाईचें करावें ' ||
वधु मिळविण्या धुंडती साधुसी वधू कोण देती
यत्न सारे भग्न होती चंद्रमणिचे सर्वथा ||

40

गदाधराच्या या दिव्योन्मादाच्या अवस्थेचा प्राकृत जनांस नीट उमज न पडल्यामुळे त्याच्याविषयी भलत्याच बातम्या गावात पसरु लागल्या. ' गदाई वेड्यागत वागतो. देवीची पूजा नीट करीत नाही. बिचा-याला वेडच लागले असावे.' असे लोकप्रवाद दक्षिणेश्वरहून कामारपूकूरी कर्णोपकर्णी चंद्रामणीच्या कानी आले. साहजिकच ती माऊली संचित झाली. तिने आपल्या पुत्रास गावी आणविले. अनेक औषधोपचार करुन पाहिले. कदाचित भूतबाधा झाली असावी म्हणून मांत्रिकासही दाखविले. पण काय? कशाचाच काही उपयोग होईना.

यावेळी गदाधरास तेवीसावे वर्ष. अलीकडे त्याची व्याकुलता बरीचशी कमी झाली होती. कारण त्यास जगदंबेचे वारंवार दर्शन होई. वेळ सापडेल तेव्हा तो कामारपूकूरच्या स्मशानात जाई व तेथे ध्यानादिकांत बराच काळ घालवी.

गदाधराचे मातेच्या नावाने आकांत मांडणे वगैरे आताशा विशेष दिसत नव्हते. म्हणून चंद्रामणीस वाटले की, ' गदाईस जो वायुरोग झाला होता तो अंमळ कमी झाला असावा. थोड्याच अवधीत गदाई या रोगातून पूर्ण मुक्त होईल. गदाईचे स्मशानात जाणे वगैरे इतर गोष्टी, त्याच्यात नेहमीच दिसून येणा-या संसाराविषयीच्या अनास्थेमुळे होत; तेव्हा त्याचे लग्न करुन टाकावे म्हणजे संसाराचा भार शिरावर येताच या गोष्टींना सहजच आळा बसेल' असा विचार करुन चंद्रामणी गदाईसाठी वधू शोधू लागली. पण ईश्वर प्रेमाने उन्मत झालेला गदाधर लौकिक दृष्टीने वेडाच ठरला होता. त्यास मुलगी कोण देणार? लोक म्हणत, ' अशा वेड्या पीराला मुलगी देण्यापेक्षा ती घरीच अविवाहित राहिली तर काय बिघडलं ? ' काहींची मजल येथवर गेली की ते म्हणू लागलेः

अडगळ तुम्हा जरी वाटते मुली ठेविण्या घरीं
नदींत किंवा चुलींत त्यांना फेका ना सत्वरी ।।
योग्य मिळत ना वर म्हणोनी त्यां वेड्यासी देउनी
टाकणें नको आणिल दुसरा ईश्वर वर मागुनी ।।

41

याच सुमारास गदाधर कामारपूकूरहून शिहोडला शिबिकेतून दोन्ही बाजूंना पसरलेली निसर्गशोभा पाहात जात असता त्यास एक दिव्य दर्शन

घडले. त्याचे तो स्वतःच वर्णन करतो-

हृदयगृहीं एकदां चाललो शिहोडिं शिबिकेंतुनी
निसर्गशोभा रम्य पसरली देखत दुहिं बाजूंनी ।।
हरितवृक्ष उंचावुनि माथा नीलछत्र धरिती
कळे न कोणा भेटाया घाईत सरिता धावती ।।
कांहि तरी कुजबूज चालली वटअश्वत्थांची
त्यातचि मंजुळ मंगल स्वागत गीत विहग गाती ।।
एवढ्यात मजमधुनि प्रकटलें दिव्य किशोरद्वय
त्याच्या नाना क्रीडा पाहुनि धालें भुवनत्रय ।।
वृत्ता या मी कथिलें जेव्हां भैरवि विदुषीतें
म्हणे ' निताई आणि निमाई भजती या देहातें ' ।।

42

चंद्रामणी व गदाधराचा थोरला भाऊ रामेश्वर हे दोघेही गदाधरास न कळविता वधू शोधीत होते. न जाणो, गदाधरास हा लग्नाचा बेत समजल्यास तो काही अडथळे उत्पन्न करील, ही त्यांची भीती. पण गदाईच्या तीक्ष्ण दृष्टीतून ही गोष्ट निसटू शकली नाही. पुढे जेव्हा उघडपणे त्याच्या लग्नाविषयी गोष्टी बोलण्यात येऊ लागल्या तेव्हा देखील त्याने आपली नाउमेद वा नापसंती दर्शविली नाहीच; उलट तो एकाद्या बालकाप्रमाणे त्याविषयी आनंद व उत्साह दाखवू लागला ! सांसारिक गोष्टीविषयी सदैव उदासीन राहणाऱ्या गदाईच्या ठायी हा उत्साह दिसून येणे किंचित विस्मयजनक वाटते. पण साऱ्याच गोष्टीत जगदंबेचे मत घेण्याची सवय असलेल्या या बालकाने याविषयी आधीच कालीमातेचे दिग्दर्शन घेतलेले असावे असे दिसते. कारण जेव्हा चंद्रामणी योग्य कन्या मिळेना म्हणून खिन्न झाली तेव्हा गदाधर तिला म्हणाला-

फिरतां कां तुम्हि इकडे तिकडे आधिंच ठेविलि बाळा
मजसाठिं नेमुनी मुखर्जिगेहीं पाहुनि या तिजला ।।
जयरामवटीमधिं वसते ती रामचंद्रकन्या
विधिविहितवधू तीच असे मज शोधुं नका अन्या ।।

43

गदाईसारख्या देववेड्या माणसाला, कामगंधहीन अशा या

कालीमातेच्या पुत्राला, अष्टपाशमुक्त झालेल्या या विश्ववंद्य विरागी युवकाला, विवाहाची कल्पना रुचलीच कशी ? त्याने आपण होऊन आपल्यासाठी अमुक गावी अमुक गृहस्थाची मुलगी नेमून ठेवली आहे, असे सुचवून अनास्थेऐवजी उलट उत्साहच दर्शविला, हे कसे? याला कारण एवढेच की गदाधराच्या कोणत्याही क्रिया त्याच्या आवडीनिवडीतून निपजत नव्हत्या. त्या सर्व कालीमातेच्या प्रेरणेने इतरांस मार्गदर्शक व्हाव्या म्हणूनच तो करीत असावा.

गीतेत भगवान अर्जुनाला म्हणतातः

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्शुर्लोकसङ्ग्रहम् ।। अ. 3 रा श्लोक 25
न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ।। अ. 3 रा श्लोक 26

याचा आशय असा की परमात्मतत्त्व न जाणणारे विषयासक्त लोक जसे कर्मे करीत असतात तद्वतच केवळ लोकसंग्रहाची मनीषा बाळगून विरागी ज्ञान्याने देखील समाजधारणेसाठी लोकहितासाठी वेदोक्त वा सामाजिक कर्मे करावी.

परमात्मस्वरुपातच स्थित असलेल्या ज्ञानी मनुष्याने, शास्त्रविहित, परंपरागत कर्मे करणे हे आपले कर्तव्य होय असे मानणाऱ्या अज्ञानी जनांमध्ये बुद्धिभेद होईल अशा प्रकारचे वर्तन ठेवू नये. शास्त्रात विषयसंपादनार्थ सांगितलेले विविध विधी व कर्मे माणसाला परिणामी विषयविमुख करण्यासाठीच आहेत. हे तत्त्व न जाणणारे लोक ही कर्मे अत्यंत हिरीरीने व आस्थेने करीत असतात. ती करणे आपले कर्तव्य आहे, आपला धर्म आहे, असेच त्यांना वाटत असते. अशा लोकात शास्त्रविहित कर्माविषयी शंका उत्पन्न होऊ नये म्हणून, ज्यांना वस्तुतः या कर्मांची जरुरी नाही अशांनी सुद्धा, ही कर्मे करावी. पण ती ' युक्तःसमाचरन् ' म्हणजे परमेश्वराचे ठायी आपले मन ठेऊन, कर्मफळाविषयी उदासीन राहून करावी. पंडित व अपंडित, ज्ञानी व अज्ञानी हे उभयही एकाच प्रकारचे कर्म करीत असता जरी दिसून आले तरी त्यांचे जगाकडे पाहावयाचे दृष्टिकोन अत्यंत भिन्न असल्यामुळे एकाची कर्मे विषयप्रीतीने, भोगासक्तीने प्रेरित झालेली असतात, तर दुसऱ्याच्या ठायी कर्मफलापेक्षेचाच मुळी अभाव

असतो. इतकेच काय, त्याची कर्तव्यबुद्धी देखील लोप पावलेली असते. पण इतरांसमोर आदर्श ठेवावा म्हणून हे लोकोत्तर पुरुष स्वतः पूर्ण निष्काम असूनसुद्धा अशी कर्मे करीत असतात. हाच उदात्त हेतू मनात बाळगून, अथवा कालीमातेच्या सूचनेवरुन, गदाधराने वधूशोधनकार्यी सहकार दिला असावा. गदाधराचे जीवन स्वतःसाठी नव्हतेच हे आपल्याला त्याच्या पुढील चरित्रभागावरुन दिसून येईल.

अखिल मानवजातीस जीवनाची खरीखुरी मूल्ये शिकवावी म्हणूनच गदाईचा जन्म झाला होता. तो केवळ साधुसंन्याशांसाठी अवतरला नव्हता. गृहस्थ तसेच सर्वसंगपरित्यागी संन्यासी, या सा-यांनाच त्यांच्या त्यांच्या जीवनाचे आदर्श त्याने घालून दिले. आदर्श गृहस्थ आणि आदर्श संन्यासी या दोघांच्याही जीवनाचे नियम एकाचवेळी एकाच देही एवढ्या काटेकोरपणे पाळून दाखविणारा जगाच्या इतिहासात हा एकमेव मानव. विवाह हा एक शुभसंस्कार आहे; तो सामान्य जनांस मोक्षोपयोगी होण्यासाठीच योजिलेला आहे, ही गोष्ट आपल्या जीवनातून इतरांस पटवून देण्यासाठी गदाधराने गार्हस्थ्य स्विकारले.

माणसांच्या ठिकाणी वसणा-या प्रबळ पाशवी वासनांना आळा घालणे व क्रमशः इंद्रियोपभोगांपासून त्यांस निवृत्त करणे हाच लग्नसंस्काराचा मुख्य हेतू. ज्यांच्या ठायी नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळण्याची कुवत नाही अशांनी, सामान्य जनांस एकपत्नीव्रत स्विकारुन विवाहितांस विहित असलेले आत्मसंयमाचे नियम पाळून ध्यान, उपासना, अतिथिसेवा, कुटुंबियांचे पालनपोषण इत्यादी कर्मांच्या द्वारा पूर्ण निःस्वार्थ बनून, मोक्षास अधिकारी व्हावे, म्हणून लग्न करावयाचे असते; केवळ इंद्रियलालनासाठी नव्हे.

गदाधराने दाखविल्या जागी वधू मिळाली; पण ती निघाली पाच वर्षांची कोवळी पोर. गदाधर तेंव्हा तेवीस वर्षांचा दोघांच्या वयातील अंतर पाहून चंद्रामणीने किंचित आढेवेढे घेतले; पण गदाईस अनुरुप अशी अन्य कोणतीच मुलगी मिळत नव्हती शिवाय या मुलीला पाहण्याचा योग दैवी संकेतानेच आला होता ही जाणीवही चंद्रामणीस होतीच. बरे, एक वयाची अडचण तेवढी वगळल्यास इतर सर्व परींनी ही रामचंद्रकन्या गदाधरास साजेशीच होती. म्हणून लग्न एकदाचे उरकण्यात आले; आणि लग्नानंतर

चंद्रामणीने वधूस- सारदामणीस- आपल्या घरी आणले.

वधू व वर उभयपक्षांची घराणी गरीबच असल्यामुळे मुलीच्या अंगावर विशेष दागिने नव्हते. तेव्हा चंद्रामणीने केवळ लग्न समारंभास शोभा यावी म्हणून गावच्या एका जमीनदाराकडून काही दागिने उसने आणून वधूस सजविले होते. आता हे दागिने परत करण्याची वेळ आली. पण ते सुनेच्या अंगावरुन उतरवावे कसे? तिचे कोवळे मन दुखवावे कसे ? या विचारांनी चंद्रा अत्यंत कष्टी झाली. तिला काही सुचेना वा रुचेना. चाणाक्ष गदाईच्या नजरेतून ही गोष्ट निसटू शकली नाही; आणि लगेच-

विरक्तांचा मुकुटमणी ज्ञानियांचा जो अग्रणी
चिंताग्रस्त चंद्रामणी प्रति गदाई म्हणे ।।
' काञ्चनासी कसलें काज जनांची वा आम्हा लाज
भस्मांकित योगीराज महादेव चिंतिला ।।
नको मात चिंता करुं आहे ती अज्ञ लेकरुं
निद्रावश होता सारुं सारे अलंकार ते ।।'
हेतु तयें तडी नेला झोपीं गेली जेव्हां बाला
चंद्रामणी माउलीला भूषणें तीं अर्पिलीं ।।
44

गदाधराने दागिने काढून चंद्रामणीच्या हवाली केले आणि चंद्रादेवीने ते ज्यांचे त्यांस परत केले. असे करताना प्रथम चंद्रेस वाईट वाटले, पण देवीसदृश सूनबाईस आपल्या घरात नांदत असताना पाहून तिचा शोकावेग ओसरला. उलट-

चंद्रमुखी नववधू देखुनीं चंद्रमणी धाली
गेहिं आपुल्या जणो गमे तिज उमादेवि आली ।।
हृदयीं दाटे प्रेम निरागस अवलोकुनि बाला
म्हणते, ' कोमल कांति लपविण्या भूषणेंहि हिजला ।।'
खिन्न होइ ती क्षणभर अपुलें चिंतुनि दारिद्र्य
मनीं म्हणे मग, ' मम पुत्राचें धन तें पावित्र्य ।।
पावित्र्याचे अलंकार या घालूं अमलेला
महती त्यांची जरी ना कळे अजाण जनतेला ।।
दिव्य गुणांच्या भूषणांनि ही शोभतसे अमला

हिच्या नेत्रिंच्या तेजा जगतीं आहे काय तुला ।।
कनकभूषणें शोभविती हिज डाग जेविं चंद्राला
अपार्थिव हिची कांति खुलविण्या भूषण पार्थिव हिजला ।।'

45

गदाईच्या विवाहानंतर चंद्रेस वाटले, ' आता गदाईने लग्नाची जोखीम पत्करली तेव्हा त्याच्या स्वैर वर्तनास आपसुखच आळा पडेल- त्याच्या स्मशानात जाणे, वगैरे गोष्टी साहजिकच बंद होतील.' या विचारांनी त्या माऊलीचा जीव भांड्यात पडला आणि तिने आपल्या लाडक्या पुत्रास कलकत्त्यास परतण्यास मुभा दिली.

गदाईचे लग्न होऊन आता सहा-सात महिने झाले. तो दक्षिणेश्वरी येऊन आपल्या कामावर रुजु झाला; देवीच्या पूजादिकार्यात रंगला. त्याचे दिव्य भाव जागृत झाले, आणि पूर्ववत देहगेहादिकांचे सारे भान लोपले. जगन्मातेच्या खंडरहित दिव्य साहचर्यासाठी त्याचा जीव फुटू लागला. देवीदर्शनातील एका क्षणाचाही खळ त्यास असह्य होई. अशा या दिव्य उन्मादाच्या वावटळीत सापडलेल्या गदाईस अनेक आध्यात्मिक अवस्थातून जावे लागले- अनेक अनुभव येऊ लागले. या कालखंडात पुरी सहा वर्षे त्याच्या डोळ्यांच्या पापण्या मिटल्या नाहीत ! त्या निष्कंप, निष्प्राण झाल्या होत्या ! डोळ्यात बोट घातले तरी त्या लवत नसत ! कधी काळी आपल्या या देहमनादींच्या अवस्थेचे त्यास भान झालेच तर त्याची त्यालाच भीती वाटे. आपणास वेडबीड लागणार नाही ना, म्हणून. शिवाय या काळातील आपल्या अनुभवाविषयी बोलताना पुढे परमहंसपदास प्राप्त झालेला गदाधर आपल्या शिष्यांस सांगत असेः

ध्यानिं बैसता शरीरांतुनी ये बाहेरी शूल घेउनी
विरागी युवा सांगतो मला ' देव मात्र तूं करी आपुला ।।
शिवावांचुनी अन्य चिंतितां शिरेल उरिं हें शूल तत्त्वतां '
मज दिव्य पथा तो प्रकाशुनी दावि सुरवरां वांछिल्या मनीं ।।
असा एकदां बसें चिंतनीं कृष्ण पुरुष मम देहामधुनी
ऊर्ध्वकेशि आरक्तहि नयनीं झिंगत येई मत्त होउनी ।।
एवढ्यांत ये मम सामोरी मत्सम संन्यासी बाहेरी
त्रिशूळ त्याच्या खुपसुनी उरीं पापपूरुषा मारि सत्वरी ।।

46

आपल्या शरीरातून आपल्यासारख्याच दुस-या एका व्यक्तीने बाहेर येऊन आपणास मार्गदर्शन करणे ही काही अश्रुतपूर्व घटना नव्हे; आणि अशा गोष्टींचा कार्यकारणभाव पण आपण उकलू शकतो.

आपले जे हे दृश्य, स्थूल शरीर आहे त्यास आपल्या अध्यात्मग्रंथात अन्नमय कोश ही संज्ञा दिलेली आहे. कोश म्हणजे आवरण. आत्म्याला आच्छादित करणारे हे स्थूल शरीर अन्नापासून उत्पन्न होते; अन्नावर पोसले जाते; आणि अंती दुस-याचे अन्न होऊन पशुपक्ष्यांकडून, कृमिकीटकांकडून वा पंचमहाभूतांकडून भक्षिले जाते. अतएव अन्नमय कोश हे त्यास दिलेले नाव अन्वर्थकच आहे.

या अन्नमय कोशाच्या आत प्राणमय (प्र अधिक आन्) कोश असतो. प्राण हा शब्द ' अन् ' या संस्कृत धातूवरुन आलेला आहे. ' अन् ' म्हणजे जगणे वा हलणे; आणि ' आन् ' (आनयति) म्हणजे जगविणे अथवा हलविणे - अर्थात् प्राण म्हणजे शरीरात राहून त्यास जगविणारी, क्रियाशील वा कार्यक्षम बनविणारी संचालक शक्ती. याच शक्तीस तिच्या विविध कार्यांनुरुप प्राण, अपान, व्यान, उदान व समान अशी नावे देण्यात येतात. या प्राणशक्तीचे रासायनिक (Chemical), प्राणी व वनस्पतीतील विद्युत् (Electrobiological), मानसिक (Psychic) व आध्यात्मिक (Spiritual) असे विविध आविष्कार होऊ शकतात.

आपल्या शरीरातल्या प्रत्येक पेशीत व तिच्या भोवती जी विद्युत्शक्ती असते तिला अध्यात्मशास्त्रात प्राणमय कोश म्हणतात. योगाभ्यासाने या विद्युन्मय प्राणशक्तीचे नियमन केल्यास इंद्रियातीत ज्ञानही आम्हास होऊ शकते, असा योग्यांचा दावा आहे.

सामान्य माणूस जागृती, स्वप्न व सुषुप्ती अशा या तीन अवस्थांतून जरी जात असतो तरी तो जागृतीतील ज्ञानच तेवढे ग्राह्य मानतो. इतर अवस्थातील अनुभव तो जमेस धरीत नाही; पण वेदान्त या तीनही अवस्थांतील अनुभवांचे ठोकताळे घेऊन त्यावर आपल्या तत्त्वांची उभारणी करतो.

मनुष्याच्या ठिकाणी वास करणारे, त्याच्या चित् (ज्ञान) स्वरुपास

झाकळणारे, जे अज्ञानाचे वा अविद्येचे पटल ते ' कारण-शरीर '. गाढ झोपेत जीव या शरीराशी तादात्म्य पावतो व त्यामुळे त्याच्या ठिकाणी ज्ञानाचा अभाव दिसून येतो. जरी वरकरणी हा निद्रिस्त जीव ज्ञानहीन दिसला तरी त्याच्यात ज्ञान असतेच असे काही मुलांवर केलेल्या प्रयोगान्ती दिसून आले आहे.

झोपेत असलेल्या मुलांच्या कानात काही पाठ मोठ्याने वाचून दाखविण्यात आले आणि नंतर असे आढळून आले की, ज्यांच्या कानात हे धडे वाचून दाखविले नव्हते त्यांहून ज्यांच्यावर हा प्रयोग करण्यात आला होता त्यांस हे लवकर पाठ होऊ शकले. यावरुन सुषुप्तीत ज्ञानग्रहणशक्ती पूर्णपणे लुप्त होत नाही असे आढळून आले. शिवाय झोपेतून जागा झालेला मानव मागल्या गोष्टी आठवतो, निद्रेतही आपले स्वत्त्व राखतो आणि निद्रापूर्वकालीन गोष्टींचा पुढील घटनांशी संबंध जुळवितो. यावरुन गाढ निद्रेतही ज्ञानाचा धागा अतूट राहतो हे सिद्ध नाही का होत? जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तीनही अवस्थांत वावरणारे, कधीही नाश न पावणारे, हे शुद्ध ज्ञानच आमचे मूळ स्वरुप होय.

आमचे इंद्रियजन्य जागृत्कालीन ज्ञान व्यवहारोपयोगी जरी असले, त्यावरच जरी आपली भिस्त असली, तरी ते तत्त्वदर्शनाच्या दृष्टीने अगदीच तोकडे व अविश्वसनीय ठरते.

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे प्रत्यक्ष वा इंद्रियजन्य ज्ञानाची प्रक्रिया अशीः आपणास गोचर होणाऱ्या प्रत्येक पदार्थातून अव्याहतपणे तरंग उठत असतात. त्यांचे आपल्या ज्ञानेंद्रियातील ज्ञानतंतूंवर आघात होतात. त्यामुळे संवेदना उत्पन्न होतात. या संवेदनांना मन जो अर्थ लावते तेच आमचे त्या पदार्थाविषयीचे ज्ञान. या प्रक्रियेतून आम्हाला कोणत्याही पदार्थाचे, त्याच्या खऱ्या स्वरुपात ज्ञान होत नसून, त्याच्यातून उठणाऱ्या तरंगांच्या आघातामुळे आमच्या ज्ञानतंतूंवर झालेल्या स्पंदांचे मात्र आम्हास ज्ञान होत असते. अर्थातच हे ज्ञान अशुद्ध व अपूर्ण असणार. याच ज्ञानावर सर्वसामान्य माणसे विसंबून राहतात.

विषयांशी इंद्रिये व मन संलग्न झाल्यामुळे जे विचार, विकार वासना, विकल्प वगैरे उत्पन्न होतात त्यांचा मनोमय कोश बनतो. आत्म्याभोवती लपेटले गेलेले हे जणु अन्नमय व प्राणमयासारखेच तिसरे

अस्तर होय. या मनोमयकोशाभिमानी (हा कोशच आपण मानणाऱ्या) जीवाचे ज्ञानही सदोष व विकृत होणे स्वाभाविकच आहे. पण ज्यांनी आपल्या जाज्वल्य तपाने, उत्कट वैराग्याने, ध्येयाविषयींच्या अप्रतिहत प्रेमाने मनाचे मंडन केले आहे, इंद्रियांचा संग सोडला आहे, अशा गदाधरासारख्या महाभागांना इंद्रिये व मन यांव्यतिरिक्त ज्ञानाची अन्य साधने प्राप्त होतात व त्यांच्या दिव्यदृष्टीस इतर प्राकृत जनांस, सूक्ष्म यांत्रिक साधनांच्याद्वारे देखील, अगम्य असे ज्ञान लाभू शकते. अर्जुनास झालेले विश्वरुपदर्शन, तसेच कैक साधुसंतांस झालेले व होत असलेले सगुण साक्षात्कार, ही याचीच उदाहरणे होत. इंद्रियाधिष्ठित व्यावहारिक ज्ञानाच्या पातळीवरुन विविध आध्यात्मिक साधनांच्याद्वारे दिव्य ज्ञानाच्या शिखरावर आरोहण करणाऱ्या साधकास उत्तरोत्तर श्रेष्ठ असे अनुभव येऊ लागतात आणि या अनुभवांबरोबरच नित्यनूतन अशी ज्ञानाची क्षितिजे त्यास प्रकट होतात. व्यापकतेबरोबरच त्याच्या दृष्टीत आमूलाग्र पालट घडून येतो. हे असे का घडावे ? थोडक्यात त्याची अशी मीमांसा करता येईलः

जीव जेव्हा विषयासक्तीचा त्याग करुन क्षुद्र मनोविकारांच्या पलीकडे जातो, इंद्रियजनित संवेदनांवरच विसंबून न राहता साऱ्या पदार्थांच्या बुडाशी असणारे त्याचे खरे स्वरुप पाहण्यास प्रयत्नशील राहतो, तेव्हा तो ' विज्ञानमय ' कोश धारण करुन वावरत असतो. ताक घुसळून लोणी काढावे तद्वत् मन व इंद्रिये यांस विवेकवैराग्याच्या रवीने घुसळून ' विज्ञान ' (विवेक संपन्न अनासक्तबुद्धी) वेगळे केले म्हणजे ते अतींद्रिय ज्ञानग्रहणास समर्थ होतें. मनइंद्रियांची अस्तरे नष्ट झाल्यावर मानवाच्या बुद्धीस विलक्षण धार येते; अंतःस्फूर्ती, दिव्यदृष्टी, दिव्यश्रुती इत्यादी त्यास प्राप्त होतात; आणि त्याचे मनच त्याचा गुरु होऊन त्याला मार्गदर्शन करते.

स्थूल शरीराहून लिंगदेह वेगळा आहे; तो स्थूल शरीर सोडून राहू - वावरु शकतो; त्याचे वजन होऊ शकते; फोटो घेता येतात; मध्यस्थांवाचूनही तो डायनॅमिस्टॅग्राफवरुन आपले विचार इतरांस विदित करु शकतो असे प्रयोगांती आपल्या भौतिकशास्त्रसंशोधकांनी आज निश्चित केले आहे. या सूक्ष्म देहद्रव्याला एक्टोप्लाझ्म (Ectoplasm) म्हणतात. हा पदार्थ ओलसर चिकट धुक्याप्रमाणे असतो व त्यापासून देह वा अवयव होऊ शकतात. हा पदार्थ अत्यंत सूक्ष्म परमाणूंपासून बनलेला असतो

व त्याच्या ठायी कोणतेही जड, दृश्य रुप घेण्याचे सामर्थ्य दिसून येते.

मरणकाली तर हे सूक्ष्म शरीर स्थूल देहाचा त्याग करुन जात असतेच; पण जिवंतपणी देखील ते स्थूल शरीरातून बाहेर येत असल्याची आम्हाला साक्ष मिळते.

नारळातील गर जसा एरवी करवंटीस चिकटून असतो पण त्यातील रस सुकल्यावर तो करवंटीपासून अलग होतो, तद्वतच माणूस पूर्ण निरासक्त झाला असता अथवा त्याच्या मनाला असह्य वेदना वा त्यावर प्रबल आघात झाले असता, हे लिंग शरीर स्थूल देहातून निसटते असे आजवर घडत असलेल्या घटनांवरुन आम्हाला दिसून येते. या विषयावर अनेक सत्यकथाही प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आपल्या प्राकृत मानसिक शक्तीवर गुरुपदिष्ट पारमार्थिक साधनांच्याद्वारे संस्कार करण्यात आल्यावर तिचे अतिमानसिक वा आध्यात्मिक शक्तीत रुपांतर होते; आणि असे झाले असता आमच्या स्थूल देहनिष्ठ मनाचे बंध तोडले जातात. स्थूल दृष्टीच्या सीमा ओलांडून आम्ही दिव्य दृष्टिसंपन्न होत असतो. हे साधण्यास आमच्या मानसिक (Psychic) शक्तीस एक विशिष्ट प्रकारचे वळण लावावे लागते. बाह्य विषयांकडे धाव घेण्याची तिची प्रवृत्ती, तिची व्यवहारोन्मुखता नष्ट करावी लागते. योग्य साधनांच्या द्वारे- वैराग्य, तप, आत्मचिंतन इत्यादी प्रयत्नांनी - मानसिक शक्तीवर जेव्हा दीर्घकालपर्यंत निरंतर आघात केले जातात तेव्हा ती विशिष्ट प्रकारे संचालित होते व तिचेच अंती आध्यात्मिक (Spiritual) शक्तीत रुपांतर होते. ही शक्ती जागृत झाली असता साधक अतिमानव होतो. त्याच्या मनइंद्रियादिकांतही पूर्ण पालट घडून येतो. त्यास दिव्य शरीर प्राप्त होते. तो ' आनंदमय ' कोशात राहतो. या स्थितीत त्याच्या दृष्टीस सर्व भौतिक वस्तूंतसुद्धा, एक चैतन्यच आत बाहेर भरुन असलेले दिसून येते. प्राकृत जनास जड व चैतन्य असा जो भेद दिसतो तो त्यास दिसत नाही. त्याच्या चर्मचक्षूंनादेखील- त्याच्या दिव्यभावापन्न उघड्या नेत्रांना सुद्धा- सर्वांभूती परमेश्वर स्पष्टपणे दिसतो. या दर्शनाबरोबरच त्याच्या हृदयात सतत आनंदोर्मी उठत राहतात (यत्र यत्र मनो याति का तत्र समाधयः।). म्हणून यास ' आनंदमय कोश ' ही संज्ञा दिली आहे. हा येथे मांडलेला

पंचकोशांचा विचार अगदी काटेकोरपणे मात्र घ्यावयाचा नाही.

स्थूल शरीरातून लिंगदेह (Double) निराळा होऊ शकतो, तो स्थूल देहस्थ मनाला अनेक प्रकारे मार्गदर्शन करतो, वगैरे विषयींचे प्रबळ पुरावे, या क्षेत्रात संशोधन करीत असता मिळाले असल्याचे आपण पाहतो. तेव्हा गदाधराच्या अंगातून गदाधरासारख्याच एका संन्याशाने बाहेर येणे, त्यास मार्गदर्शन करणे, वगैरे गोष्टी आम्ही समजू शकतो. पण या परमपवित्र, पावन पुरुषाच्या शरीरातून पापपुरुष कसा आला?

मनुष्याच्या ठिकाणी सुविचार व कुविचार, शुभ संस्कार व अशुभ संस्कार- ज्यांस गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी व आसुरी सम्पत् म्हणून वर्णिले आहे ते - असतातच. पण गदाधर जो देवाचा अवतार मानला जातो त्याच्या ठायी पूर्वजन्मींचे मानवी संस्कार कसे संभवतात ? त्याचा जन्म शुभेच्छेनेच - जगाच्या कल्याणास्तवच- झालेला, मग त्याच्यात अशुभ संस्कारांना वावच कुठे? या शंकेचे निरसन असे करण्यात येतेः

या शरीराला भोगायतन असे म्हणतात. पूर्वजन्मींची पुण्य वा पापकर्माची फळे भोगण्यासाठी, अतृप्त वासना पूर्ण करुन घेण्यासाठी, इहलोकी मानवाचे स्थूल देहात आगमन होते. या जन्माच्या आदल्या जन्मी अंतकाळी जी इच्छा बाळगून जीवात्मा स्थूलदेहाचा त्याग करतो त्या इच्छेनुसारच त्यास हा स्थूलदेह प्राप्त होतो. त्याने कैक जन्मांमधून अगणित कर्मे जरी केलेली असली तरी त्यातील काही कर्मेच- जी प्रस्तुत देही फळण्याजोगी असतील, तेवढीच - तो घेऊन येत असतो. अशा या कर्मांचे भोग त्याला चुकविता येत नाहीत. या जन्माबरोबरच, या देहासमवेतच, या कर्मांना फळावयास आरंभ झालेला असतो म्हणून त्यांस प्रारब्ध कर्मे म्हणतात. धनुष्यातून सुटलेला तीर जसा ज्या दिशेत त्यास गती मिळाली असेल त्याच दिशेत जात असतो, त्याचा रोख बदलणे अशक्य, तसेच प्रारब्ध कर्मदेखील पूर्वप्राप्त गतीनुसारच घडत जाणार- त्याच्यात बदल करणे असाध्य. म्हणूनच, आमच्या इच्छेविरुद्ध सुद्धा आम्हाला काही कर्मे करावी लागतात; काही भोग अटळ ठरतात. या भोगांस ' अनिच्छा ' भोग असे म्हटले आहे.

समजा, आम्ही सोडलेला बाण गतीत असताच अन्य कुणीतरी मारलेला बाण त्यास आदळतो, तेव्हा त्याची गती कुंठित होते वा तो अन्य

दिशेने तरी जातो; तद्वतच आपल्या इच्छाशक्तीच्या प्रभावाने अन्य कुणी महात्मा आमचे जीवन प्रभावित करु शकतो. अशा इतरांच्या इच्छेने आम्हास भोगावे लागणारे भोग ' परेच्छा' भोग होत.

जड व चैतन्य ही मूलतः अभिन्न आहेत. हे तत्त्व नीट समजल्यावर इच्छाशक्तीचे म्हणजेच चित्शक्तीचे तरंग वा स्पंद जडावर, इतरांच्या मनावर वा कर्मावर आपल्या आघातांनी विशिष्ट परिणाम वा बदल घडवून आणवू शकतील हे आम्हास सहज पटण्याजोगे आहे. हरिश्चंद्राच्या कथेत ' परेच्छा ' कशी कार्य करु शकली हे आपण पाहतो. खुद्द श्रीरामकृष्णांनी देखील पुढे आपल्या शिष्यांना वा भक्तांना केवळ इच्छेने, स्पर्शाने वा दर्शनाने जे विविध अनुभव प्राप्त करुन दिले, ती सारी याचीच उदाहरणे होत.

ईशावतारांच्या ठायी अनिच्छा भोग संभवत नाहीत; व परेच्छा भोग मानणे म्हणजे त्यास उणेपणा आणणे होय. स्वतःसाठी काही मिळवावयाचे नसूनसुद्धा केवळ परहित साधण्यासाठीच ते अवतरत असतात असे मानल्यावर इतरांची दुःखे, पापकर्मे, ते आपल्यावर स्वेच्छेनेच ओढवून घेतात असे मानणे क्रमप्राप्तच होते.

परमात्मा हा सर्व जीवांचा आत्मा. तो सर्वांच्या मनांचेही मन. सर्वांच्या आत बाहेर राहणारे सर्वव्यापक तत्त्व. तो जेंव्हा साकारतो तेव्हा सर्व मानव जातीचे कर्म- त्या कर्माचा अंश-घेऊनच खाली सदेह स्थितीत तो येतो, हे कर्म जर त्याने स्विकारले नाही तर तो खाली येऊच शकणार नाही. देह धारण केल्यावर देखील इतरांची पापे तो अंगीकारतो; बळेच आपल्यावर ओढून घेतो. श्रीकृष्णाने गोपींच्या घरचे दूध, दही चोरले ते याच हेतूने - त्यांची पापे आपल्या अंगी यावी म्हणून. सर्व अवतारी पुरुषांचे भोग ते असे ' स्वेच्छा ' भोग होत.

गदाधराच्या अंगातून येणारा दिव्य पुरुष त्यास अनेक गोष्टी शिकवी. ज्या देवदेवतांचे दर्शन आपणास घडावे असे गदाईस वाटे त्या त्या देवता- दिव्य ज्योतीचा त्यांवर एक प्रचंड झोत घालून हा पुरुष गदाईस दाखवी. हा पुरुष म्हणजे गदाईचीच आत्मशक्ती; व पापपुरुष म्हणजे गदाईने स्विकारलेली इतरांची पापे. ही पापे नष्ट करण्यासाठीच पापपुरुषाचा वध करण्यात आला असे मानणेच युक्तियुक्त वाटते.

परमात्म्याचे मन सर्वव्यापक असते; पण या मनाचा केंद्रबिंदू

अवतारी पुरुषांच्या ठिकाणी असतो. त्यांची इच्छाशक्ती प्रचंड असते. सर्वधर्मीयांच्या हितास्तव अवतरलेल्या गदाधराच्या ठायी विविध पंथ आक्रमिण्याची इच्छा उद्‌भवणे, आणि त्याच्या या बलशाली इच्छेमुळे त्या त्या पंथांमध्ये मार्गदर्शन करण्यास समर्थ अशा व्यक्तींनी त्याच्याकडे आकृष्ट होणे, हे स्वाभाविकच आहे. कारणः

योग्यता जरी हो अंगीं चालुनी ये गुरु स्वाङ्गी
चित्तवृत्ति ब्रह्मरंगीं अपुली रंगतां ।।
शिष्य मुमुक्षू असावा मोह विषयीं नसावा
आर्तत्वें आळवावा देव हृदिं सदा ।।
जें जें इंद्रियां गोचर तें तें सारेंही नश्वर
ऐसा ज्याचा भाव स्थिर गुरु वरी तया ।।
नम्र ज्याचा भावसदा जिंकिलें ज्याने दुर्मदा
अखिल त्यासी दे शारदा ज्ञानसंपदा ।।

47

नदी सागराकडे वाहते. समुद्र नदीच्या शोधार्थ जातो का? लहानाने मोठ्याकडे जावे; मोठ्याने लहानास आश्रय द्यावा हा जगाचा नियम. गुरुच्या लाभार्थ साधक व्याकुळ होतो; व शिष्याची तळमळ, योग्यता वगैरे पाहून गुरु त्याच्यावर अनुग्रह करतो; हाच आमचा आजवरचा अनुभव. पण गदाईच्या जीवनात मात्र आम्हास निराळाच प्रकार दिसून येतो. निसर्गाने देखील गदाईच्या बाबतीत आपल्या नियमांना फाटा द्यावा याचे आश्चर्य वाटते !

वास्तविक निसर्गाचे नियम अनुल्लंघनीय आहेत; आणि गदाधराच्या बाबतीत सुद्धा अन्यथा काही घडले नाही, हे आपल्याला सूक्ष्म विचाराअंती कळून येईल. गदाधराजवळ जेव्हा अनेक पंथातील मार्गदर्शक येऊ लागले तेव्हा गदाधराची योग्यता त्यांच्याहून तिळमात्रही उणी नव्हती हे आपण विसरता कामा नये. हे गुरु त्याच्याकडे येण्याआधीच त्याचे आध्यात्मिक शिक्षण वास्तविक उरकले होते. त्याला ईश्वरसाक्षात्कार झाला होता. जगदंबेने जे अनुभव त्यास दिले, त्याच्यामधील दिव्य पुरुषाने जे त्यास शिकविले, त्यालाच, त्या पूर्वसंपादित ज्ञानालाच, या गुरुंनी उजाळा दिला. त्यास ' नवीन ' असे काही सांगितले नाही, असे प्रत्यक्ष श्रीरामकृष्णांनींच आपल्या शिष्यांकडे बोलताना अनेकवार म्हटले आहे. गुरुच्या

मार्गदर्शनाविना सामान्य साधकास आध्यात्ममार्गात आपले अंतिम ध्येय साध्य करुन घेणे दुष्कर, हे दाखविण्यासाठी त्याने हे गुरु केले असावेत; अथवा गदाधर हा प्रत्यक्ष परमेश्वर- गुरुंचाही गुरु- हे जणू सुचविण्यासच असे घडले असावे.

एके दिवशी देवपूजेसाठी बागेत फुले तोडीत असता, गंगेच्या एका घाटावर पुस्तकांचे एक गाठोडे घेऊन नौकेतून उतरत असलेली मुक्तकेशा संन्यासिनी गदाधरास दिसली. भैरवी वेशातील या तपस्विनीने गदाईस ज्या मार्गाची दीक्षा दिली त्या मार्गास 'कौल' संप्रदाय असे म्हणतात. हे कौलसंप्रदायी लोक गुप्तपणे साधना करतात. या विषयी म्हटले आहेः

' अन्तः शाक्ता बहिः शैवा सभामध्ये च वैष्णवाः ।
नाना रुपधराः कौला विचरन्ति महीतले ।।'

' कौल ' साधक आतून शाक्त, बाहेरुन शैव व सभेत वैष्णव अशा विविध रुपात वावरत असतो. '

' कौल ' संप्रदायाविषयी जो आज अनादर दिसून येतो तो या पंथामध्ये अनधिकारी, असंस्कृत, विषयासक्त लोकांनी प्रवेश केल्यामुळे या ग्राम्य लोकांच्या बीभत्स आचारामुळे. वास्तविक कौलांची तत्त्वे उदात्त व आदरणीय आहेत. कदाचित् जनतेस हे दाखविण्यासाठीच गदाधराने हा मार्ग आचरला असावा.

' कुल ' म्हणजे शक्ती किंवा कुंडलिनी; आणि ' अकुल ' म्हणजे शिव. ज्या योगसाधनांच्या द्वारे कुंडलिनी शक्तीस जागृत करुन तिचे सहस्त्रारस्थित शिवाशी मीलन साधण्यात येते ती ' कौल ' साधने होत.

(कुलं शक्तिरितिप्रोक्तमकुलं शिव उच्यते ।
कुलेऽकुलस्य सम्बन्धः कौलमित्यभिधीयते ।।)

या ' कौल ' मार्गालाच कुलमार्ग किंवा वाममार्ग असेही म्हणतात. शक्ती शिवाच्या वामभागी असते व तिला या मार्गात प्राधान्य दिलेले असल्यामुळे या पंथास ' वाममार्ग ' असेही म्हणतात. हा वाममार्ग पाच ' म' कारांवर आपली सारी मदार ठेवतोः

' मद्यं मासं च मीनं च मुद्रा मैथुनमेव च ।
मकारपञ्चकं प्राहुर्योगिनां मुक्तिदायकम् ।।'

' मद्य, मांस, मीन, मुद्रा, मैथुन हे पाच मकार मुक्तिदायक होत असे योगीजन

सांगतात. '

या मकरांचे स्थूल वा वाच्य अर्थ येथे घ्यावयाचे नाहीत. ' मद्य ' याचा अर्थ येथे मदिरा वा सुरा नव्हे-

' व्योमपङ्कजनिस्यन्दसुधापानरतो नरः ।
मधुपायी समः प्रोक्तस्त्वितरे मद्यपायिनः ।।'

' सहस्त्रारातून झरणारे सुधाबिंदू जो पितो तोच खरा ' मद्यप ' , इतर केवळ दारुडे. ' खेचरी मुद्रेच्या योगाने योगी सहस्त्रारनिःसृत अमृत पीत असतात असे गंधर्व तंत्रात सांगितले आहे. हे सुधापान म्हणजे निरतिशय आनंदाचा आस्वाद घेणे होय.

तसेच पुण्य व पापरुपी पशूंना ज्ञानखड्गाने कापून जो साधक आपले चित्त परब्रह्मी लीन करतो त्यालाच ' मांसभक्षक ' म्हणावे-

' पुण्यापुण्ये पशुं हत्वा ज्ञानखड्गेन योगवित्
परे लयं नयेच्चित्तं मांसाशी स निगद्यते ।।'

आमच्या पाठीच्या कण्यातून - मणक्यांच्या रांगेतून - दोही बाजूंनी इडा व पिंगला नामक दोन नाड्या जातात. कौल साधक यांना गंगा व यमुना म्हणतात. यांमध्ये संचार करणारे श्वास व प्रश्वास हे त्यांच्या मते दोन ' मासे '. जो कौल कुंभक साधून प्राणवायूस सुषुम्ना नाडीमध्ये (इडा व पिंगला यांच्यामधून जाणाऱ्या नाडी) मध्ये प्रविष्ट करतो तो ' मत्स्यसाधक '- मीनभक्षक.

' गंगायमुनयोर्मध्ये द्वौ मत्स्यौ चरतः सदा ।
तौ मत्स्यौ भक्षयेत् यस्तु स भवेन्मत्स्यसाधकः ।।'

सत्संगाने मुक्ती व असत्संगाने बंध प्राप्त होतो. या बंधनात टाकणाऱ्या ' असत्संगाचा त्याग ' करणे हेच ' मुद्रण' - हेच मुद्राधारण.

' सत्संगेन भवेन्मुक्तिरसत्संगेषु बंधनम्
असत्संगमुद्रणं यत्तु तन्मुद्रा परिकीर्तिता ।। '

सहस्त्रारस्य शिवाशी कुंडलिनीचे, म्हणजेच सुषुम्नाद्वारे ऊर्ध्व मार्गाने जाणाऱ्या ' प्राणाचे ', मीलन हेच मैथुन. हा शिवशक्तिसंयोगातून मिळणारा आनंद, प्राकृत मैथुनानंदाच्या अनंतपटीने जरी मोठा असला तरी रतिसुखासक्त सामान्यजन स्त्रीसंभोगातच सारे सुख सामावलेले आहे असे मानीत असल्यामुळे, त्याहून श्रेष्ठ सुखाची त्यास कल्पनाच करवत

नसल्यामुळे, मैथुन हा शब्द येथे योजिलेला असावा.

आपल्या सुप्त आध्यात्मिक शक्तीचे (कुंडलिनीचे) उद्दीपन करणे व तिचा शिवाशी संयोग घडविणे हे या मार्गामधील प्रधान साधन असल्यामुळे, साहजिकच शक्ती उपासनेलाच महत्त्व अधिक. अतएव कौलांना शाक्त असेही म्हणतात. त्यांच्या मते शिव हा स्वयंज्योतिः, आद्यन्तरहित, निर्विकार, सच्चिदानंदरुप होय. सृजन - स्थिति- संहारादी क्रिया करणारी भोग- मोक्ष- प्रदात्री ती शक्तीच.

शाक्तांच्या मते भक्तांच्या पशू, वीर व दिव्य नामक उत्तरोत्तर श्रेष्ठ अशा तीन श्रेणी आहेत. आपले स्वत्त्व पूर्णपणे विसर्जून उपास्य (शिव अ शक्ती) देवतेमध्ये लीन होणे व अद्वयानंदाचा आस्वाद घेणे हा दिव्यभाव; हेच उद्दीष्ट.

दिव्यभावापन्न सिद्ध व्यवहार काळी- समाधीत नसताना- सर्व पुरुषांमध्ये शिव व स्त्रीरुपात शक्ती वा जगदंबा पाहतो. हे ध्येय गाठण्यास साधकास अनेक कठीण साधना कराव्या लागतात. चौसष्ट तंत्रामध्ये सांगितलेल्या सर्व साधना कोणाही एका व्यक्तीने साधिलेल्या आमच्या ऐकिवात नाही; आणि गदाधराने त्या साधीपर्यंत कोणाही एका साधकास त्या सर्वच्या सर्व एकाच जन्मामध्ये करता येतील असे वाटलेही नाही. पण या लोकोत्तर पुरुषाच्या जीवनात मात्र,

' असाध्य तें साध्य झालें । वांछिलें तें फळा आलें ।।
साधना तो अंङ्गीकारी । ठाकिती त्याच्या सामोरी ।।
जोडोनिया दोन्ही कर । सिद्धी अर्पीती सादर ।।'

असेच होत गेले. या काळी जी दिव्य दर्शने गदाधरास घडत त्यांची गणतीच नाही. स्थलसंकोचास्तव त्याने केलेल्या - किंबहुना त्याच्या कडून भैरवी ब्राह्मणीने करवून घेतलेल्या - या साधनांचे वर्णन करण्याचा मोह आवरावा लागतो. विवस्त्र युवतीच्या मांडीवर बसून जप करणे, नरमांस खाणे, शवाच्या कवटीमध्ये तळलेले मासे भक्षिणे - मोह घृणादी विकार उत्पन्न होऊ न देता- या व अशा इतर गोष्टींचा या साधनात समावेश झाला होता एवढे सांगितले म्हणजे पुरे. अशी ही साधने करण्यास जितेंद्रिय, भोगवितृष्ण असा थोर योग्यतेचाच साधक असावा लागतो हे काय सांगायला हवे ?

' परद्रव्येषु योऽन्धश्च परस्त्रीषु नपुंसकः ।

परापवादे यो मूकः सर्वदा विजितेन्द्रियः ।
तस्यैव ब्राह्मणस्यात्र वामे स्यादधिकारिता ।।'

' परद्रव्याच्या ठिकाणी अंध, परस्त्रीच्या संबंधात नपुंसक, परनिंदा वा परदोष यांविषयी मौन धारण करणारा व आपली इंद्रिये जो सदैव काबूत ठेवतो अशा ब्राह्मणालाच हा वाममार्ग आक्रमिण्याचा अधिकार पोहोचतो. ' या उक्तीवरुन तंत्रपथाची साधना किती उच्च भूमिकेवरुन केली जाते हे सहज लक्षात येईल. हा सर्व प्रपंच येथे केला तो तंत्राविषयींच्या आपल्या गैरसमजुती - विकृत कल्पना - घालविण्यासाठी.

गदाधराला देवीचे पुजारीपद ग्रहण करतेवेळी जी शक्ति- दीक्षा देण्यात आली होती, तदनंतर त्याच्याजवळ आलेली त्याची प्रथम गुरु म्हणजे ही भैरवी ब्राह्मणी.

येइ गंगातटीं भैरवी गोमटी ग्रंथभारा कटीं धरुनि घाटीं ।।
दिव्य मुखमंडळ नयनही निश्चळ ज्यांत भक्तीबळ व्यक्त होई ।।
वैष्णवी ब्राह्मणी थोर संन्यासिनी तंत्रपथदर्शिनी रामकृष्णा ।।
विविध जीं साधने उक्त ग्रंथांमध्ये घेइ करुनी स्वयें त्याजकडुनी ।।
नर नसे एकही साधि जो सर्वही तंत्रपथिं दर्शिलीं साधने जीं ।।
रामकृष्णा विना साधिलीं तीं कुणा म्हणुनि करि वन्दना मुक्तकेशा ।।
शिष्य न च कल्पिते अर्चना अर्पिते देव त्या मानिते अन्तिं त्यासी ।।

48

त्यावेळी दक्षिणेश्वरी साधुसंन्याशांची सारखी ये जा होत असे. मथूरबाबूंनी या विराग्यासाठी सर्व सोयी उपलब्ध करुन ठेवल्या होत्या. या साधूंच्या मेळ्यात एक रामायत पंथी अद्‌भूत वैरागी होता. त्याचे नाव जटाधारी. आपल्याजवळ सदैव तो एक बालरामचंद्राची मूर्ती बाळगी. तीस तो रामलाला म्हणे. या प्रतिमेच्या सेवेतून या एकान्तिक भक्तास बाल रामचंद्राचे सजीव दर्शन झाले होते. पण ही गोष्ट त्याने गुप्त ठेविली होती. गदाधरापासून मात्र जटाधारी ती लपवू शकला नाही.

रामलाला जटाधारी बाबाजींनी दाखविलेला नैवेद्य ग्रहण करी. त्याच्या बरोबर जेथे तेथे जाई. एखाद्या गोष्टींविषयी हट्‌ट धरी; आणि जटाधारी पण रामलालाच्या सेवेतच चूर होऊन असे.

पण हा रामलाला मग गदाधराकडे आकृष्ट झाला. सदान्‌कदा तो

गदाईच्या भक्तीच असावयाचा. जटाधारी बाबाजी याचा निःसीम भक्त आणि हा त्याचा पूजेचा देव. असे असून सुद्धा तो आता बाबाजीकडे क्वचितच जाई. गदाई आपल्या मागून येण्याची त्यास मनाई करी; तरी हा त्यालाच बिलगून असावयाचा. बरं, गदाधराच्या खोलीत कधी गप्प असे का बसत ? छे ! उलट त्याच्या अवखळपणाला गदाधराच्या सान्निध्यात जणू ऊतच यावयाचा. पाच मिनिटे स्वस्थ बसला तर शपथ ! चुळबुळ्या म्हणजे अगदी जगावेगळाच ! त्याच्या उनाडक्यांना वैतागून गदाधर कधी त्याला रागावी; कधी त्याच्या श्रीमुखात चापटी पण लगावी. एकदा तर गदाईने ' किती वेळ झाला तरी हा सारखा पाण्यात खेळतो आहे. किती विनवण्या केल्या, धमक्या दिल्या, तरी वर नाही येत ', असे पाहून त्याचे डोके पाण्यात दाबून ठेवले. बाळ गुदमरला. अशा स्थितीत त्याला पाहताच गदाधराचे हृदय पिळवटून निघाले. पश्चात्तापाने तो आपला धिःक्कार करु लागला. पुढे श्रीरामकृष्ण (गदाधर) या घटनांचा उल्लेख करीत असता कळवळून म्हणेः

रामलाला मी मारिलें गंगाजलीं त्या दाबिलें ।।
मन माझें कळवळतें हृदयही हळहळतें ।।
खेळतो तो गंगानींरीं बोलवितां न ये घरीं ।।
बहु खोड्या लाला करी धावे माध्याह्नीं बाहेरी ।।
भलता हट्ट करी खाण्याचा कोंबिला घास मुखीं पोह्याचा ।।
कोमल रसने करडे पोहे लागतां क्षणीं रुधिरहि वाहे ।।
नयनां मिचकावुनि तो दावी । हांसत हांसत मज वेडावित ।
अङ्गणी पळतची जाई ।।

49

1863 मध्ये गदाधराने तांत्रिक साधना उरकल्या. तथापि त्याची नवनव्या पंथांतून, वेगवेगळ्या भूमिकांतून, देवदर्शन घेण्याची तळमळ शमली नाही. क्रीडासक्त किशोरांची जशी लपंडावादिकांच्या ठायी आसक्ती दिसून येते तशीच अनेकवार अनेक प्रकारची देवदर्शने घडूनसुद्धा पुनश्च नव्या साधनांनी ईश्वर साक्षात्कार करुन घेण्याची त्याची उमेद पाहिल्यास क्षणभर वाटते, देवाने कृष्णावतारात गोपींशी क्रीडा केल्या, तशा या अवतारात त्याने देवाशीच क्रीडा करण्याचे योजिले असावे !

तांत्रिक साधने आटोपली. दास्य, वात्सल्यादी भावांच्या साधना

झाल्या. आता मधुरभावाची साधना करणे गदाईच्या मनाने घेतले. भावराज्याचे अधिपती श्रीचैतन्य महाप्रभू यांनी या मधुरभक्तीचा प्रसार केला होता. त्यांच्या मताचे वर्णन असे करण्यात आले आहेः

आराध्यो भगवान् व्रजेशतनयस्तद्धाम वृन्दावनं
रम्या काचिदुपासना व्रजवधूवर्गेण या कल्पिता ।।
शास्त्रं भागवतं प्रमाणममलं प्रेमा पुमर्थो महान्
श्रीचैतन्य महाप्रभोर्मतमिदं तत्रादरो नः परः ।।

नंदनंदन श्रीकृष्ण हाच भगवान. त्याचीच आराधना करावी. वृन्दावन (शिवलोक, विष्णुलोक वगैरे जसे आहेत तसाच सूक्ष्म जगतातील हा एक लोक; पृथ्वीवरील स्थूल रुपात दिसणारे वृन्दावन नव्हे.) हे त्याचे निवासस्थान. भगवत्प्राप्तीच्या साधनामध्ये गोपींनी केली तशी भक्ती करणे, हीच रमणीय व उत्कृष्ट साधना. श्रीमद्भागवत हा प्रमाण ग्रंथ; आणि अमला (शुद्धा, अहेतुकी) भक्ती हाच सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ; असे हे श्रीचैतन्य महाप्रभूंचे मत होय.....'

चैतन्यमत सांगते, भगवान अनन्त शक्तींनी जरी युक्त असला तरी त्याच्या मुख्य शक्ती तीनचः 1 स्वरुपशक्ती 2 तटस्थशक्ती व 3 मायाशक्ती.

1 स्वरुपशक्ती : सत्- चित् - आनंद स्वरुप परमात्मा आपल्या या शक्तीच्या द्वारे विश्वाच्या उत्पत्तीचे निमित्त कारण होतो. ही शक्ती त्रिविध आहे- ' संधिनी ', ' संवित् ' आणि ' ह्लादिनी '.

स्वतः अस्तित्त्व धारण करणे व विश्वातील सा-या वस्तूंस अस्तित्त्व प्राप्त करुन देणे, तसेच देश, काल व द्रव्य या सर्वांस व्यापून राहणे हा भगवंताच्या सदंशाचा आविष्कार; हे त्याच्या ' संधिनी ' शक्तीचे कार्य.

चित्स्वरुप परमात्म्याच्या ठायी स्वतः जाणण्याची व इतरांस ज्ञानयुक्त करण्याची जी शक्ती वास करते ती 'संवित् '.

परमात्मा स्वतः आनंदघन आहे व इतरांस आनंद देतो ते ह्लादिनी ' शक्तीच्या योगाने.

2. तटस्थशक्ती : परमात्म्याची ही शक्ती सर्व अणुरुपी जीवांच्या अभिव्यक्तीला कारण होते. हिला जीवशक्ती असेही म्हणतात.

3. मायाशक्ती : जड प्रकृती - सर्व अचेतन पदार्थ- ज्या शक्तीमुळे संभवतात. ती भगवंताची शक्ती.

स्वरुपशक्ती, तटस्थशक्ती व मायाशक्ती या तीनही मिळून भगवंताची ' पराशक्ती ' होते, भगवान आपल्या स्वरुपशक्तीने विश्वोत्पत्तीचे निमित्तकारण (प्रत्यक्ष कर्ता; जसा घटास कुलाल कारण) व दुसऱ्या दोन शक्तींनी उपादानकारण (जसे मडक्यास माती, मेजास लाकूड, खिळे वगैरे कारण) होतो.

' संवित् ' व ' ह्लादिनी ' शक्तींनी युक्त असा, ज्ञान व आनंद स्वरुपी भगवान भक्तीला वश होतो; कारण शुद्ध भक्तीचा ज्ञान व आनंद हा गाभा आहे; म्हणून एका अर्थी अमला भक्ती भगवत्स्वरुपिणीच होय. यासाठी या ' अमला भक्तीलाच ' चैतन्यमतात साध्य मानतात.

भक्ती म्हणजे प्रेम. जगातल्या अनेक व्यक्तींशी आपण अनेक प्रकारची प्रेमाची नाती ठेवतो; व अशा संबंधातून आनंद जोडतो. या आनंदामुळेच आम्हाला एखादी वस्तू वा व्यक्ती हवीशी वाटते. हे प्रेमसंबंध स्थूलमानाने पाच प्रकारचे असतात- शांत, दास्य, सख्य, वात्सल्य व मधुर - असे भक्तीग्रंथ प्रतिपादितात.

एखादी व्यक्ती असते. तिच्या विशेष गुणांमुळे तिच्या ठिकाणी आम्ही आकृष्ट होतो. तिजविषयी आम्हास आदर वाटतो. तिच्याशी तसा कोणताही विशिष्ट प्रकारचा संबंध नसला तरी तिजविषयी जिव्हाळा असतो. अशा या प्रीतीला शांतभक्ती म्हणतात.

मारुतिरायाची श्रीरामाच्या ठिकाणची भक्ती ती दास्यभक्ती अर्जुनाचे श्रीकृष्णप्रेम हे सख्यभक्तीचे उदाहरण. यशोदेची कृष्णावरची प्रीती ते वात्सल्य. रुक्मिणीची कान्ताभक्ती आणि राधेची ' मधुरभक्ती '. कान्ता आपल्या पतीची विविध भूमिकांतून विविध सेवा करते. तिच्या प्रेमात सर्व भावांचा समावेश होतो. मधुर भाव हा प्रेयसीचा. कान्तेच्या प्रेमाहून प्रेयसीचे प्रेम अधिक उत्कट मानले जाते. मधुरभावात प्रियकरावाचून - परमेश्वरावाचून - अन्य कशाचाच विचार नसतो. हे प्रेम कामगंधहीन असते. जेथे देहाचेच भान नाही तेथे कामास थाराच कोठे ? प्रियकराच्या सुखातच सुख (तत्सुखसुखित्वम्) अशी या प्रेमाची तऱ्हा. खऱ्या मधुरभक्तीच्या साधनेत आपले स्वतःचे असे वेगळे अस्तित्वही नकोसे होते. भगवच्चिंतनात आपल्या अस्तित्त्वाची जाणीव न जाणो व्यवधान आणील अशा भीतीने मन कातर होते, व्यथित होते. (तद्विस्मरणे परमव्याकुलता).

श्रीचैतन्यप्रणीत मार्गात, भगवान तेवढाच पुरुष व इतर सारे जीव व जड पदार्थ त्याच्या ' तटस्थ ' व ' माया ' शक्तींपासून उत्पन्न झालेले असल्यामुळे शक्तिरुप होत, म्हणजेच स्त्रिया होत, असे ते मानतात. तेव्हा भगवान श्रीकृष्ण आपला पती वा प्रियकर आणि आपण त्याची पत्नी वा प्रेयसी मानून त्याच्यावर शुद्ध प्रेम करणे हीच त्यांची मुख्य साधना. गोपींची, विशेषतः राधेची, कृष्णभक्ती ही आदर्शभक्ती-

' सर्वोपाधिविनिर्मुक्तं तत्परत्वेन निर्मलम्
हृषीकेण हृषीकेषसेवनं भक्तिरुच्यते ।।'

' सा-या उपाधींचा त्याग करुन, म्हणजेच मी विशिष्ट गुणांनी युक्त असा मानव आहे, पुरुष आहे इत्यादी भावना टाकून, भगंवतालाच आपले सर्वस्व लेखून, इंद्रियादींनी हृषीकेशाची निर्मल सेवा करणे, ही भक्ती होय. ' या व्याख्येत भक्तीचे कामगंधहीनत्व स्पष्ट दिसून येते. येथे, भक्ती करावयाची ती ' हृषीकेशाची '- जितेंद्रियाची - इन्द्रियसुखासक्ताची नव्हे. शिवाय, ही भक्ती म्हणजे ' निर्मल सेवा. ' सेवा या शब्दाने इतरांच्या सुखासाठी आदरपूर्वक केलेले कर्म असा अर्थ ध्वनित होतो. ही सेवासुद्धा निर्मल असावी. अर्थात्, ही सेवा करीत असता, सेवकाच्या मनात स्वतःच्या सुखाची अपेक्षा वा आशा मुळीच असता कामा नये. केवळ सेव्य पुरुषाच्या सुखासाठीच मन, इन्द्रियादिकांनी राबावे. अशा या हृषीकेशाच्या निर्मल भक्तीचे स्वरुप कामगंधहीन असे श्रेष्ठ साधकच जाणू शकतील; कामासक्तांना ते कसे आकलणार ?

महाभावमयी श्रीराधेच्याच कृपेने कृष्णदर्शन होऊ शकते असे ऐकल्यावरुन गदाधराने राधेच्या उपासनेनेच या साधनेचा प्रारंभ केला. राधादर्शन त्यास घडले व त्यानंतर सर्व सुखाचे आगर अशा श्रीकृष्णाचाही त्यास साक्षात्कार झाला.

या घटनेचे गदाधर वर्णन करतोः

कधीं न राधाकृपेवाचुनी । हो कृष्णाचें दर्शन म्हणुनी ।
राधाभजनीं लागतांही मी । दर्शन श्रीमति देई मजसी ।।
दर्शन देउनि मजमधिं शिरली । शिरुनि तिने वपु पूर्ण व्यापिली ।
तिथेंचि मग नयनाभिराम । श्रीकृष्णमूर्ति विरली ।।

मधुरभावसाधनाकाळी गदाधर स्त्रीवेश धारण करुन व्रजवधूभावाने स्त्रियांमध्ये बसे उठे; स्त्रियाप्रमाणेच बोले चाले एवढेच काय? ब्राह्मणी आदीस, त्याला पाहून, आपल्यामध्ये भावराज्याची सम्राज्ञी श्रीमती राधाच आल्याचा भास होई.

त्याकाळी राधाभावापन्न गदाधर कृष्णविरहाने व्याकुळ होई. विरहाग्नीने होरपळत असलेल्या त्याच्या शरीराला स्पर्श करणे सुद्धा अशक्य होत असे ! अंग जणू पेटत्या अंगा-यागत भासत असे ! बसल्या ठिकाणची जागा करपून जाई ! मधून मधून त्याच्या लोमकूपातून रक्त झिरपत असे ! काय ही अलौकिक अवस्था !

जड व चैतन्य यांत वस्तुतः फरक नाही. स्थूल शरीर- अचेतन वस्तू सुद्धा- केवळ साकारलेले, घनावलेले, चैतन्यच होय, हेच जणू सिद्ध करण्यासाठी या लोकोत्तर पुरुषाच्या शरीरात विलक्षण विक्रिया घडून येत असाव्या ! हनुमद्भावाने साधना करीत असता जसे यास शेपूट फुटले, तसेच स्त्रीवेश धारण करुन राधाभावाने कृष्णाला आळविणा-या याला स्त्रियांप्रमाणे मासिक स्त्रावही होऊ लागला ! कोण आश्चर्य ! गदाधराचा भाचा हृदयराम या काळच्या आपल्या मामाच्या स्थितीचे वर्णन करतो-

राधाप्रेमीं वृत्ति रंगली । राधारुपीं लीन जाहली ।
पृथगस्तित्वा सांडुनि अपुल्या । मधुरभक्ति साधिली ।।
व्रजेश्वरी राधेच्या ठायीं । आणिक गौरांगाच्या कायीं ।
भाव दिसति ते उमटति सारे । गदाइच्या गात्रीं ।।
स्वाधिष्ठानाच्या भागांतुन । रक्तस्त्राव प्रतिमासिं तीन दिन ।
नियमित होत असे हें पाहुन । विस्मित हो मम मन ।।

51

मधुरभावसाधनेनंतर गदाधराने साधना केली ती अद्वैताची. अद्वैत तत्त्वज्ञान हे वेदान्ताचे अत्युच्च शिखर. ज्या ज्ञानाने जीव ब्रह्मरुप होतो- सर्वाधार, सर्वरुप व सर्वातीतही होतो. ते अद्वैतज्ञान-अद्वैतमताची तत्त्वे अगदीच संक्षिप्तात सांगावी म्हणजे अशीः

1. आत्मा तेवढाच सत्य. तो एकमात्र आहे; त्याच्यावाचून अन्य काहीही नाही. आत्मा म्हणजेच ब्रह्म.

2. आत्मा हा ज्ञानस्वरुप आहे. ज्ञानगुणवान (ज्ञान हा गुण

असलेला) नव्हे. आनंदस्वरुप आहे; आनंदगुणवान नव्हे. ' परमार्थतः ' त्याला ज्ञातृत्व नाही. तो निर्विशेष व निर्गुण आहे.

3. आत्मा नित्य आणि एकमेवाद्वितीय म्हणजेच स्वगत, सजातीय व विजातीय भेदरहित आहे. एकाच शरीराच्या निरनिराळ्या अवयवांमधील भेद तो स्वगतभेद. एकाच जातीच्या वा प्रकारच्या वस्तूंत वा प्राण्यांत (उदा. दोन दगडांत किंवा दोन गाईंत) जो भेद दिसून येतो तो सजातीय भेद. भिन्न जातींच्या वा प्रकारच्या वस्तूंतला वा प्राण्यांतला (उदा. झाड आणि कोल्हा यांतील) जो भेद तो विजातीय भेद. तात्पर्य, आत्मा निरवयव आहे. तसेच तत्सदृश वा त्याच्याहून भिन्न असे काहीच नाही.

4. परमात्म्याच्या ठिकाणीच माया नामक उपाधीमुळे ईश्वर व अविद्यानामक उपाधीमुळे जीव प्रतीत होतात. जड सृष्टी तर केवळ प्रातिभासिक आहे. म्हणून ईश्वर, जीव व जड सृष्टी यांना स्वतंत्र असे अस्तित्त्वच नाही.

5. परमार्थतः दोन तत्त्वे आहेत असे मुळी सिद्धच करता येत नाही. पण व्यवहारात द्वैत प्रतीत होते. याचा मेळ घालावा कसा ? या प्रश्नाचे एकमेव उत्तर म्हणजे, ' जग केवळ दिसते म्हणूनच ते सत्य मानता येत नाही. ' ' असणे ' आणि ' दिसणे ' यात महदंतर आहे. शिवाय, आपले इंद्रियजन्य ज्ञान सर्वथैव विश्वसनीय आहे असे कुणीच म्हणू शकणार नाही. इंद्रिये आम्हास कैक प्रसंगी फसवितात हा सर्वांचाच अनुभव. ब्रह्मात्मैक्य ज्ञानानंतर हे जग तर टिकतच नाही. असे हे जग मिथ्याच म्हणावे लागेल. तेव्हा वस्तुतः ' एकमेवाद्वितीय ' अशा आत्मतत्त्वाच्या ठायी असणाऱ्या अचिन्त्य अनिर्वचनीय शक्तीमुळे एकाच्या ठिकाणी अनेकत्त्व भासते असे मानणे क्रमप्राप्त आहे.

' अव्यक्तनाम्नी परमेशशक्तिरनाद्यविद्या त्रिगुणात्मिका या ।
कार्यानुमेया सुधियैव माया यया जगत्सर्वमिदं प्रसूयते ।। '

' जी परमात्म्याहून वेगळी नसूनही भिन्न असल्यासारखी भासते, जिला अव्यक्त म्हणतात, जी अविद्यारुप (ज्ञानाला प्रतिबंध आणणारी) असून त्रिगुणमयी आहे, जी या विश्वाला प्रसवते अशा या परमात्म्याच्या शक्तीचे अस्तित्त्व, ज्ञानी जनांनी तिच्या (जगरुपी) कार्यावरुन ताडले पाहिजे. मायेचे कार्य जे हे जग, त्याच्यात ज्ञान (सत्त्व), वेग वा

क्रियाशीलता (रज) आणि जडत्व (तम) असे हे तीनच गुण प्रतीत होत असल्यामुळे त्रिगुणमयी म्हणतात. ज्ञान हा गुण प्राण्यात प्रकर्षाने दिसतो. वेग विजेत (Electricity) वगैरे आढळतो, आणि जडत्व सा-या अचेतन पदार्थात दिसून येते. या तिहींपैकी एकही गुण नसलेली वस्तू विश्वात सापडावयाचीच नाही. (ब्रह्माच्या) ठिकाणी जग भासमान होते. याला ' विवर्त ' असे म्हणतात. तात्त्विक परिवर्तन झाल्यास ' विकार ' (तात्त्विकोऽन्यथाभावः) व अतात्त्विक परिवर्तनाने (अतात्त्विकोऽन्यथाभावः) ' विवर्त ' होते. जसे दही दुधाचा विकार होय; रज्जुच्या जागी भासणारा सर्प हा रज्जूचा ' विवर्त '.

हे जग ब्रह्मात्मैक्यज्ञानानंतर टिकत नाही, गाढ झोपेत भासत नाही, महाप्रलयकाळी उरत नाही; म्हणून त्यास ' असत ' म्हणावे तर ते जागृतीत व स्वप्नात भासते. बरे, भासते म्हणून सत्य म्हणावे तर त्याला अबाधित अस्तित्त्व नाही. सत्य म्हटले की त्याच्या अस्तित्त्वाला खंड येऊ नये. ' आदौ अन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा । ' जन्माअगोदर आणि मरणानंतर जे असत नाही ते मध्यंतरी दिसत असले तरी असत्य जाणावे', या सिद्धांतानुसार जग सत्य होऊ शकत नाही. मातीपासून झालेले मडके मातीतून येते व अंती मातीतच जाते आणि मध्यंतरी मडक्याच्या रुपात देखील मातीच असते. हे सर्व विक्रियात्मक वस्तूंनी भरलेले जग ज्या मूल तत्त्वापासून आले ते तत्त्व कोणते? शून्य असेल तर हे जगदेखील शून्यच म्हणावे लागेल. शून्य म्हणजे अभाव. अभावातून भावरुप जग उपजतेच कसे ? या जगाच्या बुडाशी कोणते तरी सत्तत्त्व असल्यावाचून जगरुपी विवर्त होणे संभवत नाही. सत्तत्त्वालाच आत्मा किंवा ब्रह्म म्हणतात; आणि मायेला ' सदसद्भ्याम् निर्वचनीयरुपा भावरुपा च।' असे म्हटले आहे. सद् व असद् यांहून विलक्षण म्हणून अनिर्वचनीय आणि तिचे जगरुपी कार्य भासते, दिसते म्हणून माया भावरुप. मिथ्या हा शब्ददेखील हे अनिर्वचनीयत्वच दर्शवितो.

6. ' ब्रह्म सत्य जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।' ' ब्रह्म मात्र सत्य, जग मिथ्या; जीव ब्रह्मच आहे, अन्य कुणीही नाही.' जग आणि जीवच काय? वेदवेदान्तदेखील मिथ्याच. तरी पण वेदान्त विचाराने ज्ञानविरोधी अविद्येचे पटल काढता येते; काट्याने काटा काढावा तद्वत्. अविद्यान्तर्गत अशा नित्यानित्यवस्तुविवेकादींनी अज्ञाननिवृत्ती होते व जीव आपल्या

ब्रह्मस्वरुपात स्थित होतो. वायू आकाशास मेघसंकीर्ण करतो; पुन्हा तोच ते निरभ्र करतो. तसेच परमात्मशक्तीच जीवाला बद्ध करते व तीच पुनः मुक्त करते.

ब्रह्मात्मैक्यज्ञानांत स्थिर झालेला जीव देहात असूनसुद्धा मुक्तच होय. या मतात जीवन्मुक्ती मानली जाते. शरीरपातानंतर जीवन्मुक्तास विदेहमुक्ती प्राप्त होते.

7. विवेकवैराग्ययुक्त, शमदमादिसम्पन्न अशा साधकाने ब्रह्म जाणण्याची इच्छा धरुन चार उपनिषद् वाक्यांचे चिंतन करावे. यांना महावाक्ये म्हणतात. ती वाक्ये अशीः

1. तत्त्वमसि (छांदोग्य उपनिषद्) ते (ब्रह्म) तू आहेस.

2. अहं ब्रह्मास्मि (बृहदारण्यक उप.) मी ब्रह्म आहे.

3. प्रज्ञानं ब्रह्म (ऐतरेय उप.) प्रज्ञान हेच ब्रह्म होय.

4. अयमात्मा ब्रह्म (मांडूक्य उप.) हा आत्मा ब्रह्म होय.

या चारही महावाक्यांचा मतितार्थ एवढाच की जीव हा स्वरुपतः चैतन्यच असल्यामुळे ब्रह्माहून अभिन्न आहे. त्याच्यात भासणारे गुणदोष औपाधिक असल्यामुळे त्याच्या ख-या स्वरुपाला त्यांपासून लवमात्रही बाधा येत नाही. जीव वस्तुतः चित्स्वरुप व मुक्तच आहे. पण त्यास परवशता, दुःख वगैरे प्राप्त झाली ती अज्ञानामुळे. अज्ञानाचा नाश ज्ञानानेच होतो. आपण शुद्ध- बुद्ध- मुक्त स्वभाववान आहे हे ज्ञान दृढ व्हावयास वरील वाक्यांचे नित्य श्रवण, मनन व निदिध्यास करणे अत्यावश्यक आहे.

महावाक्याचे मनन करावयाचे असल्यास त्या वाक्यांचा नीट अर्थ नको का प्रथम लावायला? आणि तो अर्थ युक्ती व अनुभूती यांच्याच अनुरोधाने केला पाहिजे हे तर कोणीच नाकबूल करणार नाही.

आपल्या ज्ञानाचे वा अनुभूतीचे विविध प्रकार नि स्तर असतात. सर्वसाधारण माणसाची ज्ञानाची साधने म्हणजे इन्द्रिये, व अनुभूतीची अवस्था म्हणजे जागृत्. इन्द्रिये स्वभावतः बहिर्मुख असल्यामुळे त्यापासून होणारे ज्ञान बाह्य जगाचेच असते; तेही अपुरे नि फसवेच. हे जाणून एखादाच तत्त्वजिज्ञासू अन्तर्मुख होतो व अतीन्द्रिय आत्म्याची ओळख करुन घेऊन अमरपद मिळवितो. असे तत्त्वज्ञ म्हणतात.

तत्त्वमीमांसा करीत असता विश्वाच्या बुडाशी असणा-या तत्त्वाचा

शोध करु इच्छिणा-यांनी ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या तिन्हींच्याही स्वरुपाचे अवलोकन करुन तदनुरोधानेच आपले सिध्दान्त मांडावे. हे जग दिसते म्हणून ते सत्य मानण्याची भूमिका अगदीच प्राकृत जनांची. या जगाचे स्वरुप उकलू पाहणारा जो मी, त्या माझे स्वरुप काय? मी- ज्ञाता- म्हणजे कोण? माझ्या ज्ञानाचे स्वरुप काय? ते निर्दोष आहे का? विश्वसनीय आहे का? या सर्व गोष्टींचा निस्पृहपणे- सर्वप्रकारच्या पूर्वग्रहांपासून अलिप्त राहून विचार केला पाहिजे. केवळ ' चक्षुर्वै सत्यं ' मानणे मंदबुद्धींनी- तत्त्वचिकित्सा करणा-यांनी नव्हे. तत्त्व जिज्ञासूंनी समस्त अवस्था समग्र अनुभव ध्यानी घेऊनच त्यातून निघणा-या निष्कर्षांवरच आपल्या तत्त्वांची उभवणी केली पाहिजे.

' मी ब्रह्म आहे ' इत्यादी उपनिषद् वाक्यांचा अर्थ लावताना तो इन्द्रिय मनातीत जे अनुभव असतात त्यांच्या अनुषंगानेच लावावयाचा असतो. निदान जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांचा साक्षी होऊन सर्वशोधी दृष्टीने या वचनांचे रहस्य हेरावयास हवे. केवळ स्थूल दृष्टीने या उक्तींचा वाच्यार्थ तेवढा घेऊ नये. कारण अनात्म, जड सृष्टीहून जे भिन्न आत्मतत्त्व ते अभौतिक, अतिमानस अशा दिव्य दृष्टीसच ज्ञात होणार. म्हणून जागृत्, स्वप्न व सुषुप्ती यांना साधणा-या,सर्व अवस्थांचे अधिष्ठान , आधार होऊन राहणा-या, निर्विकल्प स्थितीच्या अनुभवावर आधारलेले ज्ञानच मनुष्यास अधिक विश्वसनीय होऊ शकते, असे या पंथाचे मत आहे. जागृतादी अवस्थांमध्ये स्थूलादी शरीरांशी देहात्मभाव ठेवणारे अविद्येचे आवरण असते. ते निर्विकल्पस्थितीत प्रायः नष्ट होते. म्हणून येथे वृत्ती आत्माकार होते.

बहिर्मुख चित्तवृत्ती जशी बाह्य विषयाकार होते तशीच अन्तर्मुख अन्तकरणवृत्ती आंतरविषयाकार होणार, हे साहजिकच आहे. सुखदुःखादी अन्तःकरणाचे धर्म व मुख्यतः साक्षीरुपाने राहणारा चित्स्वरुप आत्मा हे आन्तरविषय. ज्ञानस्वरुप आत्मा अजड, निराकार असल्यामुळे देश, काळ व वस्तू यांनी अपरिच्छिन्न असतो. अशा अखंड आत्म्याला विषय करणारी वृत्तीसुद्धा अखंड- अपरिछिन्न होणार. हिला ' अखंडाकार ' वृत्ती म्हणतात. वृत्तीने ' अखंड' होणे म्हणजे स्वतःच स्वतःला विरोध आणणे - स्वतःचा नाश करणे. साकाराने निराकार होणे, विषयाकार वृत्तीने आत्माकार होणे,

म्हणजे स्वतःचा स्वतःच नाश करणे नव्हे काय? जड, अनात्म वस्तू आकारवान, परिछिन्न असतात; आत्मा निराकार. आत्म्याला आकार नसला तरी त्याला विषय करणाऱ्या वृत्तीला ' आत्माकार ' किंवा ' अखंडाकार ' म्हणतात. आकार कधीच अखंड- अपरिछिन्न असू शकत नाही. तरी पण असा शब्दप्रयोग करण्यात येतो तो एवढ्याचसाठी की ही वृत्ती उठली असता साऱ्या इतर वृत्तींचा, दृश्याचा आणि अखिल वृत्तीचें अधिष्ठान होऊन राहणाऱ्या अविद्येचा देखील नाश होतो हे सुचविण्यासाठी; पुनः तेथे एखादी आकारवान वृत्ती असते, असे कुणी मानू नये.

वृत्ती अखंडाकार किंवा आत्माकार झाली असता जगाचे भान नाही का होत? असे कोणी विचारील. याला उत्तर असे की जग दिसते- पण ते ब्रह्मरुप दिसते. जग, जगरुपाने सत्य आहे असे कोणत्याही अवस्थेत ज्ञान्याला दिसत नाही. ज्ञान्याच्या दृष्टीने जड - चैतन्य; मी- तू; सुख- दुःख यातील भेद लुप्त होतात. त्याला द्वंद्वातीत अवस्था प्राप्त होते. पण तो व्यावहारिक जगतात **' न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ।। '** हे सूत्र लक्षात ठेवून वावरत असतो. त्याच्या दृष्टीने कर्ता, कर्म व करणे ही त्रिपुटीच ब्रह्ममय होते.

मनुष्याला ' मी जीव आहे, मर्त्य आहे, दुःखी आहे, ' अशा प्रकारची जी सदैव जाणीव असते ती आत्म्याच्या ' अविद्यारुप ' उपाधीमुळे. पण ही वृत्ती अखंडाकार झाली असता ती आत्म्यालाच विषय करीत असल्यामुळे अविद्योपाधीचा पूर्ण नाश होतो.

उदाहरणार्थ, दोरखंडाच्या ठिकाणी साप दिसतो; कोठवर? दोरखंडाचे ज्ञान होईपर्यंतच. रज्जुवृत्तीने सर्पवृत्तीचा अवश्य नाश होतो आणि तो कायमचा होतो. तसेच आत्मज्ञानाने मनुष्य आपण ब्रह्मस्वरुप असल्याचे जाणतो व अमर होतो. म्हणून साधकाने ' अहं ब्रह्मास्मि' इत्यादी महावाक्यांचे अहर्निश मनन करुन अन्तःकरणाची 'देहोऽहं ' वृत्ती नष्ट करावी, अखंडाकारवृत्ती साधावी आणि याच देही मुक्तिसुख अनुभवावे. या मतात जीवन्मुक्ती मानतात. जीवन्मुक्तास देहपातानंतर विदेहमुक्ती मिळते.

अद्वैत मतात सहा प्रमाणे मानतात. त्यातील प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीन मुख्य होत. प्रमाण म्हणजे यथार्थ ज्ञानाचे साधन. इन्द्रियसंनिकर्षाने होणारे यथार्थ ज्ञान ते प्रत्यक्ष ज्ञान. आपले सगळे व्यवहार केवळ याच

ज्ञानावर अवलंबून नसतात. उदाहरणार्थ, आम्हाला एखाद्या ठिकाणी दुरुन धूर दिसतो; पण आग नाही दिसत. तरी पण आपण म्हणतो, ' तेथे आग लागली असावी. ' हे जे आम्हास विस्तवाचे ज्ञान होते ते अनुमानाने. समजा, आम्हास विस्तवाच्या ठिकाणी जावयाचे आहे; पण गाव अपरिचित असल्यामुळे अग्निस्थानाकडे जाण्याची जवळची वाट अवगत नाही; म्हणून आम्हाला जवळपास असलेल्या व्यक्तींमध्ये जी विश्वसनीय वाटते तिला आम्ही रस्ता विचारतो नि तिच्या सल्ल्यानुसार मार्गक्रमणा करतो. तसेच एखादा सत्यनिष्ठ, विरागी– धनमानादी कशांचीच कुणाकडूनही अपेक्षा न करणारा– पण आमचे हित इच्छिणारा असा पुरुष आम्हाला सांगतो, ' मला आत्मसाक्षात्कार झाला आहे. त्या आत्म्याचे दर्शन मी तुम्हाला घडवून देऊ शकतो. त्या दर्शनाने तुम्ही कृतकृत्य व्हाल; अमर व्हाल. मात्र माझ्या उपदेशानुसार तुम्ही वागले पाहिजे' अशा या आत्मनिष्ठ, अकामहत, श्रुत्यर्थ जाणणाऱ्या, सत्यापासून न चळणाऱ्या महात्म्याचे वचन, ते शब्दप्रमाण. वेदान्तर्गत महावाक्ये (अहं ब्रह्मास्मि वगैरे) अशीच वचने होत. म्हणूनच त्यांना प्रामाण्य येते. ही वाक्ये अतीन्द्रिय आत्मतत्त्वाचे ज्ञान करुन देतात.

' अहं ब्रह्मास्मि ' इत्यादी वेदवचने, ज्यांना आपण मंत्र म्हणतो ते, अतिमानस स्थितीत असता योगीजनांना होणारे अतीन्द्रिय ज्ञानाचे अविष्कार होत. कधी हे मंत्र ज्योतिर्मय अक्षरात दिसतात, तर कधी एखाद्या दिव्य व्यक्तीकडून असे हे ज्ञान दिले जाते. कधी दिव्य अनुभूती घडविणाऱ्या, सूक्ष्म, इन्द्रियातीत जगतातील विविध घटना दिसू लागतात. योग्याचे मन जेव्हा प्रकृतीच्या तीनही मलिन गुणांच्या- एकमेकात मिसळलेल्या अशा सत्त्व, रज व तमांच्या - अतीत जाते, शुद्धसत्त्वमय (ज्यात रज व तमाचा अंश नाही असे) होते, तेव्हा ईश्वरी विचाराचे, विराट पुरुषाच्या सर्वव्यापी, सर्वातीत, सर्वज्ञ मनात (Cosmic mind) उठणाऱ्या नादतरंगाचे (Sound-vibrations) रुपतरंगाचे (Vibration of light), ग्रहण करण्याचे त्यास सामर्थ्य येते. कैक वेळा सूक्ष्म जगतातील अनेक प्रकारच्या व्यक्तींची दर्शने सुद्धा घडतात. सूक्ष्म शरीरधारी अनेक देवदेवतांची (इन्द्रवरुणादी) किंवा मानवांची देखील. पण शुद्धसत्त्वापन्न मनास होणारे सगुण ईश्वराचे दर्शन, त्याच्याकडून होणारे मार्गदर्शन, निराळे. तेच या

विवेचनात अभिप्रेत आहे.

वरील विवेचनावरुन दिसून येईल की उपरिनिर्दिष्ट महावाक्ये एखाद्या व्यक्तीचे वा मनुष्याचे मत प्रतिपादीत नसून ती साक्षात् परमात्म्याचीच वचने होत. किंबहुना परमात्माच एखाद्या अतिमानवाला माध्यम करुन हे अतीन्द्रिय ज्ञान देत असतो. वेद हे ज्ञान देण्यासाठीच प्रकटले आहेत; आणि हे ज्ञान कोणाही माणसाचे नव्हे म्हणून वेदांना अपौरुषेय- पुरुषापासून उत्पन्न न झालेले म्हटले आहे.

वेद अपौरुषेय म्हणून प्रमाणग्रंथ मानले तरी त्यातील सर्वच विधानांना प्रामाण्य येत नाही, असे अद्वैतमताचे अध्वर्यू श्रीशंकराचार्य यांचे मत आहे. आपल्या भाष्यात ते म्हणतात–

' श्रुतिश्च नः प्रमाणं अतीन्द्रियविषयविज्ञानोत्पत्तौ ' (ब्रह्मसूत्रभाष्य 2-3-9)

' श्रुतिश्च नोऽतीन्द्रियार्थविषये विज्ञानोत्पत्तौ निमित्तम् ।'

(तैत्तिरीय उपनिषद्भाष्य 2-6)

' वेद हे आम्हास अतींद्रिय विषयांचे ज्ञान करुन घेण्याचे साधन आहेत. ' त्यांचे क्षेत्र तेवढ्यापुरतेच.

प्रत्येक माणसाला आपापल्या क्षेत्रातच प्रामाण्य असते; जसे कर्णेन्द्रियाला शब्दाच्या बाबतीत. (**स्वविषयशूराणि हि प्रमाणानि श्रोत्रादिवत् ।**) एक प्रमाण दुसऱ्या प्रमाणाला विरोध करु शकत नाही. (**न च प्रमाणं प्रमाणान्तरेण विरुध्यते ।**) अतएव इतर प्रमाणांच्या कक्षेत येणाऱ्या गोष्टींविषयी जर काही त्या प्रमाणास विरोध आणणारी वचने श्रुतीत असतील तर ती ग्राह्य होणार नाहीत. हे आचार्यांचे मत अत्यंत युक्तियुक्त दिसते.

' मी ब्रह्म आहे ' इत्यादी उपनिषद्वाक्ये जरी प्रमाणभूत असली तरी त्यांचा नीट अर्थ लावणारा आत्मदर्शी, निष्काम, परोपकाररत असा महामना गुरु हवा. त्याच्या मार्गदर्शनात साधने करावयाला हवीत. ईशसंकेतानुसार असेच एक साक्षात्कारी पुरुष दक्षिणेश्वरी आले. गदाधरास पाहताच त्याच्याकडे आकृष्ट झाले; कारण गदाईच्या अन्तर्मूख, अर्धोन्मीलित नेत्रातून चमकणारे आनंद किरण त्याच्या उच्च आध्यात्मिक अवस्थेची त्यांस साक्ष देत होते.

' अद्वैताची दीक्षा घेतोस का? ' वात्सल्यपूर्ण स्वरात तोतापूरी - हे

अद्वैतपंथी साधू- गदाधरास म्हणाले.

गदाधर बुचकळ्यात पडला. अशा एकाएकी विचारण्यात आलेल्या या प्रश्नाचे उत्तर अगदीच अनोख्या व्यक्तीस कसे व काय द्यावे ? व्यक्ती थोर दिसते खरी; पण अगदीच अपरिचित व्यक्तीस गुरु मानावे कसे? तो अकामहत, ब्रह्मनिष्ठ वगैरे असल्याची ग्वाही कोण देणार? शिवाय, गदाधराचे आता ' मीपण', 'माझेपण' पूर्ण मोडले होते. सर्व गोष्टी कालीमातेच्याच सल्ल्याने तो करी.

गदाधर म्हणाला, ' आईला विचारतो.

तोता हसले. हे चमत्कारिक (!) उत्तर मिळताच कौतुकाने म्हणाले, ' जा. विचारुन ये आईला. थांबतो मी तोवर. '

आपले एकमेव श्रद्धास्थान असलेल्या कालीमातेकडे गदाईने धाव ठोकली.

' मीच आणले आहे या यतीला. अवश्य दीक्षा घे याजकडून, ' जगदंबा उत्तरली.

गदाधराच्या आनंदाला आता पारावर राहिला नाही. आला धावत तोतापुरींकडे. पुढे तो अद्वैतात दीक्षितही झाला. त्याची कथा अशीः

दक्षिणेश्वरीं कालिमंदिरीं येती तोतापुरी
विवस्त्र साधू नागपथाचे विरक्त नरकेसरी ।।
अन्तर्मुख नयनांते देखुनि पुसति गदाईतें
होशिल का दीक्षित अद्वैतीं भवाब्धि तरण्यातें ।।
गदाइ सांगे, ' मजसि न ठावे मातेतें पुसितों
तिची अनुज्ञा होतां तुमच्या चरणीं मज अर्पितों ।।'
दीक्षित होउनि बसतां ध्याना होई सगुणीं मग्न
फिरफिरुनी ये पुढति तयाच्या कालीचें ध्यान ।।
नील कान्तिमय वात्सल्ययुता माता ती देखुनी
निराकारिं न च जाई मन तें साकारा सांडुनी ।।
अन्तीं निश्चयें शिरकमलातें तोडी मायेच्या
ज्ञानखड्ग घेउनी जाइ मग पार त्रिगुणांच्या ।।
दिनत्रयीं तो झाला असतां निर्विकल्पिं लीन
धाले तोता देखिति त्याचें मुख आ वासून ।।

52

जी निर्विकल्प समाधी साधावयास आपणांस पुरी चाळीस वर्षे लागली, ती आपल्या या अद्‌भुत शिष्याने एकाच दिवसात गाठलेली पाहून तोता स्तिमित झाले. त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. पुनः पुन्हा त्यांनी गदाईस तपासून पाहिले. श्वास पूर्ण निरुद्ध ! मन बाह्यसंज्ञाशून्य ! आणि देह निश्चळ, निष्कंप झालेला ! निर्विकल्प समाधीच ती. तोतांची खात्री झाली. त्यांनी शिष्याला तीन दिवस या अवस्थेत राहू दिले. मग ' हरि ॐ' असा शिष्यकर्णी मंत्रघोष करीत दीर्घ प्रयत्नांनी गदाधराचे मन व्यावहारिक पातळीवर आणले. देहभानावर येताच आपण गुरुंच्या दृढ विळख्यात अडकलो आहे; आपणावर उष्ण आसू टपकत आहेत; हे पाहून गदाधर विस्मावला. पण लगेच सारी गोष्ट त्याच्या लक्षात आली.

अद्वैताची दीक्षा घेण्याअगोदर तोतापुरींनी संन्यासग्रहण करण्यास गदाधरास सांगितले. गदाधराने संमती दिली, पण एका अटीवर. ' गुप्तपणे मी घेईन संन्यास; प्रकट नको कारण माझ्या वृद्ध आईला मला काषाय वस्त्रात पाहवणार नाही, ' गदाधर म्हणाला. गदाधरासारख्या अधिकारी पुरुषास बाह्य उपचारांची आवश्यकता काय? तोतांना वाटले असावे. त्यांनी गुप्तरीत्या संन्यासविधी उरकला व गदाधरास साधे कपडे वापरण्यास मुभा दिली. संन्यासग्रहणप्रसंगीच गदाधरास ' रामकृष्ण ' हे अत्यंत अनुरुप असे नाव देण्यात आले असावे.

संन्यास घेतेवेळी गदाधराने आपला विवाह झाला असल्याचे तोतापुरींना सांगितले. तोता म्हणाले, ' त्यात रे काय बिघडले? ज्याची मती कोणत्याही परिस्थितीत चळणार नाही, आत्माकारवृत्ती भंग पावणार नाही, तोच सिद्ध.'

तोतापुरी दक्षिणेश्वरात पुरे अकरा महिने राहिले. तीन दिवसांहून अधिक काळ ते सहसा एकाच स्थळी थांबत नसत. पण आपल्या या अलौकिक शिष्याच्या प्रेमाखातर त्यांनी या नियमास फाटा दिला.

तोतांनी गदाधराचा- रामकृष्णांचा - निरोप घेतला. आधीच व्यवहारविमुख अशा रामकृष्णांच्या मनाला आता निर्विकल्प स्थितीतच डुंबून राहण्याचा वेध लागला; आणि लगेच, ' बुडी घेतली ब्रह्मसागरी, वृत्ति अखंडाकार जाहली ' अशी त्याची स्थिती झाली. ' न भूतो न भविष्यति '

अशा या विभूतीला जी समाधि लागली ती पुरे सहा महिने उतरली नाही ! हृदयराम, श्रीरामकृष्णांचा भाचा, आपल्या मामांच्या या अवस्थेचे वर्णन करतोः

षण्मास होउनी गेले परि देहभान न च आलें
नवल अगा वर्तलें ऐसें ऐकिलें न देखिलें ।।
हा नव्हे नव्हे नरदेह मज मुळींच ना संदेह
शारीर धर्म सांडीले चैतन्यचि केवळ उरलें ।।
करवंटिस गर जैसा चिकटे तैसा नर देहातें लगटे
खोबरें सुकें मामा झाले नरनटींतुनि सुटले ।।
चैतन्यचि होउनी ठेले न च गुणांनी बद्ध जहाले
आगळा तयांचा पिंड ते पूर्ण सच्चिदानंद ।।
53

भारतीय धर्मांच्या प्रमुख साधनांच्या शेवटी अद्वैत मार्गाचा अवलंब करण्यात श्रीरामकृष्णांचा हेतू सर्व उपासनांची परिणती अद्वैतानुभूतीतच होते, हे दाखविणे हाच असावा. स्थिरचरात एकच एक चैतन्य भरुन असलेले त्यांच्या ब्रह्ममयी दृष्टीस आता दिसत होते. भू , जल व आकाश या सर्वात सारख्याच सुलभतेने विहरावे तद्वत् श्रीरामकृष्ण आता व्यावहारिक, दिव्यभावापन्न व निर्विकल्प अशा तीनही अवस्थांत समान सुलभतेने संचार करु लागले. अशा या आध्यात्मिक अनुभवांच्या उत्तुंग शिखरावर आरुढ झालेल्या श्रीरामकृष्णांना विधर्मीय पंथाविषयीसुद्धा आदर वाटावा यात आश्चर्य ते काय? त्यांच्यामध्ये, ' हा माझा धर्म, तो इतरांचा ' असा दुजाभाव येऊच कसा शकणार?

यावेळी कायस्थ कुलोत्पन्न गोविंदराय नामक एका थोर व अधिकारी भक्ताशी श्रीरामकृष्णांचा परिचय झाला. गोविंदरायांना महम्मदीय धर्माची- विशेषतः त्यातील सूफी पंथाची- तत्त्वे फारच आवडली. या आकर्षणामुळे त्यांनी सूफी पंथ स्विकारला होता. ज्या धर्मात आपण उपजतो त्याचा आपल्याला विशेष परिचय नसला, पण अन्य कोणत्याही धर्माचा आपला चांगला अभ्यास झाला, म्हणजे त्याकडे आपण आकृष्ट होणे, साहजिकच आहे. गोविंदरायांचे बाबतीत असेच झाले असावे.

सूफी पंथाची तत्त्वे संक्षिप्तात अशी मांडता येतीलः

कोणत्याही धर्माची दोन प्रमुख अंगे असतात. विचार व आचार. सूफी लोक विचाराला- चित्तशुद्धीला, ईश्वर चिंतनाला- अधिक महत्त्व देतात. इस्लामधर्मप्रणीत चार प्रमुख आचार सूफींच्या उपासनेत अन्तर्भूत होतात. यांना ते ' शरीअत ' म्हणतात, ते येणे प्रमाणे-

1. सलात- रोज नियमितपणे पाच वेळा नमाज (प्रार्थना) पढणे. या प्रार्थना अरबी भाषेतूनच व ठराविक रीत्याच केल्या पाहिजेत. कारण तसा दंडक आहे. या प्रार्थना अल्लानेच शिकविलेल्या आहेत. त्या ' अपौरुषेय ' असल्यामुळे त्यांचा पाठ विशिष्ट प्रकारेच उच्चारादींनीच करावाच लागतो.

2. जकात (दान)- प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाच्या किमान 1/40 हिश्शाचे गरिबांना दान करावे.

3. सौम, रोजा (उपवास)- रमजान महिन्यात रोज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास करावा.

4. हज, (तीर्थयात्रा)- जन्मातून एकदा तरी मक्केसारख्या क्षेत्री यात्रा करावी.

उपासनांचे खरे रहस्य अल्लाच्या स्मरणात आहे.
(कुराण सुरा 3-190, 191; 3-52; 3-20, 124,125,126; 7-180.)
साधकाच्या अधिकारभेदानुसार प्रभुस्मरणदेखील निरनिराळ्या प्रकारे केले जाते. स्मरणाला सूफी लोक ' जिक्र ' म्हणतात. हे स्मरण चतुर्विध आहे-

1. ' जिक्रेजली ' नामक उपासनेत ' अल्लाह ' शब्दाचा मोठ्याने घोष केला जातो. हा ' वैखरी जप ' होय.

2. ' जिक्रेखपी ' उपासनेमध्ये तोंड न उघडता प्रभुनाम घेतले जाते. अशा जपाला आपण ' उपांशु ' म्हणतो.

3. ' मुराकवा ' (ध्यान) हा मानस जप होय. या उपासनेत ' अल्ला हो हाजिरी ', ' अल्ला हो नाजिरी ', ' अल्ला हो सहीदी ', ' अल्ला हो माई ' अशा मंत्रोच्चारांनी अल्लाचे ध्यान करण्यात येते.

4. शेवटी ' मुजाहिदा ' (दर्शन) ही साधना करीत असता साधक सर्व चित्तवृत्तींचा निरोध करतो व या अभ्यासाने त्याला दिव्य दर्शने, दिव्य अनुभव प्राप्त होतात. या स्थितीत प्रत्यक्ष परमेश्वराकडूनच त्याला मार्गदर्शन होते.

अल्लाने स्वतःच आपली शंभर नावे सांगितली आहेत. त्यापैकी

कोणत्याही नावाचा जप करावा असे कुराणात सांगितले आहे. तरी पण ' हू , अल्लाह हू ' हा सूफी साधकांचा आवडता मंत्र.

जो साधक उपरिनिर्दिष्ट आचारांचे (शरीअत) यथायोग्य पालन करतो त्यालाच गुरूपदेश घेण्याचा अधिकार प्राप्त होतो.
गुरुकडून दीक्षा घेतल्यावर गुर्वाज्ञांचे साधकाने अत्यंत काटेकोरपणे पालन करावे लागते. शमदम (मन व इन्द्रियांचा निग्रह), तितिक्षा (भूक, तहान वगैरे सहन करणे) यांचा साधकास सतत अभ्यास करावा लागतो. वर उल्लेखिलेल्या आचारांचे पालन, आत्मसंयम आणि होता होईल तो एकांतात साधना करणे ही ' शरीअत ' च्यापुढची ' तरीकत ' नामक उपासना.

' शरीअत ' आणि ' तरीकत ' यांच्या दीर्घ व आदरयुक्त अभ्यासाने प्राप्त होणारी नंतरची स्थिती म्हणजे ' मारिफत ' होय. ही अत्यंत श्रेष्ठ अशी ज्ञानभूमी आहे. उच्च अनुभवाची स्थिती आहे. या अवस्थेत सूफी साधकाला अति उदात्त प्रभुप्रीतीचा अनुभव येतो. अल्लाच्या प्रीतीने प्रेमाथलेल्या या भक्ताला जगाचा पूर्ण विसर पडतो. एवढेच काय, तो आपले स्वत्त्वही गमावून बसतो. या स्थितीला, या उत्कट प्रेमाला, ' इश्क ', ' मुहब्बत ', ' वज्द ' वगैरे नावे आहेत. वेदान्तातील जी असंसक्तिनामक ज्ञानभूमी तिच्यासारखीच ही.

सूफी साधकाची अंतिम साध्य स्थिती म्हणजे ' हकीकत '. ज्यांना वेदान्तात ' पदार्थभाविनी ' व ' तुर्यगा ' म्हणतात. तशा अवस्थेला हा साधक पोचलेला असतो. तो आता साधक उरला नाही. सिद्ध झाला. ' स्थितप्रज्ञ ' झाला. त्याची ' अखंडाकार वृत्ती ' झाली. सर्वत्र त्याला अल्लाच अल्ला दिसतो. **' यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः । '** अशा अवस्थेत तो राहतो.

वर सांगितलेल्या सूफी लोकांच्या साधना आणि उपनिषदातून, पुराणातून वा अन्य स्मृतिग्रंथातून उपदेशिलेल्या उपासना यातील सादृश्य कोणाही सारग्राही माणसाला सहज दिसून येईल.विविध धर्मांची, विविध पंथांची मूलपीठिका एकच असल्याचे त्यास पटेल. भारतीय दर्शनातील देवाची कल्पना व कुराणातील अल्लाची वर्णने यातील साम्य कुराणान्तर्गत खालील संकेताच्या विधानांवरुन स्पष्ट दिसून येतेः

1 अल्ला (परमेश्वर) एकच आहे. तो सत्य आहे. नित्य आहे.

(कुराण, सुरा 3-2)

2 अल्ला अदृश्य, अज्ञेय असला तरी तो सर्वांना – सर्वांच्या दृष्टीलादेखील – पाहतो. तो सूक्ष्म आहे; ज्ञानस्वरुप आहे; सर्वज्ञ आहे. (कुराण- सुरा 6-104; 42-11,12; 3-5)

3 अल्ला सर्वाधीश, सर्वशक्तिमान व सर्वज्ञ आहे. (कु.सु. 2-284).

परमात्मा अज्ञेय (इन्द्रियातीत) व अनिर्वचनीय असला तरी त्याचे शक्य तेवढे ज्ञान करुन घ्यावे. अल्ला सर्व सुखाचे आगर असून दुःखनिवृत्तीसाठी त्याचीच निष्काम सेवा करावी असे सूफी व इस्लाम संत सांगतात. कुराण म्हणते, ' आपली सेवा करण्यासाठीच अल्लाने मनुष्याची निर्मिती केली.

(कु. सु. 51-56) या संदर्भात भगवद्गीता, अध्याय 3 श्लो. 10 पाहा)

देव सर्वत्र असला तरी मनुष्याला तो दिसत नाही, याला कारण मनुष्याचा अहंकार होय. देव व मनुष्य यांच्यामध्ये 70,000 पडदे असतात, अशा अर्थाची एक उक्ती आहे. या पडद्यांचे अनावरण केवळ ज्ञानाने करता येते आणि अल्लाचे, अपूर्ण का होईना, दर्शन घडते. अल्लाचे पूर्ण ज्ञान मिळवणे मानवाला अशक्य. थोडक्यात अशी ही सूफी तत्त्वप्रणाली आहे.

गोविंदरायांच्या दिग्दर्शनाखाली आपण सूफी साधना कशा केल्या ते रामकृष्ण सांगतातः

गोविंदराय कायस्थ सुफि पंथीं हो आसक्त
तो विधर्मीय जरि भक्त मजवरि अति अनुरक्त ।।
तयाची अनन्य ईशीं प्रीती बघुनी वाटे करुं विनंती
इस्लामीं दीक्षित होण्या त्या मार्गें ईश पहाण्या ।।
गोविंदें दीक्षा दिधली मम वृत्ति पूर्ण पालटली
हिंदु देवता वर्ज्य तशीं हिंदु मंदिरें त्याज्य ।।
नेमाने पढें नमाज मुसलमानि मम साज
दिनिं तीन देवदूताचें हो दर्शन महम्मदाचें ।।
54

श्रीरामकृष्णांचे जीवन म्हणजे अतिदूर, सदैव उंचच उंच राहून चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे भासते. वाटते, त्यांचे मानवी देहात अवतरणे देखील वस्तुतः जीवदशेतील मनुष्यांच्या पातळीवर येणे नसून केवळ

भूमिस्थजलात एखाद्या नक्षत्राचे प्रतिबिम्ब पाहून ताराच खाली आला असे मानण्यासारखे आहे. श्रीरामकृष्णांच्या ठायी मानवी मर्यादाच आम्हाला आढळत नाहीत ! परमेश्वराच्या ठिकाणी आत्यंतिक प्रेम त्यांच्यात उपजतच होते. प्रापंचिक नातीगोती त्यांनी मानलीच नाहीत. जो जन्मतःच सर्व गोष्टींपासून अलिप्त राहिला, जीवास संसारात अडकविणारे मायेचे धागेदोरेच ज्याच्या हृदयात नव्हते, अशाचे जीवन सामान्य साधकास आदर्श कसे बरे होऊ शकणार? भूमिस्थ जनांना जमिनीवरुन उंच आकाशात उड्डाण करण्याची इच्छा असल्यास भूमीवरीलच माणसाचे दिग्दर्शन हवे- त्याचाच आदर्श हवा. जो सदैव आकाशातच राहतो, खाली उतरतच नाही, अशाचा कित्ता गिरवावा कसा? आकाशस्थ नक्षत्र काय किंवा त्याची पाण्यातील पडछाया काय, दोन्ही आम्हास, दिसत जरी असली तरी सर्वथैव अप्राप्यच; तसेच श्रीरामकृष्णासारख्यांचे अतिमानवी जीवन अननुकरणीयच, असे अनेकांना वाटेल; पण ते या थोर पुरुषांच्या जीवनाचे सम्यक् आकलन न झाल्यामुळे. त्यांचे दिव्यत्त्व, अलौकिकत्त्व पाहून आम्ही मुग्ध होतो- त्यांच्यातल्या मानवी मर्यादा आम्हाला जाणवत नाहीत.

श्रीरामकृष्णांसारख्या विरक्तांच्या पोटी स्वकीयांविषयी कधीकाळी आम्हाला जिव्हाळा दिसलाच तर त्याचे आम्हाला आश्चर्य वाटते. कारण, जेथे राग(प्रेम) नाही तो विराग, हा आपला समज. पण या नरोत्तमांच्या जीवनातील घटनांचे नीट आलोडन करिता असे दिसून येईल की यांचा विराग म्हणजे विशेष अनुराग होय. त्यांच्या अनुरागाचा विशेष असा की तो आसक्तिरहित, स्वार्थशून्य असतो; सर्वांमध्ये त्यांस भगवंतच दिसतो. इतरांच्या प्रेमाहून विरक्तांचे प्रेम अधिक उदात्त, अधिक निष्काम, अधिक उत्कट असते. जसा देव असीम तसे या देवभक्तांचे प्रेमही असीमच. शुद्ध प्रेम हे वास्तविक अमर्यादच असावयास हवे. प्रेमाला मर्यादा दिसतात त्या केवळ स्वार्थाने घातलेल्या. जगात राहून स्वकीयांवर प्रेम करुनही अलिप्त कसे राहावे हे आम्हाला रामकृष्णांसारख्यांच्याच चरित्रातून दिसून येते. त्याग ही जर प्रीतीची कसोटी मानली तर वैराग्य प्रेमभावनेला विरोधी कसे बरे होऊ शकणार ?

श्रीमथुरानाथ विश्वास, राणी रासमणीचे जामात, मोठ्या लवाजम्यानिशी एकदा काशी वृन्दावनादी क्षेत्रांच्या यात्रेस निघाले.

त्यांच्यासमवेत श्रीरामकृष्णही होते. मंडळी वृन्दावनात व तेथून व्रजात गेली. तेथे एक थोर अधिकाराच्या भक्तिमती महिलेशी श्रीरामकृष्णांचा परिचय झाला. ही स्त्री अजमासे साठीच्या घरातली असावी. तिला गंगामाता म्हणत. व्रजातील लोक तिला राधेच्या अत्यंत निकटची मुख्य सखी ललिता हिचा अवतार मानीत.

प्रथमदर्शनीच गंगामातेने श्रीरामकृष्णांची थोरवी जाणली आणि त्यांना पाहताक्षणीच गद्‌गत स्वरात आपल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या माणसाची दीर्घ काळाने भेट झाल्यागत, ' दुलाली ' म्हणून हाक मारली, असे श्रीरामकृष्ण स्वतः सांगत. दुलाली म्हणजे श्रीराधा. रामकृष्णांना गंगामाता श्रीराधाच मानी; आणि त्यांच्याशी तिचे सारे व्यवहार याच भावातून होत. श्रीरामकृष्ण पण तिच्या उच्च भक्तिभावाला एवढे भाळले की त्यांना या थोर साध्वीच्या सहवासातच आपण आपले उर्वरित जीवन घालवावे असे वाटू लागले. एकवार त्यांनी ही आपली मनीषा आपला भाचा हृदयराम याजकडे प्रकटही केली.

यात्रेकरु मंडळी आता निरोप घेणार हे जाणताच गंगामातेला जिवापरते दुःख झाले. श्रीरामकृष्णांनासुद्धा या व्रजवधूच्या सहवासातले अंतर सहन होईना. त्यांचा भाचा हृदय वगैरे त्यांस व्रजाहून निघण्यास विनवू लागले. एक जीव म्हणतो जावे, एक म्हणतो नको, अशी त्यांची स्थिती झाली. इतक्यात त्यांना आपली दक्षिणेश्वरींची वृद्ध माता आठवली. मिटला प्रश्न ! गेली सारी चंचलता ! आणि सज्ज झाले निघावयास.

दक्षिणेश्वरी, वृद्ध मातोश्रींच्या चरणी आता श्रीरामकृष्णांचे मन झेपाऊ लागले. यावरुन त्यांच्या कठोर वैराग्यामुळे त्यांचे स्वकीयांवरचे प्रेम यत्किंचितही उणावले नव्हते हे स्पष्ट दिसून येते. आपण व्रजात राहीलो तर आपल्या आईचे कसे होईल या काळजीने ते अगदीच अस्वस्थ झाले. या प्रसंगाविषयी ते सांगत असतः

मथुरानाथासंगें गेलों व्रजांत काहीं काळ राहिलों
तेथें मज नित गंगामाई राधाराणीज्ञाने सेवी ।।
उत्कट भक्ति तियेची बघुनी वाटे तिज न जावें त्यजुनी
हृदय म्हणे मज, ' मामा चलुयां दक्षिणेश्वरासी परतूंया ' ।।
गंगा माता धरुनी हाता म्हणते, ' इथुनी कोठें जातां ? '

दुसरा कर मम ओढी हृदय मधेंच पडलों मी असहाय ।।
एवढ्यात मज वृद्धा जननी आठवतां तत्क्षणींच तिथुनी
मथुरानाथासवें निघालों मातोश्रीच्या पदीं पातलों ।।

55

सूर्य स्वतः जळतो व इतरांस प्रकाश मिळतो; तसेच श्रीरामकृष्णांसारख्या तेजस्वी विभूती जगात येतात, तपस्या करतात, त्या परहितसाधकच होतात. त्यांच्या तपस्येच्या फळाची उपलब्धी त्याच्या सेवकांस, परिचारकांस आपसुखच होत असते. हृदय, मथुर इत्यादींना रामकृष्णांच्या संगतीत जे साक्षात्कार झाले ते याचीच साक्ष देतात.

एक प्रसंग. एकदा श्रीरामकृष्ण आपल्या खोलीपुढच्या व्हरांड्यात सहज येरझाऱ्या घालीत असता मथुरबाबू कालीमंदिराच्या उत्तरेस असलेल्या बंगल्यात बसून होते. तेथून त्यांना शतपावली करीत असलेली श्रीरामकृष्णांची मूर्ती दिसली. साहजिकच आपल्या आदराचे, प्रेमाचे स्थान असलेल्या या व्यक्तीच्या ठायी त्यांचे मन वेधले गेले- स्थिरावले. काही क्षणातच चटकन् उठून ते उभे राहिले. जणू झोपेतून उठल्यागत डोळे चोळीत विस्मावल्या नेत्रांनी पुन्हा पाहू लागले ! एकाएकी विस्मय मावळला ! त्या जागी उद्दाम आनंद, अलोट आदर व सखोल कृतज्ञता प्रकटली ! ओलावलेल्या नेत्रांनी उन्मत्ताप्रमाणे धावत येऊन श्रीरामकृष्णांच्या चरणापाशी त्यांनी लोळण घेतली ! दोन्ही पाय घट्ट धरुन हुंदकेच देण्यास सुरवात केली ! श्रीरामकृष्णांनी त्यांचे सांत्वन करण्याचा अनेक परींनी प्रयत्न केला. पण व्यर्थ ! भावनांचा आवेग हळूहळू ओसरु लागला. शब्दरुपे ओघळू लागलाः

शिव तूंचि काली तूंचि साक्ष दिली मज साची
काकुळती पामराची तुज दयाघना किती ।।
भाग्य आजि मम उदेलें पूर्वपुण्य फळा आलें
नव्हे प्रसादें तुझिया असें वर्तलें ।।
घालतां तू येरझारी शिव होतसे सामोरी
काली वळतां माघारी देखीं तुजमधीं ।।

56

श्रीरामकृष्णांमध्ये आपल्याला शिव व कालीचे दर्शन घडल्याचे जेव्हा

मथुरबाबूंनी सांगितले तेव्हा श्रीरामकृष्ण म्हणाले, ' मला बुवा यातले काहीच माहिती नाही. ' मग हे घडवून आणले कुणी ? श्रीरामकृष्ण तर कधीच खोटे बोलणार नाहीत. मग काय मथुरबाबूंना भ्रम झाला ? तसे होणेही संभवत नाही. कारण, मथुर हे एक चतुर, व्यवहारकुशल, कोणतीही गोष्ट एकाएकी न मानणारे तर्काच्या निकषावर उतरेल तेच स्वीकारणारे गृहस्थ होते. मग हे व्हावे कसे ?

श्रीरामकृष्ण हे कालीमातेचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांचे ' मीपण ' कधीच लोपले होते. त्यांच्या देहादींकडून होणाऱ्या क्रियांचे कर्तृत्व देखील त्यांच्याकडे नव्हते. गीतेत भगवान म्हणतात, ' अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते'. ' अहंकाराने मोहित झालेला अज्ञानी जीवच स्वतःला कर्ता, भोक्ता मानतो'. ज्ञानी पुरुष आपल्याकडे कोणत्याही गोष्टीचे कर्तृत्व घेत नाही.

श्रीरामकृष्ण अनेकवार म्हणत असत, ' या देहाचा (स्वतःच्या शरीराचा) आश्रय करुन दोघे राहतात- एक जगदंबा व दुसरा तिचा भक्त'. श्रीरामकृष्णांच्या अंगी मथुरानाथांना दिव्य दर्शन घडले ते ' ईश्वरी शक्तीचे ' पण ' मला यातले काहीच माहीत नाही ', हे उद्‌गार निघाले ते आपले कर्तृत्व, भोक्तृत्वादी सारे काही श्रीकालीचरणी विसर्जून राहणाऱ्या अहंकारशून्य भक्ताचे.

जीवभावाने व्यवहार करीत असता, श्रीरामकृष्ण, लहानाहून लहान आणि आपल्या शिवत्वाचा आविष्कार करताना, मोठ्याहून मोठा, सर्वाधार, सर्वशक्तिमान, सर्वातीत सगुण ईश्वरच भासत आपल्या शिष्यांस दिव्य अनुभूती घडवीत.

एकमेवाद्वितीय असे ब्रह्मच श्रीरामकृष्णतनूला आपले लीलाक्षेत्र बनवून लोकहितास्तव जीव व शिव रुपांनी क्रीडा करीत होते व जीवांस शिवपदी आरुढ होण्याचे विविध मार्ग दाखवीत होते- त्यांस विविध साक्षात्कार घडवीत होते- असे मानल्यावाचून आम्हास गत्यंतर नाही. कारणः

होई आत्मसाक्षात्कार मतिहि निर्विकल्पीं स्थिर
तरी लोकोत्तर नर साधनें हा करितसे ।।
जोडुनि आत्मानुभूति होउनियां आत्मरति

जरी पावतो मुक्ति परमहंस देही या ।।
सांगितलीं अज्ञ जनां न जीं स्थितप्रज्ञांना
अशीं साधनें नाना कुणासाठीं करितसे ।।
ध्याती आपुले चरण अक्षय त्यां पुण्यधन
मिळो म्हणुनी रामकृष्ण तप अपूर्व आचरी ।।
चोखाळी तो सर्व पंथ त्यांत कैचा त्याचा स्वार्थ
इतरांलागूनी जीवित रामकृष्ण जगतसे ।।
57

विष्णूच्या पायातून गंगा आली पण ती भुईवर कोसळण्याआधी शंकराला आपल्या जटेत धरावी लागली. तशीच श्रीरामकृष्णांनी असीम आध्यात्मिक शक्ति संपादिली खरी पण ती प्रचंड अध्यात्मगंगा अवनीवरील सामान्य जनात उतरविण्यास त्यांना एखाद्या सत्पात्र माध्यमाची निकड भासली ते स्वाभाविकच. दिवसातील अधिकांश काळ समाधीत किंवा भावावस्थेत राहणाऱ्या श्रीरामकृष्णांना आपणाहून अधिक सुकरतेने व अधिक काळ व्यावहारिक पातळीवर राहू शकणारी आणि त्याचबरोबर आपली सारी आध्यात्मिक शक्ती स्वीकारण्यास व पेलण्यास समर्थ अशी आपल्याच योग्यतेची दुसरी व्यक्ती हवी होती. अशा व्यक्तीच्या शोधार्थ त्यांना दूर जावे लागले नाही. कारण त्यांचीच अविभाज्य शक्ती, मायेच्या दुसऱ्या एका कोंदणातून चमकणारी त्यांची सहधर्मिणी, श्रीसारदादेवी म्हणून ओळखली जाणारी, त्यांच्या सन्निध होतीच.

आपण मिळवलेल्या तपस्येच्या फळाचे, आपल्या अनेक आध्यात्मिक उपलब्धीचे आधेय होण्यास, तसेच दिव्य शक्तीचे, आत्मज्ञानाचे वितरण करण्यास सारदादेवीसारखी अन्य कुणीही व्यक्ती नाही हे ओळखूनः

ज्येष्ठ मासिंच्या अवशीं फलहारिणिच्या दिवशीं
षोडशी पूजेत निशीं रामकृष्ण बैसती ।।
सारदेसी पाचारिती चौरंगावरि स्थापिती
बालिका निरागस ती पूजिती तदा ।।
षोडशींत गेली विरुनि देहभान विसरोनी
त्रिगुणांते उल्लंघुनि चित्सागरीं चिन्मया ।।
58

ही 1872 च्या मे महिन्यातील गोष्ट. सारदादेवी तेव्हा अठरा वर्षांच्या. श्रीरामकृष्णांचा सहवास त्यांना आता वर्षाहून अधिक काळ घडला होता. अनेक गोष्टी त्या श्रीरामकृष्णांकडून शिकल्या होत्या. आणि त्यांच्या पूर्णपणे निष्काम, निष्पाप हृदयाची अति उच्च आध्यात्मिक अधिकाराची साक्ष श्रीरामकृष्णांस पटली होती. म्हणूनच तर श्रीरामकृष्णांनी फलहारिणी कालीपूजेच्या दिवशी देवीज्ञानाने हिची पूजा केली. तंत्रशास्त्रात या पूजेला षोडशीपूजा म्हणतात. या मतात सर्व स्त्रियांमध्ये जगदंबेलाच पाहणे हे अन्तिम साध्य समजतात. श्रीरामकृष्णांनीसुद्धा आपल्या सा-या साधनांच्या पूर्ततेसाठी ही अर्चा आपल्या पवित्र पत्नीच्या पादपद्मी अर्पिली आणि आपल्या आध्यात्मिक शक्तीची गंगा तिच्यात अवतीर्ण केली- नव्हे, या सिद्धींचाच नैवेद्य तिला दाखविला. या समयी श्रीरामकृष्णांच्या संगतीत असलेले लोक या घटनेचे वर्णन करतातः

नैक पथांमधिं सिद्धि साधिली सारदापदीं अन्तीं वाहिली
षोडशिभावें अर्चा अर्पुनी कान्ता आराधिली ।।
पूजे अन्तीं कान्ते वन्दुन केली जपमाला तिज अर्पण
सप्तशती मंत्रांनी प्रार्थुन धरिले समचरण ।।
शिवें पूजितां शक्ति आपुली वात्सल्यें ती उतवुं लागली
अंगप्रत्यंगातुनि पाखर घाली प्रेमाची ।।
पूज्य नि पूजक भेद निमाला शिवशक्तींचा संगम झाला
शक्ति कुणाची कोण तेधवां सांगवे न कोणाला ।।
दोघे शिव अन् दोन्ही शक्ती गदाइ नी सारदा वाटती
परस्परां पूजिती दाविण्या भक्तांचीं नीती ।।

59

अत्यंत सालस, अतिशय लाजाळू, पूर्णपणे निरभिमानी अशा या सारदादेवी श्रीरामकृष्णांनी खुणावताच चौरंगावर बसल्या कशा ? देवतुल्य अशा आपल्या पतीकडून वंदन अर्चनादी करुन घेऊ शकल्या कशा ? या शंकेचे समाधान असे करता येईलः

श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी जशा दोन व्यक्ती वसत असत तशाच त्या सारदादेवींच्या ठायी देखील होत्या. त्यांचा एक जीव रामकृष्णरुप तर दुसरा श्रीरामकृष्णाचाच भक्त झाला होता. जेव्हा सारदादेवी एखाद्या

मंत्रमुग्धाप्रमाणे चौरंगावर जाऊन बसल्या तेव्हा श्रीरामकृष्णच- श्रीरामकृष्णांचा आत्माच - किंबहुना कालीच तेथे जाऊन बसल्या ! चौरंगावर बसताक्षणीच त्या समाधिस्थ झाल्या- कालीरुपेच उरल्या ! शरीररुपात दिसणारी त्यांची केवळ छाया !

संन्यास घेतला असता सुद्धा श्रीरामकृष्ण सारदादेवीसमवेत एकाच खोलीत झोपले, उठले. पण या अलौकिक दाम्पत्याच्या मनात एका वर्षभरातसुद्धा कामाचा उद्‌भव झाला नाही ! नित्य मोक्षसुखाचा सोहळा भोगणाऱ्या श्रीरामकृष्णांना क्षुद्र रतिसुखाचे आकर्षण ते काय वाटणार ? ' विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः ।' ' कामादी विकारांच्या प्रादुर्भावास पोषक, अथवा असे विकार जागविणारी, परिस्थिती असता देखील ज्यांचे मन विचलित होत नाही तेच ज्ञानी. '

संन्यास काय किंवा गार्हस्थ्य काय, दोन्ही आश्रमांचे अन्तिम ध्येय एकच - अखंड सुखाची प्राप्ती. सगळ्या आश्रमातील, वर्णातील नियम हे एकच उद्दिष्ट साधण्यास पाळावयाचे असतात. ' धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि ' इत्यादी प्रतिज्ञांनी विवाहबद्ध झालेल्या पतिपत्नींनी एकमेकांची कामपूर्ती करावी ती अन्ती निष्काम होऊन मोक्षसुख संपादण्याच्या हेतूनेच. तेव्हा आपण सारदादेवीशी विवाहबद्ध आहे आणि पती या नात्याने तिच्या कामना पूर्ण करणे आपले कर्तव्य आहे याची दखल घेऊनः

रामकृष्ण पुसे सारदेसी, ' संसारीं जरी ओढुं इच्छिसी
पुरविण्यासी धर्मबद्ध मी तव पति म्हणोनि कामनांसी ' ।।
स्वानंदसाम्राज्याची सम्राज्ञी थोर यतीची थोर पत्नी
म्हणे, ' तुमच्या इष्टसाधनीं सहयोग देण्या मी आलें' ।।
60

श्रीरामकृष्णांच्या आशाआकांक्षांशी सर्वपरींनी एकजीव झालेल्या सारदादेवींनी, ' आपली सहधर्मिणी या नात्याने आपल्या कार्यात हातभार लावण्यासाठीच मी येथे आहे; आपल्याला खाली खेचण्यासाठी नव्हे', असे जेव्हा आपले ठाम व प्रांजल मत सांगितले तेव्हा सहजच आपण आपल्या पत्नीविषयींच्या कर्तव्यातून मुक्त झाल्याचे समाधान श्रीरामकृष्णांना झाले असावे. आणि या समाधानातूनच, षोडशीपूजेनंतरसुद्धा इतर धर्मांचीही मार्गक्रमणा करण्याची उमेद त्यांच्या पोटी उपजली असावी.

आपल्या भारतात तीन धर्मांच्या लोकांचा भरणा विशेष - हिन्दु, इस्लाम व खिस्त. जगातसुद्धा बौद्ध, खिस्त व हिंदु या धर्मांच्या अनुयायांचीच संख्या अधिक. बौद्ध व जैन या धर्मांना वैदिक धर्माचीच ' बंडखोर लेकरे ' म्हणण्यात येते; या अर्थाने की ते वेदातूनच निपजले आहेत आणि त्यांचा वेदान्ताच्या ' मूलभूत ' तत्त्वांशी तसा विरोध नाही. माध्यमिक बौद्धांचे, विशेषतः नागार्जुनाच्या तत्त्वप्रणालीचे, अद्वैत वेदान्ताशी एवढे साम्य आहे की वाटते, हे अद्वैतमतच ते अन्य शब्दात प्रतिपादितात. यामुळेच तर अद्वैतमतविरोधी आचार्यांनी अद्वैतमताविषयी ' मायाशास्त्रमसच्छास्त्रं प्रच्छन्नं बौद्धमेव तत् ।' असे उपहासात्मक उद्‌गार काढले आहेत. अर्थातच हे जे येथे विचार मांडले ते ' तत्त्वजिज्ञासू साधकाच्या ' दृष्टीतून; तर्कनिष्ठ पंडितांच्या दृष्टीतून नव्हे. श्रीरामकृष्णांनी हिंदूंचे विविध पंथ आचरले. इस्लाम धर्मं झाला. आता राहिला खिस्त धर्म. याही धर्माचा परिचय करुन घेण्याची संधी श्रीरामकृष्णांस मिळाली.

दक्षिणेश्वरच्या कालीमंदिराशेजारीच शंभूचरण मल्लिक नावाच्या कलकत्त्यातील एका गृहस्थाची एक बाग होती. तेथे श्रीरामकृष्ण वरचेवर जात असत. शंभूबाबू दानशूर असून विविध धर्मग्रंथ अभ्यासीत; श्रीरामकृष्णांना गुरुस्थानी मानीत व त्यांना खिस्त ग्रंथ बायबल वाचून दाखवत.

आपले त्यागमय जीवन व उदात्त शिकवण यामुळे येशूने श्रीरामकृष्णांच्या हृदयात स्थान मिळविले. एकदा दक्षिणेश्वरचे जदुनाथ मल्लिक यांच्याकडे गेले असता त्यांच्या घराच्या भिंतीवर येशूला कडेवर घेऊन उभ्या असलेल्या मेरीचे चित्र श्रीरामकृष्णांना दिसले. तेव्हा आपल्याला झालेल्या अद्‌भूत, दर्शनाचे व तत्संबंधित इतर घटनांचे श्रीरामकृष्ण स्वतः वर्णन करतातः

जात असें मी शंभूभुवना
वाचिला तयें खिस्तग्रंथही
जदूच्या घरीं अङ्‌गणीं उभा
घेउनि येशुस कडे ठाकिली
चित्रांतुनि त्या रश्मि लोटती
क्षणीं पालटे पूर्ण मम मती
तेथ ऐकिलें येशुजीवना
ईशपूर्ति प्रीतीं जडे हृदीं ।।
तसबिरींतुनी दाटते प्रभा
मेरि तेथ मी चित्रिं पाहिली ।।
शरीरिं माझ्या तुरंत शिरती
खिस्त धर्मिं तैं जडे अनुरती ।।

61

बायबल हा ख्रिस्तधर्मीयांचा मुख्य ग्रंथ. याचे दोन बृहद्- विभाग आहेत- ओल्ड टेस्टामेंट व न्यू टेस्टामेंट. ओल्ड टेस्टामेंट न्यू टेस्टामेंटच्या शेकडो वर्षे अगोदर लिहिण्यात आले. यात ख्रिस्तपूर्व जे अनेक धर्मगुरु होऊन गेले त्यांची शिकवण व पुढे येणाऱ्या येशूविषयी माहिती दिली आहे. न्यू टेस्टामेंटमध्ये येशूचे अवतरण, त्याच्या लीला व त्याने स्वर्गारोहण केल्यावर धर्मप्रसार कसा केला या विषयी माहिती आहे. ख्रिस्तधर्मीयांना हाच ग्रंथ अधिक महत्त्वाचा वाटतो.

येशू ख्रिस्त (Jesus Christ) म्हणजे मुक्तिदाता राजा (Saviour King).

न्यू टेस्टामेंटचे चार भाग आहेत. ते येशूचा जन्म व उपदेश याविषयी येशूच्या शिष्यांनी - मॅथ्यू, मार्क, लूक व जॉन यांनी लिहिलेली टिपणे होत. यांना गॉस्पेल्स म्हणतात.

सर्व मुख्य धर्मांतून तीच तत्त्वे प्रतिपादिली जातात. विशेषतः ख्रिस्ताची शिकवण भगवद्गीतादी ग्रंथातील मतांशी किती मिळती जुळती आहे हे या थोर जगद्वंद्य पुरुषाच्या खाली उद्धृत केलेल्या वचनांवरुन सकृद्दर्शनीच कोणाच्याही लक्षात येईल. काही वचनांचा येथे केवळ वाच्यार्थ दिलेला नसून लाक्षणिक अर्थ किंवा मुख्य आशयच सांगितला आहे. कारण तसे करणेच योग्य वाटले.

1. आमचा स्वामी, परमात्मा, हा एकच अधिपती आहे.
(सेंट मार्क, 12-29)

2. तुमचा पिता (परमात्मा) जो स्वर्गात राहतो, तो एकच आहे. (सेंट मॅथ्यू, 23-9)

(टीपः येथे स्वर्ग (heaven) याचा अर्थ अंतरात्मा अथवा अंतरीचा आनंद असा करावा. (सेंट लूक, 17-20,21). हा बाप सर्वांच्या अंतर्यामी रहाणारा एकच आहे.)

3. परमात्मा चैतन्यरुप (Spirit) आहे. जे त्याची पूजा करतात त्यांनी तो चित्स्वरुप (Spirit) आहे, सत्स्वरुप (truth) आहे असे मानूनच ती करावी.

4. कोणत्याही माणसाने परमात्म्याला कधीही पाहिले नाही. जो परमात्म्यापासून उत्पन्न झाला असा त्याचा एकमेव पुत्र, जो आपल्या पित्याच्या हृदयात राहतो, त्याने ईश्वराचे अस्तित्त्व प्रकट केले. (सेंट जॉन, 1-18)

(टीपः ' only begotten son ' - ' परमात्म्यापासून उत्पन्न झालेला एकमेव पुत्र ' म्हणजे ईश्वराच्या शुद्धसत्त्वमयी मायेपासून उत्पन्न झालेला; इतरांसारखा प्रकृतीच्या मलिन त्रिगुणांपासून झालेला नव्हे.

' पित्याच्या हृदयात राहतो ' म्हणजे ज्ञानरुपाने आनंदरुपाने परमात्म्याशी एकरुप होऊन राहतो. ' ईश्वराचे अस्तित्त्व प्रकट केले', याचा अर्थ आपण स्थूल शरीरातील चैतन्यरुप असल्याचे दाखवून व परमात्मा आमच्या अंतरी आहे असे सांगून, परमात्म्याला जाणण्याचा केवळ मार्ग दाखविला; त्याची खूण पटवून दिली.)

5. मी व माझा पिता (देव) एकच आहोत. (सेंट जॉन, 10-30)

6. (परमात्म्याने सृष्टीची- राष्ट्रांची ऋतूंची वगैरे- निर्मिती केली ती) एवढ्याचसाठी की मनुष्याने देवदर्शनाचा ध्यास धरावा आणि त्याची प्राप्ती करुन घ्यावी. वास्तविक तो आम्हा कुणापासूनही दूर नाही. कारण त्याच्यामध्येच आम्ही जगतो, फिरतो (साऱ्या क्रिया करतो) आणि आपले अस्तित्त्व राखतो... कारण आम्हीसुद्धा त्याचीच (परमेश्वराचीच) लेकरे आहोत. (येशू तेवढाच ईश्वराचा पुत्र आहे असे नव्हे).

सारांश : परमात्मा आमच्या आत व बाहेर व्यापून आहे.

(सेंट पॉल ऑफ अथेन्स -ॲक्ट्स 17-27 व 28)

7. जो माझ्या ठायी श्रद्धा ठेवतो तो ती वस्तुतः मजवर ठेवीत नसून ज्याने मला पाठविले त्याच्यावर ठेवतो. आणि जो मला पाहतो (मी चित्स्वरुप असल्याचे जाणतो) तो वस्तुतः परमात्म्यालाच पाहतो.

8. एकदा येशूने आपल्या शिष्यांना विचारले, ' मी कोण आहे ते सांगा पाहू ? '

सायमन पीटर उत्तरला, ' तू ख्रिस्त आहेस; प्रत्यक्ष परमात्म्याचा पुत्र'.

येशू तेव्हा पीटरला म्हणाला, ' धन्य आहेस तू सायमन. कारण हे ज्ञान तुला माझ्या स्वर्गातील (हृदयस्थ) पित्याने दिले;

मांस व रुधिर यांनी (स्थूल शरीराने) नाही प्रकट केले.

(सेंट मँथ्यू, 16-16,17) (सेंट मार्क, 8-29) (सेंट लूक, 9-20)

9. माझ्या (वैयक्तिक) इच्छा पुरविण्यासाठी मी स्वर्गातून अवतरलो नाही; परंतु ज्याने मला पाठविले त्याचे कार्य (धर्म-संस्थापनेचे) करण्यासाठी मी येथे आलो आहे. ' (सेंट जॉन, 6-38)

(टीपः 'स्वर्गातून अवतरलो' म्हणजे चिन्मयरुपातून स्थूल शरीरात प्रकट झालो.)

10. परमेश्वराचे जगावर एवढे प्रेम आहे की त्याने आपला एकुलता एक पुत्र पाठविला; एवढ्याचसाठी की त्याच्याठायी श्रद्धा ठेवून मानव मृत्यूच्या पार जावा, अमर व्हावा. प्रभूने ईशपुत्राला पाठविले ते जगास (अपराध पाहून) दंडण्यासाठी नव्हे, तर त्याच्या करवी जगाचे रक्षण व्हावे म्हणून. (सेंट जॉन, 3-16,17)

(टीपः ' परमेश्वराने आपला एकुलता एक पुत्र पाठविला' याचा अर्थ वेदान्ताच्या भाषेत सांगावयाचा म्हणजे सगुण ब्रह्मच आपल्या अचिन्त्य मायेचा आश्रय करुन मानवरुपात अवतरले.)

11. ' ईश्वरीय राज्य केव्हा येईल ?' असा प्रश्न विचारण्यात आला असता येशू म्हणाला,-

' ईश्वराचे राज्य (बाह्य वस्तूंचे) निरीक्षण केल्याने (with observation) मिळणारे नव्हे. हे येथे पहा ! ते पाहा तेथे ! असेही कोणास म्हणता येणार नाही. कारण परमात्म्याचे राज्य तुमच्या अंतरातच आहे- तेथे ते पाहा. ' (सेंट लूक, 17-20,21)

(टीपः येशू म्हणतो परमात्म्याचे राज्य (kingdom of God) हे बाहेर हुडकून सापडावयाचे नाही. ते आपली दृष्टी अन्तर्मुख केल्यानेच दिसेल येथे ' परमात्मा ' असे न म्हणता येशू ' परमात्म्याचे राज्य ' असे म्हणतो. एवढ्याचसाठी की परमेश्वर प्रत्यक्ष कुणाला दिसत नाही. वा दिसणारही नाही. त्याचे ' राज्य ' - त्याची सत्ता, त्याचे वैभव, दिसण्याची जागा, त्याची खूण पटण्याचे स्थान मात्र दाखविता येईल. ही जागा म्हणजे, येशू म्हणतो, आमचे शुद्ध अन्तःकरणच होय.

सर्वांच्या अन्तरात राहणारा देव सर्वांमध्ये समान रुपानेच

असावयास हवा. असे सर्वांच्या अंतरी समानत्त्वाने वसणारे एका ' शुद्ध जाणीवे ' वाचून अन्य कोणतेच तत्त्व आम्हाला आढळून येत नाही. भिन्न भिन्न व्यक्तींच्या ठायी, भिन्न विचार, भिन्न भावना, भिन्न संस्कार वगैरे जरी असले तरी या सर्व विचार संस्कारांदींच्या बुडाशी शुद्ध जाणीव (pure consciousness) ही असतेच; तसेच सर्वांच्या अंतरात शुद्ध आनंद (pure or absolute bliss) ही असतोच. या शुद्ध जाणीवेलाच येशू ' देवाचे राज्य ' व ' शुद्ध आनंदालाच ' स्वर्गाचे राज्य ' (kingdom of heaven) म्हणतो.

Heaven हा शब्द सुखाचा आनंदाचा द्योतक आहे. ' चिदाकाश ' किंवा ' आत्मानंद ' हेच येशूच्या मते ' देवाचे राज्य ' अथवा ' स्वर्गाचे राज्य ' होय, असे मानावयास आम्हाला येशूच्या शिष्यांच्या वचनातून आणि लिखाणातून अनेक आधार मिळतात.)

12. स्वर्गाचे राज्य हे एखाद्या शेतात लपविलेल्या ठेवीसारखे आहे. ही ठेव तेथे असल्याचे एखादा मनुष्य जाणतो पण रहस्यभेद करीत नाही व आनंदातिशयाने आपली सर्व मालमत्ता विकून ते शेत विकत घेतो.

(सेंट मॅथ्यू, 13-44)

(टीपः ' स्वर्गातील राज्य तुमच्या अंतरीच आहे' व ' स्वर्गाचे राज्य शेतात लपविलेल्या ठेविसारखे आहे ' ही दोन्ही विधाने एकत्र घेतल्यास कोणासही स्पष्ट दिसून येईल की ' आपल्या अंतरी सदैव वसणारा निर्भेळ आनंद, ज्याची आम्हास जाणीव नसते, तेच स्वर्गातील राज्य. हे मिळविण्यास सर्व भौतिक मालमत्तेचा त्याग, विषयासक्तीचा त्याग करावा लागतो. हाच आशय व्यक्त करणारी इतर विधानेही आहेत.)

(सेंट मॅथ्यू, 13-45,46)

13. अगदी खरे, खरे सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणाही माणसाला देवाच्या राज्याचे दर्शन घडणे शक्य नाही.

(सेंट जॉन, 3-3)

14. ' अगदी सत्य, सत्य आहे ही गोष्ट की जो पाण्यापासून नि चैतन्यापासून जन्मला तोच देवाच्या राज्यात प्रवेश मिळवू शकेल, अन्य कोणीही नाही. '

जे जडापासून (मांसापासून) जन्मले ते जड (मांसमय) च असणार; जे चैतन्यापासून जन्मते ते चिन्मयच राहणार.

(सेंट जॉन, 3-5,6)

(टीपः आम्ही परमात्म्यापासून उत्पन्न झालो असल्यामुळे परमात्म (spirit) रुपच आहोत; पण आपल्याला हे जाणवत नाही. का? तर स्थूल देहच मी ही आपली भावना. आमच्या पार्थिव पितरांनाच आम्ही मानतो. पण आपला खरा बाप जो परमात्मा त्याचा आम्हास विसर पडतो. देहभावनेच्या अतीत जाणे, आपण वस्तुतः चित्स्वरुप आहोत अशी मती होणे, म्हणजेच येशूच्या शब्दात ' पुनर्जन्म पावणे ' होय.

' पाण्यापासून उत्पन्न होणे ' म्हणजे मन सत्त्वापन्न होणे. पाण्यात जसे प्रतिबिम्ब दिसते तसे सत्त्वापन्न हृदयात चित्स्वरुप, आनंदरुप परमात्म्याचे दर्शन घडते. त्यावेळी आपण मांसरुधिरमय शरीर नसून चित्स्वरुप असल्याचा आम्हास स्वच्छ उमज पडतो. हा या वचनांचा आशय.

15. एक धनवान तरुण येशूच्या समोर गुडघे टेकून म्हणाला, ' हे मंगलधाम, सद्‌गुरो (Good Master), अमरपद मिळविण्यासाठी मी काय करु ?

येशू उत्तरला, ' तू मला मंगलधाम का म्हणतोस ? एका परमेश्वरावाचून ' मंगल ' असा कोणीही नाही. (अर्थात, सर्वांमध्ये दिसणारे मांगल्य हे परमात्म्याचाच आविष्कार होय). तुला धर्माज्ञा माहिती आहेतच. हिंसा करु नकोस. व्यभिचार करु नकोस. चोरी करु नकोस. खोटी साक्ष देऊ नकोस. फसवेगिरी करु नकोस. मातापितरांचा मान राख. '

तेव्हा तो तरुण म्हणाला, ' गुरुजी, या सर्व आज्ञा मी लहानपणापासूनच पाळीत आलो आहे '.

येशूने त्याच्याकडे पाहिले; त्याची येशूस दया आली; व तो म्हणाला, ' तुझ्यात एकाच गोष्टीची उणीव आहे. जा; तुजजवळ जे काही असेल ते सारे विकून टाक; (आणि त्या योगे मिळेल ते धन) गरीबांना दे, म्हणजे तुला स्वर्गीय सम्पत्ती मिळेल. चल, क्रॉस धर आणि ये माझ्या मागून. '

हे वचन ऐकून तो तरुण खिन्नवदन होऊन व्यथित चित्ताने निघून गेला; कारण त्याची बरीच मालमत्ता होती.

मग येशू सभोवार पाहून आपल्या अनुयायांना म्हणाला, ' देवाच्या राज्यात प्रवेश मिळविणे धनवानांना कसे असाध्य होते पाहा ! सुईच्या नेढ्यातून उंट पार जाईल; पण एखाद्या धनिकाला देवाच्या राज्यात प्रवेश मिळविणे त्याहून दुष्कर ! '
(सेंट मार्क, 10-16 ते 27. सेंट मॅथ्यू, 19-16 ते 26. सेंट लूक, 18-18 ते 27)

16. '.....खेकडांस बिळे व आकाशातील पक्ष्यांना घरटी असतात, पण मानवाच्या पुत्राला आपले डोके टेकण्यास (स्वतःचे असे) स्थान नाही. ' (सेंट मॅथ्यू, 8-20)(सेंट लूक, 9-38)

(टीपः पशू व पक्षी यांना ज्ञान नाही. त्यांना हे सारे विश्व परमेश्वरानेच व्यापलेले आहे हे कळत नाही, म्हणून ते देहगेहादींच्या ठिकाणी ममत्त्व ठेवतात. परंतू जाणत्या, विवेकवान् माणसाला कळावयास हवे की येथे आपले असे काहीच नाही.)

17. मग येशूच्या अनुयायांपैकी आणखी एकजण म्हणाला, ' प्रभो, मला माझ्या पित्याला पुरायला जाऊ द्या.'

येशू उत्तरला, ' चल तू माझ्यामागून. मेलेल्यांनाच मृतांना पुरु दे- ' (सेंट मॅथ्यू, 8-20,21)

(टीपः या उपदेशाचा आशय असा की जो चैतन्यस्वरुप परमात्म्यासाठी जगतो, आध्यात्मिक जीवन जगतो, तोच खरा जिवंत आहे असे समजावे. जड देहाच्या, जड सृष्टीच्या ठिकाणी आसक्त असतो, तो जडच- मृतप्रायच - समजावा.)

18. सांगतो ना मी तुम्हाला- मागा म्हणजे तुम्हास दिले जाईल; शोधा म्हणजे सापडेल; ठोठावा म्हणजे उघडण्यात येईल. कारण जो कोणी मागतो त्यास मिळते. जो शोधतो त्याला सापडते; आणि ठोठावतो त्याला उघडले जाते.

तुम्हांपैकी कोण असा बाप आहे की ज्याच्याकडे मुलाने पावरोटी मागितली असता तो त्याला दगड देईल ? किंवा मासा मागितला असता माशाऐवजी साप देईल ? तेव्हा, तुम्ही दुष्ट असून देखील जर आपल्या मुलांना चांगल्या देणग्या कशा द्याव्या हे तुम्हास समजते तर मग तुमचा स्वर्गस्थ पिता आपल्याजवळ याचना करणाऱ्यांना किती विपुलतेने या पवित्र

आत्मशक्तीचे (Holy Spirit) दान करील ?

(सेंट लूक, 11-9ते13)

19. जे अन्न नाशिवंत आहे त्याच्यासाठी राबू नका; परंतू जे तुम्हास मानवाचा पुत्र देईल त्याच्यासाठी राबा. ते तुम्हाला अमरत्त्व प्राप्त करुन देईल. त्याचसाठी तर पित्याने (देवाने) त्याची (पुत्राची - येशूची) नियुक्ती केली आहे. (सेंट जॉन, 6-27)

20. माझा पिताच स्वर्गातून येणारी (हृदयातून आनंदरुपाने येणारी) खरी रोटी तुम्हांला देतो. (सेंट जॉन, 6-32)

21. कारण जी स्वर्गातून उतरते (आत्मसाक्षात्काररुपाने) व जगाला, मनुष्याला, जीवन देते (अमर करते), तीच खरी देवाची भाकर.

(सेंट जॉन, 6-33)

22. मला ज्याने पाठविले त्याची इच्छा एवढीच की जो कोणी या पुत्राला पाहील, त्याच्या ठायी श्रद्धा ठेवील, तो चिरंजीवी होईल आणि मी अन्ती त्याचा उद्धार करीन. (सेंट जॉन, 6-40)

(टीप : जे सगुण ईश्वराची निष्काम भक्ति करतात, पण ज्यांना प्रारब्धवशात् स्थूल देहात असेपर्यंत ईश्वरसाक्षात्कार वा आत्मसाक्षात्कार घडत नाही, अशांना अन्त्यसमयी, प्रारब्ध संपते तेव्हा, त्यांचे इष्टदैवत त्यांस दर्शन देऊन, ज्ञान देऊन, मुक्त करते असे मानन्यात येते.)

23. मीच ' जीवनाची भाकर ' आहे. तुमच्या पूर्वजांनी अरण्यांत मान्ना खाल्ला खरा पण ते मेले. पण ही स्वर्गातून येणारी भाकर अशी आहे की ती मानवाने खावी आणि मृत्यूच्या पार जावे.

(सेंट जॉन, 6-48, 49, 50)

24. स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे. ही भाकर जो कोणी खाईल तो सदैव जगेल मी जी भाकर देतो ते माझे मांस होय. जगास जीवन प्राप्त व्हावे म्हणूनच मी ते त्यांस देत असतो.

(सेंट जॉन 6-51)

25. जो माझे मांस खातो, जो माझे रक्त पितो, तो मजमध्ये राहतो, आणि मी त्याच्यामध्ये वास करतो.

(सेंट जॉन, 6-56)

26. जिवंत (चैतन्यरुप पण सगुण अशा) पित्याने जसे मला

पाठविले आणि मी पित्यामुळेच वाचतो, तसेच जो कोणी मला खाईल तो मजमुळेच जगेल. (सेंट जॉन, 6-57)

27. चैतन्य देणारा तो आत्माच आहे. (केवळ) मांसाचे काय प्रयोजन? माझी वचने आत्मस्वरुप (Spirit) आहेत ती जीवन (Life सत्स्वरुप, अमर) आहेत. (सेंट जॉन 6-58)

यावरील येशूच्या वचनांवरुन येशू स्वतःस चित्स्वरुप आनंदस्वरुप मानतो; ज्ञान व आनंद यांनाच तो मांस व रक्त म्हणतो, हे स्पष्ट दिसून येते. तसेच इतर मानवसुद्धा येशूप्रमाणेच आपल्या ज्ञान व आनंदरुपात राहून-आपण आत्मा (spirit) आहोत, मांसरुधिरमय शरीर नव्हे, या ज्ञानाने येशूशी आणि परमात्म्याशी एकरुप होऊ शकतात. हीच वस्तुतः बायबलची शिकवण आहे असे वाटते.

बायबलमधील ही मते सर्वधर्मीयांना सर्वपंथीयांना आदरणीय व्हावीत अशीच आहेत. विशेषतः जे संत सत्पुरुष असतील, त्यांना ही मते अत्यंत श्लाघनीय, अनुभवास पटणारी अशीच वाटतील यात लवमात्र संशय नाही.

अशा या थोर धर्माच्या प्रवर्तकाच्या ठायी आपले मन अकस्मात कसे खेचले गेले याचे वर्णन केल्यावर पुढे त्याचे एकाएकी आपणांस अद्भुत दर्शनही कसे घडले ते श्रीरामकृष्ण सांगतातः

होतों चालत एके समयीं पंचवटी शेजारीं
एवढ्यांत मज दिसे भव्य आकृती होत सामोरी ।।
दीर्घ रुळतसे दाढि उरावर पुरुष अलौकिक थोर
दृष्टिंत त्याच्या दिसते भरली करुणा दिव्य अपार ।।
मंद पाउलीं ये मजजवळी दिसतो गोरापान
सन्निध आला क्षणीं पावला मजमधिं अन्तर्धान ।।

62

अशा प्रकारे येशूचे दर्शन श्रीरामकृष्णांना झालेले कळताच शंभू मल्लिक त्यांस म्हणतातः

महिमा गुरुजि अपार तुमचा, तुम्ही श्रेष्ठ अवतार ।। ध्रु.।।
दास्य सख्य वात्सल्य मधुर भावां तुम्ही साधिलें

सूफि ख्रिस्त अद्वैत पथां ही आक्रमुनी दाविलें ।।
अति दुःसाध्यहि तंत्रसाधनें लीलेनें साधिलीं
अखिल धर्मतत्त्वें तुम्हामधिं पूर्णत्वा पावलीं ।।
चरित न ऐसें कुणी कधीं या जगीं अन्य देखिलें
एकाधारें एका देहीं सर्व धर्म सेविले ।।

63

सामान्य माणसाच्या ठिकाणी सत्त्व, रज व तम हे प्रकृतीचे तीनही गुण सदैव संमिश्र स्थितीतच आढळतात; पण अवतारी पुरुषांचे मन शुद्धसत्त्वमय असते. ज्ञान, वैराग्य व आनंद हे जे सत्त्वगुणाचे आविष्कार, ते त्यांच्यात अत्यंत प्रकर्षाने दिसून येतात. क्ष्यांचे मन, रजतमांनी दूषित झालेले नसल्यामुळे विराट मनाशी एकरुप होऊ शकते. शुद्ध जलात जसे आकाश प्रतिबिम्बित होते तद्वतच शुद्धसत्त्वमय अन्तःकरणात परमात्मा प्रकट होतो. याविरुद्ध, आपली जशी अशुद्ध, गढूळ पाण्यात आपल्याला आपली पडछाया दिसत नाही त्याचप्रमाणे रजतमाभिभूत हृदयात ज्ञानस्वरुप, आनंदस्वरुप आत्म्याचे दर्शन आम्हास घडत नाही. यातच तर अवतारी पुरुषाचे आगळेपण.

सत्त्व, रज व तम हे शब्दस्पर्शादींसारखे गुण नसून परमात्मशक्तीचे त्रिविध आविष्कार आहेत, हे आपण विसरता कामा नये. या शक्तीच्या प्रभावानेच आम्हाला अवस्थात्रय प्राप्त होत असते. सत्त्वामुळे जागृत्, रजामुळे स्वप्न व तमामुळे गाढ निद्रा. याचा अर्थ असा नव्हे की जागृतात सत्त्व गुण मात्र असतो; इतर नसतात. तीनही अवस्थात हे गुण संमिश्र स्वरुपात असतात; पण जागृतात सत्त्वाचा प्रादुर्भाव अधिक. तेव्हा स्थूल व सूक्ष्म या दोन्ही शरीरांना हा व्यापून राहिलेला दिसतो. स्वप्नात सत्त्व गुण क्षीणबल होतो. स्थूल शरीराच्या ठिकाणची त्याची व्याप्ती संकोच पावते. कारण ज्ञानाविष्कार हा त्याचा धर्मविशेष तेव्हा केवळ मनापुरताच मर्यादित झालेला दिसून येतो. आणि तोसुद्धा तेजोहीन, व असहाय अवस्थेत. स्वप्नात रजोगुणाचे प्राबल्य फार. येथे हा सत्त्वगुणाची वाटेल तशी धिंड काढतो. मनास सारखा फिरवीत मिरवीत असतो. येथे मन अतिवेगवान होते. अत्यंत अस्थिर व कर्मप्रवण बनते. म्हणतात, आमचे अतिदीर्घ मानले जाणारे स्वप्नसुद्धा केवळ दीड दोन मिनिटांचेच असते.

तमोगुण तर निद्राप्रांताचा अधिपती. सत्त्व याचा वैरी. तो या वेळी छपून बसतो. आणि रज जणू याच्या भयाने शरीरधारणेव्यतिरिक्त कोणत्याच क्रिया करु धजत नाही. अजाणपण हे तमाचे कार्य.

श्रीरामकृष्णांसारख्या अलौकिक साक्षात्कारी पुरुषांना स्वप्नादी अवस्था नाहीत का येत? येतात; अवश्य येतात. पण त्या अवस्थांमध्ये देखील त्यांना आत्मस्वरुपाचा पूर्ण विसर पडलेला नसतो. कारण त्यांच्या ठिकाणी सत्त्वगुण अत्यंत प्रभावी असतो. तो स्वप्नातसुद्धा त्यांच्यामध्ये आत्मसंभ्रम उपजू देत नाही. एवढेच काय त्यांची स्थूल तनूदेखील इतरांच्या सारखी जरी दिसत असली तरी तिच्यातसुद्धा सत्त्वगुणाचा- ज्ञानाचा- अति उज्वल प्रकाश दिसतो.

सामान्य माणसाचे मन वा अन्तःकरण एक कँडल पॉवरच्या कंदीलासारखे असल्यास या अतिमानवाचे अन्तःकरण हजार कँडल पॉवरच्या कंदीलासारखे असते. पहिल्या प्रकारच्या कंदीलाच्या काचेवर एखादा जाड कागद चिकटविला असता आतील दिव्याचा प्रकाश बाहेर पडणार नाही. पण तसाच एक कागद हजार कँडल पॉवरच्या फाणसावर लावला असता त्या कागदातूनदेखील प्रकाश बाहेर येतो. तद्वत् सामान्य जनातील ज्ञानाचा- चैतन्याचा- प्रकाश स्थूल शरीरातून प्रकट होत नाही. पण याउलट शुद्धसत्त्वमय लोकोत्तर पुरुषांची स्थूल कायासुद्धा बाह्यस्पंदना संवेदनाक्षम झालेली दिसून येते. आपली आंतर ज्ञानशक्ती, चित्शक्ती वा चैतन्य इतरांमध्ये केवळ शारीरिक स्पर्शाने ते संक्रामित करु शकतात! एखाद्याला अनेक परींनी समजावून सांगितले असतादेखील एखादी गोष्ट ध्यानी येत नसेल वा पटत नसेल तर श्रीरामकृष्ण त्याला स्पर्श करीत व त्याच्यात लगेच अनुकूल असा मनोपालट घडून येई ! अशी अनेक उदाहरणे देता येतील. एखाद्याला स्पर्शमात्रेकरुन देहातीत अवस्थेत नेत व त्याच्याकडून त्याच्या पूर्वजन्मींचे रहस्य वदवून घेत ! असे त्यांनी विवेकानंदाच्या बाबतीत केले होते. ज्या ज्ञानाचे आदान प्रदान आम्हाला- सामान्य जनांना - शब्दद्वारेसुद्धा करणे दुःसाध्य, ते ते केवळ कायेने करीत होते ! त्यांची तनूच शब्दमय, ज्ञानमय, प्रत्यक्ष साकारलेले उपनिषद् होती असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ शकेल का ?

इतरांच्या मनातील विचारांचे तरंग वा स्पंद आमच्या मनावर केवळ

शारीरिक स्पर्शाने आघात करु शकत नाहीत, एवढ्याचसाठी की आमच्या मनाभोवती असलेलीं तमोगुणाची अस्तरे या स्पंदांना मनापर्यंत पोहोचूच देत नाहीत. परंतु श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी या तरंगांना प्रत्यवाय आणणारी अशी रजतमांची पटले नव्हती. विशेषतः त्यांचे मन जेव्हा उच्च भावावस्थेत जाई तेव्हा त्यांना सत्त्वगुणी व्यक्तीखेरीज इतर कुणाचाही स्पर्श सहन होत नसे ! नाण्याचा संपर्क तर त्यांना सदैव असह्य यातना देई ! क्षत पडलेल्या व्यक्तीचा स्पर्श- ती व्यक्ती मग कितीही शुद्ध वा सात्त्विक असो- ते भावावेशात असता त्यांच्या अंगात तिडीक उठवी ! त्यांना नाण्याचे वावडे होते ते त्यांच्या तीव्र वैराग्यामुळे; व व्रणित शरीराचा म्हणजेच दुःखिताचा, पीडिताचा संपर्क त्यांना सोसवत नसे, तो त्या व्रणी व्यक्तीतील सत्त्वगुण (आनंद) उणावलेला असल्यामुळे. ज्याच्या देहावर जखम, गळू वगैरे आहेत अशाने देवपूजा करु नये म्हणतात, ते यास्तवच.

शुद्धसत्त्वापन्न झाले म्हणजे वैयक्तिक मनसुद्धा विराट मनाशी कसे एकरुप होऊ शकते याचे प्रात्यक्षिक म्हणून श्रीरामकृष्णांच्या जीवनातील एका घटनेचा येथे उल्लेख करावासा वाटतो.

एकदा एकजण कालीमंदिराच्या आवारातल्या हिरवळीवरुन जात होता. त्या कोवळ्या गवतावरुन चालत असलेल्या माणसाला श्रीरामकृष्णांनी पाहिले. पाहता पाहता त्या सुकुमार गवताचा त्यांस द्रव आला. आपल्या छातीवरुनच कोणी धटिंगण रानवटपणे चालत आहे असे त्यांस वाटले ! असह्य वेदना होऊ लागल्या ! ! एवढेच काय, त्यांच्या वक्षःस्थलावर निळसर लाल रंगाची चिन्हे उमटली ! ! !काय हा तादात्म्य भाव ! कोणत्या कोटीतील हे प्रेम ! ते सुद्धा सदैव पदतळीच असणाऱ्या तृणाविषयी !

असाच आणखी एक प्रसंग. एके दिवशी श्रीरामकृष्ण अर्धबाह्य स्थितीतच वाहत्या गंगेकडे पाहात उभे होते. तेव्हा त्यांना गंगेच्या घाटाला लागलेल्या एका नावेमधील दोघा कोळ्यात कडाक्याचे भांडण जुंपलेले दिसले. प्रसंग हातघाईवर आला. एकमेकांवर वार होऊ लागले. पाहता पाहता श्रीरामकृष्णांनी एकाएकी किंकाळी फोडली. मंदिरात असलेला त्यांचा भाचा हृदयराम धावत आला. त्याला आपल्या मामांच्या पाठीवर उमटलेले काठीचे वळ दिसले ! जवळपास कोणीच नव्हते. आपल्या सालस,

साधुशील मामांना मारणारा कोण हा दुष्ट ? हा प्रश्न त्यांच्या मनाला कढवू लागला. ब-याच काळाने, मन प्रकृतिस्थ झाल्यावर, आपल्या पाठीवर वळ उठण्याचे कारण श्रीरामकृष्णांनी हृदयला सांगितले. हृदयच्या आश्चर्याला सीमाच उरली नाही. तो म्हणतो-

आगळे रे रुप तुझे आगळे रे रंग
चिन्मया घेतलें तूवां मृण्मयाचें सोंग ।।
आगळा तुझा रे पिंड रजतमोहीन
शुद्धसत्त्वें झालें व्यक्त ब्रह्म सनातन ।।
नाहीं तरी उमटलीं पाउलें हीं ऊरीं
कधींकोणी का चालतां तृणाङ्कुरावरी ।।
मारीतसे अन्य अन्या परी तुझ्या पाठीं
दिसती हे कैसे वण लागतां न काठी ।।

64

ज्याची दृष्टी ब्रह्ममयी झाली, ज्याला सर्वत्र आत्माच दिसतो, तोच खरा भक्त. तोच भागवतोत्तम. तोच पूजनीय. ज्याचा दुजाभाव लोपला तोच साक्षात्कारी; हेच शास्त्रांचे सांगणे आहे. पण अशा निर्द्वंद्वावस्थेत अधिष्ठित होऊनही, अज्ञानी जनांच्या कळवळ्यामुळे, आपले मन बळेच देहस्थितीत ओढून आणणा-या श्रीरामकृष्णांना पाहता वाटते की -

इन्द्रियां गोचर जें जें काहीं होई तेथें देव पाही तोची भक्त ।।
सर्वांभूतीं देव वसतो सदैव ऐसा ज्याचा भाव तोची भक्त ।।
सर्वत्र विरक्त भोगीं अनासक्त आत्मीं अनुरक्त तोची भक्त ।।
ऐसे जरी भक्त होती रामकृष्ण बळे देहज्ञान वागवीती ।।
शिक्षापिण्या जनां राखीती अहंत्वा अर्पोनी कर्तृत्वा कालीमाते ।।

65

सर्वात्मभाव साधावयाचा म्हणजे देहात्मभाव नष्ट झालाच पाहिजे. ' मी ' आणि ' ममत्व ' विवेकाग्नीत पोळून काढलेच पाहिजे. सर्वांभूती ईश्वर पाहू इच्छिणा-याने देहबुद्धीच्या अतीत नको का जावयाला? देहात्मभावाच्या अतीत जाण्यास योगसमाधीच साधली पाहिजे असे नाही आणि अशी समाधी साधणे कदाचित् शक्य नसले तरी नित्य जागरुकतेने, नित्य व अनित्य- कोणती वस्तू शाश्वत व कोणती अशाश्वत- यांच्याविषयींच्या विचाराने

देहबुद्धीचा त्याग करणे, कोणाही निष्ठावंत साधकास जरुर शक्य आहे. केवळ समाधीत असतानाच नव्हे तर व्यवहारकाळी देखील मन कसे उच्च पातळीवर ठेवता येईल याविषयी आपल्या जीवनातील एका आदर्श घटनेच्या द्वारे श्रीरामकृष्ण आम्हांला दिलासा देतात.

या घटनाकाळी श्रीरामकृष्ण कामारपुकूरी होते. तेथून ते जयरामवटीमार्गे हृदयच्या गावी जाण्यास निघाले. अनेक कठोर साधनांमुळे त्यांची प्रकृती फार नाजूक झाली होती. त्यांना फार चालवत नसे. म्हणून जाण्यासाठी पालखीची व्यवस्था करण्यात आली होती. स्त्रीपुरुष सर्वांसच प्रिय अशी ही नयनरम्य मूर्ती हृदयरामासमवेत जाण्यास निघाली. त्या प्रसंगाचे कामारपुकुरचे लोक वर्णन करतातः

हृदयगृहीं एकदां गदाधर पालखींत बैसोनी
झाला सज्ज निघाया अङ्गीं अरुणाम्बर लेवूनी ।।
जन जमले ती सुवर्णमूर्तीं पालखींत पाहाण्या
पाचारिति नयनाभिराम तें ध्यान जनां देखिण्या ।।
काञ्चनाङ्गिंगची कान्ती झिरपे सिन्दुर वसनांतूनी
ताम्बूलाची लाली अधरीं देखिति आ वासोनी ।।
गदाधरासी उमग न पडला कां अपणा वेष्टिती
हृदय सांगतो, ' सौन्दर्या तव मुग्धमती देखिती ।।'
' धिक् धिक् ऐशां नरां मूढ जे मृत्पिंडा मानिती '
म्हणत फिरुनि येई न च जाई शिबिका त्यजी गदाई ।।

66

श्रीरामकृष्णांचे वैराग्य एवढ्या थराला पोहोचले होते की त्यांना नाण्यांचा स्पर्शसुद्धा सहन होत नसे; एवढेच नव्हे तर त्यांच्या उत्तरजीवनात कोणत्याही धातूच्या भांड्यांना देखील त्यांना शिववत नसे. अशा भांड्यांना हात लागताच त्यांना कळा येत; म्हणून ते मातीच्या भांड्यातून पाणी पीत व केळीच्या पानावर जेवीत.

एकदा मथुरानाथांनी श्रीरामकृष्णांच्या जीवनास आधार व्हावा म्हणून त्यांच्या नावे काही पैसे ठेवण्याविषयीचे आपले मनोगत त्यांस सांगितले. ते एकताच श्रीरामकृष्ण अत्यंत उद्विग्न झाले व त्यांनी मथुरबाबूंचा धिःक्कार करुन त्यांस घालवून दिले. मथुरबाबू संमिश्र

भावनांनी परतले. या महापुरुषाच्या सेवेची संधी आपणास लाभली नाही म्हणून एका पक्षी त्यांचा मनोभंग झाला खरा पण दुस-या दृष्टीने श्रीरामकृष्णांचे वैराग्य पाहून त्यांना तेवढेच समाधान पण वाटले.

असाच आणखी एक प्रसंग. लक्ष्मीनारायण नावाचे एक मारवाडी गृहस्थ श्रीरामकृष्णांकडे येत असत. त्यांनी श्रीरामकृष्णांना अन्नवस्त्राच्या बाबतीत किमान गरजा तरी विनांसायास उपलब्ध व्हाव्यात म्हणून त्यांच्या नावे दहा हजार रुपये बँकेत ठेवण्याची आपली मनीषा विदित केली. ते ऐकताच श्रीरामकृष्णांना किती असह्य वेदना झाल्या हे आपण पुढे त्यांच्याच तोंडून ऐकू.

स्वामी प्रेमानंद, श्रीरामकृष्णांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक, आपल्या गुरुंच्या वैराग्याविषयी बोलताना सांगत, ' एके रात्री दक्षिणेश्वरी श्रीरामकृष्णांच्या खोलीत मी झोपलो असता मला मध्येच जाग आली. उठून पाहतो तो एक अद्‌भूत दृष्य दिसले. बगलेत आपले धोतर अडकवून ठाकूर (श्रीरामकृष्ण) अत्यंत उद्विग्न स्थितीत येरझारा घालीत होते. जाता जाता मागे वळत आणि भुईवर थुंकीत; व म्हणत, ' थूः ! थूः ! थुंकतो मी तिच्यावर! नको ती मला; आई, ने पाहू ती परत ! अशा क्षुद्र गोष्टींचा मोह नको पाडू मला'.

स्वामी प्रेमानंदांना आपल्या गुरुंच्या या विचित्र वागण्याचा मुळीच उमज पडेना. हा सर्व काळ श्रीरामकृष्ण अर्धबाह्य स्थितीतच होते. ते प्रकृतिस्थ होताच स्वामी प्रेमानंदांनी याविषयी त्यांना विचारले असता ते म्हणाले, ' मध्यरात्रीच एकाएकी मी झोपेतून जागा झालो; आणि हातात एक टोपली घेऊन मजजवळ येत असलेली आई (कालीमाता) मला दिसली ! माझ्या चटकन् लक्षात आले की मला देण्यास आई कीर्ती, वैभव वगैरे भौतिक गोष्टी या टोपलीतून आणीत आहे. ते पाहताच मला एवढी शिसारी आली की तिला त्या गोष्टी परत नेण्यास मी अगदी कळवळून विनविले. माझी याचना ऐकताच आईने स्मित केले व ती अदृश्य झाली.

या सा-या गोष्टी श्रीरामकृष्ण स्वतः सांगताहेत-

मथुरानाथें येतां देऊं वित्ता तया उपेक्षीलें
लक्ष्मीनारायणेंहि देतां धन त्या तसें अव्हेरीलें ।।
शतशतकें रुपयांचीं येतां तो घेउनी करुं दान

वाटे कापुनि नरटी करवतिने काढितो कुणी प्राण ।।
आईही मम मागुनि येई कीर्ती दिगंत देण्यातें
परि वाटते करीं मज विष्टेची टोपली धरुनि येते ।।

67

अहिंसा, सत्य, अस्तेय इत्यादी धर्म काया, वाचा, मने करुन पाळावे असे शास्त्रे सांगतात. शारीरिक, वाचिक व मानसिक हिंसा म्हणजे काय, याचा आम्हास बोध होऊ शकतो. वाचिक व मानसिक सत्य यातील फरकही जाणणे आपणास विशेष अवघड वाटत नाही. उदाहरणार्थ, धर्मराजाने, ' अश्वत्थामा मेला ' असे द्रोणाचार्यांस ऐकू जाईल अशा आवाजात जेव्हा म्हटले तेव्हा ते वाचिक सत्य होते; कारण अश्वत्थामा नावाचा हत्ती मेला होता; पण ते मानसिक सत्य नव्हते. द्रोणपुत्र अश्वत्थामा मेला असेच युधिष्ठिराला भासवावयाचे होते. ' अश्वत्थामा मेला ' म्हणताना तो आपल्या मनात जो विचार वागवीत होता त्यात लबाडी होती; असत्य होते. हे युधिष्ठिराचे कर्म योग्य होते का अयोग्य होते; ते पुण्यकर्म होते का पापकर्म होते, याचे येथे विवेचन करणे अप्रासंगिक होईल पण जेथे स्वार्थ मुळीच साधावयाचा नसतो, परहितसाधन हेच एकमेव ध्येय असते तेथे कोणतेच कर्म धर्मविरुद्ध होऊ शकत नाही, ते पापकर्म मानले जात नाही, हा शास्त्राचा सर्वसामान्य नियम आहे. तेव्हा कोणत्याही बाबीचा धर्माधर्मनिर्णय याच नियमाच्या कसोटीने लावावा.

वाचिक व मानसिक सत्य यांची कल्पना जरी आम्हास करवते तरी कायेने सत्य पाळावे म्हणजे काय, याचा मात्र उलगडा होत नाही. श्रीरामकृष्णांच्या अगदीच आगळ्या वेगळ्या अशा जीवनात मात्र या शंकेचे समाधान आपल्याला सापडते.

कालीमंदिराशेजारीच असलेल्या शंभू मल्लिकांकडे श्रीरामकृष्ण अधूनमधून जात; अध्यात्मचर्चा करीत; आणि आपल्या निवासस्थानी परतत. त्यांना पोटदुखीचा विकार होता. शंभूचरणाकडे जाऊन असेच एकदा ते बोलत असता त्यांच्या या दुखण्याने उचल खाल्ली. शंभूबाबू तेव्हा त्यांस म्हणाले, ' दोन अफूच्या गोळ्या मी तुम्हास देईन. परतल्यावर त्या घ्या, म्हणजे बरे वाटेल'. पुनश्च इतर विषयांवर बोलणे चालू झाले व दोघांनाही या गोष्टीचा विसर पडला. श्रीरामकृष्ण शंभूचरणांची रजा घेऊन निघाले.

काही पावले जाताच श्रीरामकृष्णांना गोळ्यांची आठवण झाली. त्या नेण्यासाठी ते परत आले. पण शंभूचरण तेथे नव्हते. म्हणून श्रीरामकृष्णांनी त्यांच्या कंपौंडरकडून गोळ्या घेतल्या व फिरुन निघाले. पण कोण आश्चर्य ! फाटक ओलांडून जातात तो रस्ताच नीट सापडेना ! पाय भलत्याच ठिकाणी नेऊ लागले. फिरुन फाटकापर्यंत आले. पुनः प्रयत्न केला; तरी तेच ! दोन तीन वेळा प्रयत्न करुन देखील निष्फळ ! नेहमीची, ओळखीचीच वाट, पण आज असे का व्हावे ? फाटकाशी बसून त्यांनी विचार केला. आता आली त्यांच्या लक्षात सारी गोष्ट - ' शंभूंनी, ' आपण ' गोळ्या देतो म्हणून सांगितले होते. कंपौंडरकडून न्यावयास नाही सांगितले. मग त्यांना न कळविता अशा या गोळ्या नेणे म्हणजे खोटेपणा नि चोरी केल्याचे दोन्ही दोष अंगी नाहीत का येत? म्हणूनच हे असे घडले !

श्रीरामकृष्ण लागलीच दवाखान्यात आले. पण एवढ्यात कंपौंडर गेला होता. काय करावे ? ' ह्या घ्या हो तुमच्या गोळ्या परत' , असे मोठ्याने ओरडत त्यांनी ती पुडी आत टाकली व परत निघाले. आता वाट स्वच्छ दिसू लागली ! काय हा चमत्कार !!

अवतारी पुरुषाचे शरीर शुद्धसत्त्वमय असते असे जे म्हणतात, त्याचे हे प्रात्यक्षिक. ' पडले वळण इन्द्रियां सकळां ' अशी ही स्थिती. कायेनेसुद्धा सत्यपालन करावे ते असे. किंबहुना श्रीरामकृष्णांनी सत्यपालन केले म्हणण्यापेक्षा ते सत्यस्वरुप झाले होते असे म्हणणेच अधिक संयुक्तित नाही का होणार ? कारण-

सांगा हो कुणी ऐसा कधीं पाहिला सत्य हेंचि ज्याचें अंग सत्या वाहिला ।।
सत्यभक्त जे का सत्या सदा सेविती तयां होती रामकृष्ण आदर्श यती ।।
शंभूसेवकें दिधली अफू आणितां आक्रमूं न शक्त होती परिचिता पथा ।।

68

श्रीरामकृष्णांच्या आता सा-या साधना संपल्या. स्वानंदसाम्राज्याचे ते अधिपती झाले. आपल्या दीर्घ साधनांनी जोडलेल्या अक्षय ज्ञानाचे वितरण करण्याची त्यांची उत्कंठा दिवसागणिक वाढू लागली. त्यांचे आसावलेले नेत्र अधिकारी शिष्यांची सदैव मार्गप्रतिक्षा करु लागले ! कालीमातेने त्यांच्याकडे अनेक विरागी युवक येणार असल्याचे आधीच वर्तविले होते, हे पण एक कारण असावे त्यांच्या या तळमळीला.

आपल्या प्रचंड साधनबळाच्या योगे श्रीरामकृष्णांनी अथांग अध्यात्मसागर आपल्या तनूत सामावून धरला खरा पण त्याला तेथे थोपवून धरणे त्यांना किती दुष्कर झाले असावे ते त्यांचे त्यांनाच ठाऊक. इवलीशी आनंदाची घटना घडली असता तिची वाच्यता केल्याविना आम्हास राहवत नाही; तो आनंद अंतरी आपण जोपू शकत नाही. मग मुळातच अहेतुकदयासिंधू अशा श्रीरामकृष्णांस अक्षयसुखाचा साठा मिळाल्यावर, तो इतरांस देण्यास त्यांचा जीव फुटावा, यात नवल ते काय? दिवस ओसरेपर्यंत ते आपला दुःखावेग कसाबसा आवरीत. पण एकदा का रात्रीच्या छाया पसरु लागल्या म्हणजे मात्र त्यांना शोक आवरेनासा होई. मग ते जवळच्या इमारतीच्या गच्चीवर जात व उच्च स्वरात म्हणत-

भवरोगें जे ग्रासिले ताप त्रितयें पोळले
ऐशांस्तव भेषज दिलें देवीने मज ।।
या हो या हो सारे जन विषयां का ना विटे मन
आनंदाचें अक्षय धन तुम्हासाठीं ठेविलें ।।
कोठें गेलांत रे सगळे पथीं तुमच्या माझे डोळे
हृदय वाटे पिरगळलें तुम्हाविणें ।।
ऐसें म्हणतां लोचन होती त्यांचे जलाकीर्ण
धरतीवरती रामकृष्ण घेती लोळण लडबडां ।।
69

अधिकारी जिज्ञासूंना ज्ञान देण्याविषयीची ही तळमळ श्रीरामकृष्णांना फार दिवस वागवावी लागली नाही. हळूहळू एकामागून एक आतुर भक्त, ज्ञानपिपासू संयमी साधक, त्यांच्याकडे येऊ लागले. त्यांच्यामध्ये सा-या जगताला आपल्या चरणी नतमस्तक होऊ लावणारे दिगंतकीर्ती स्वामी विवेकानंदही होते.

स्वामी विवेकानंदांचे पूर्वाश्रमीचे नाव नरेंद्रनाथ. श्रीरामकृष्णांच्या इतर काही भक्तांसमवेत नरेन्द्र श्रीरामकृष्णांस भेटावयास गेला. या प्रथम भेटीतच नरेन्द्राचे आगळे व्यक्तिमत्त्व पाहून श्रीरामकृष्णांचे डोळे निवले ! कलकत्त्यासारख्या भोगप्रवण शहरात एवढ्या मोठ्या आध्यात्मिक अधिकाराचा अन्तर्मुख मुलगा निपजावा याचे त्यांना आश्चर्य वाटले !

नरेन्द्राला श्रीरामकृष्णांनी गाणे गावयास सांगितले नरेन्दाने गाणे

गाईले. त्यात एवढी तळमळ, आर्तता भरली होती की ते ऐकता ऐकता श्रीरामकृष्णांचे देहभान हरपले- ते भावाविष्ट झाले. नंतर नरेन्द्रादींनी श्रीरामकृष्णांची रजा घेतली.

नरेन्द्राच्या भेटीनंतर श्रीरामकृष्णांना या निष्काम, निरागस युवकाला पुनः भेटण्याची एवढी उत्कंठा लागली की सांगता सोय नाही ! जशी कालीमातेच्या दर्शनासाठी तळमळ लागली होती, जवळजवळ तशीच व्याकुलता आता नरेन्द्रासाठी त्यांच्यात दिसून येऊ लागली ! श्रीरामकृष्ण सांगत की असा हा पुरे सहा महिने नरेन्द्राकडे त्यांचा जीव ओढीत होता ! मग याची तीव्रता किंचित् उणावली, नरमली. इतर जे त्यांचे शिष्य होते, त्यांजविषयी देखील श्रीरामकृष्णांना पराकाष्ठेचा जिव्हाळा वाटे. पण नरेन्द्रावरचे त्यांचे प्रेम त्याहून उत्कट; अगदीच जगावेगळे- मनवाचातीत !

प्रथम भेटीनंतर सात आठ दिवस नरेन्द्र श्रीरामकृष्णांच्या भेटीस गेला नव्हता. एवढा काळ देखील नरेन्द्राच्या भेटीवाचून राहणे श्रीरामकृष्णांस असह्य झाले ! याच वेळी रामदयाळ नामक एक श्रीरामकृष्णभक्त इतर काही भक्तांसमवेत दक्षिणेश्वरी आले होते. रात्री ते श्रीरामकृष्णांच्या खोलीजवळच्या व्हरांड्यात झोपले. तेव्हा श्रीरामकृष्ण बगलेत धोतर खोवून उभी रात्र मधून मधून, झोपलेल्या रामदयाळांकडे जात व त्यांना कळवळून म्हणत, ' नरेन्द्र ब-याच दिवसात येथे आला नाही, त्यामुळे पिळा पिळावा तद्वत् माझे हृदयच कोणी पिरगाळीत आहे असे वाटते ! असह्य वेदना होतात ! भेटून सांगाल का त्याला इकडे येण्याला ? सारी रात्र याच विनवणीची उजळणी करण्यात येत होती ! हे विलक्षण शिष्यप्रेम पाहून रामदयाळांचे हृदय विस्मय व आदर यांनी भारावले. श्रीरामकृष्णांच्या बाबतीत सा-याच गोष्टी अद्‌भुत. श्रीरामकृष्णांची ही शिष्यप्रीती पाहिल्यास आमच्या ' परमकारुणिक ' देवाविषयींच्या कल्पनादेखील किती उथळ आहेत याचा आम्हास उमज पडतो ! वाटते, हा अतिमानव देवाच्या अमर्याद प्रेमाची साक्ष पटविण्यासाठीच अवतरला ! असीमाचे प्रेमही असीमच असणार !!

नरेन्द्रभेटीस आसावलेल्या श्रीरामकृष्णांची ही गोष्ट रामदयाळबाबू सांगतातः

' कां न च आला नरेन्द्र माझा येण्या त्या येथें सांगा

बोलुं कुणाशीं उकलुं कुणाशीं हृदयींच्या या मम भावा ।।
कामकाञ्चनीं सारे रुतले अधोमुख मृणालोपम ते
परि पद्मासम अलिप्त माझा विश्वनाथसुत शोभतसे ।।'
म्हणत असें ते पूर्ण रात्र प्रिय शिष्यातें अपुल्या ध्याती
वसन धरोनी काखोटीमधिं मजपाशीं ये जा करिती ।।
' नरेन्द्रापरी सत्त्वगुणी नर जगहि धुंडितां का गवसे
तया भेटुनी अवश्य सांगा सत्वरि येण्यातें येथें ।।'
फिरफिरुनी मज हीच विनंती हीच याचना करिती ते
वर्णूं कैसी तळमळ त्यांची साध्य न तें या रसनेतें ।।
विरक्त साधूची ही प्रीती स्मरतां होई गुंग मती
अनुराग करुं तोची जाणे विरागी असे जो जगतीं ।।

70

नरेन्द्र श्रीरामकृष्णांस भेटावयास गेला, तो पहिल्या भेटीनंतर जवळ जवळ एका महिन्याने. खोलीत प्रवेश करताच आपल्या पलंगडीवर बसलेले श्रीरामकृष्ण त्याला दिसले. शिष्यमुख पाहून श्रीरामकृष्णांना आनंदाचे भरतेच आले. मोठ्या स्नेहाने त्यांनी नरेन्द्राला पलंगडीवरच एका बाजूस बसविले. थोड्याच अवधीत भावाविष्ट होऊन, आपल्याशीच काहीतरी पुटपुटत ते नरेन्द्रापाशी गेले नि चटकन् त्याच्या अंगावर आपला पाय त्यांनी टेकला. त्या अद्भुत स्पर्शाने नरेन्द्रावर अत्यंत विस्मयजनक परिणाम झाला ! त्याला भासू लागले की आपण बसलेली खोली, तिच्यातील वस्तू, सारे विश्वच, अति वेगाने फिरत आहे; आणि त्यासमवेत आपले व्यक्तिमत्त्व- अस्तित्त्व- देखील अस्तावत आहे ! महाशून्यात लीन होत आहे ! हा प्रकार अनुभवताच बिचाऱ्या नरेन्द्राचा जीव गोळा झाला. भयार्त होऊन तो ओरडू लागला, ' काय करीत आहां हो तुम्ही मला ? घरी माझे आईवडील आहेत ! ' हे ऐकून श्रीरामकृष्ण खदखद हसले व त्याच्या उरावरुन हात फिरवीत म्हणाले, ' राहू दे तर ते आता... ' काय चमत्कार ! या स्पर्शाने क्षणार्धातच नरेन्द्राचे मन पूर्ववत् व्यावहारिक पातळीवर आले !

नरेन्द्राला आपले मन बलशाली असल्याचा, ते दुर्बल तर खास नव्हे असा, अभिमान होता. आपल्या मनास वाटेल तसे खेळवणारी, त्यात वाटेल त्या विक्रिया घडवून आणणारी ही अजब व्यक्ती कोण ? या प्रश्नाने त्याचे

मन व्यापले. ' पुन्हा जाईन तेव्हा या माणसाला (श्रीरामकृष्णांना) असे करु देणार नाही', असा त्याने आपल्याशी निश्चय केला.

दुसऱ्या भेटीनंतर आठदहा दिवसांनी नरेन्द्र दक्षिणेश्वरी आला. यावेळी त्यास श्रीरामकृष्णांनी शेजारच्या यदू मल्लिकांच्या बगिच्यात नेले. दोघेही काही काळ तेथे हिंडून फिरुन दिवाणखान्यात येऊन बसले. एवढ्यात श्रीरामकृष्णांना समाधी लागली. नरेन्द्र आज फार जागरुक होता. गतसमयी झाल्याप्रमाणे आज काही प्रकार घडू द्यावयाचा नाही, हा त्याचा निर्धार; पण कसचे काय ! या खेपेसही रामकृष्णांनी तसाच स्पर्श केला आणि एखादे वावटळीत सापडलेले सुके पान जसे वारा नेईल तेथे जाते तसे नरेन्द्राचे मन त्या स्पर्शाच्या योगाने शरीरसंज्ञेच्या पार कोठच्या कोठे वाहून गेले !!

यावेळी आपले मन देहातीत अवस्थेत नेण्यात आल्यावर आपणाला काय अनुभव आले, याची प्रत्यक्ष नरेन्द्राने जरी कुणाशी वाच्यता केली नसली तरी श्रीरामकृष्ण सांगत असत की बाह्यसंज्ञाशून्य झाल्यावर नरेन्द्राला अनेक गोष्टी विचारण्यात आल्या ! त्यानेही अन्तर्मुख होऊन त्या प्रश्नांची यथोचित उत्तरे दिली ! तो कोण; कुठून आला, कशासाठी आला, हे सगळे त्याने सांगितले ! आणि त्याची ही निर्वचने आपल्याला आधी घडलेल्या त्याच्या विषयींच्या दृष्टान्ताशी मिळतीजुळतीच होती !

रामकृष्णा ! धन्य तुझी-

काय तुवां ही जादू केली पादस्पर्शें संज्ञा नेली
नरेन्द्रनिभ नरवरा बाहुली हातची जणुं बनविली ।।
गतजन्मीचें गूढ वदविलें भवितव्या तूं भाकित केलें
रहस्य उकलिसि नैक जन्मिंचें नरेन्द्रादिकांचें ।।
चिद्रूपचि तूं होउनि वससी सकलां अंतरिं म्हणुनि जाणसी
मायातनु धरुनी जरि फिरसी सत्स्वरुप असशी ।।
असीमासी त्या सीमा कैच्या भक्तां नाना अनुभूतींच्या
मार्गीं आरुढ करिसी स्वेच्छामात्रें करुनी प्रभो ।।

71

नरेन्द्राविषयी आपणास घडलेले दृष्टान्त श्रीरामकृष्ण कधी कधी बोलून दाखवीत. ते म्हणत, ' नरेन्द्रासारखा पुरुष या युगात आजवर

प्रकटलाच नाही; ' तर कधी म्हणत, ' नरेन्द्र असीमाच्या राज्यातील- जेथे देवदेवींना देखील प्रवेश मिळविणे शक्य होत नाही अशा त्रिगुणातीत भूमीवर आरुढ झालेल्या ऋषींमधील- एकाचा अंशावतार'.

एके दिवशी आपले मन अतिउच्च स्थितीत- समाधींत- गेले असता आपल्याला नरेन्द्राविषयी काय दिसले त्याचे श्रीरामकृष्ण स्वतः वर्णन करतातः

ध्यानिं बैसतां एके दिवशीं दिव्य पथें मम मन आकाशीं
जात राही तारांगण दाटुनी शिरे कल्पनातीत प्राङ्गणीं ।।
मूर्त जगा जी राही व्यापुनी तेजोमय त्या शीवे लंघुनी
सदसदाहुनी भिन्न स्थानीं जेथ दिसे न च देव वा कुणी ।।
देवदेवता खालिं राहिले प्रवेशुं तेथें न च ते धजले
क्षणीं त्याच मी सात पाहिले ऋषि तेजस्वी ध्यानीं बैसलें ।।
त्यांच्या अपूर्व तेजें धालों पाहतची कौतुकें ठाकलों
चिदाकाश इतुक्यांत गोठलें गोंडस निरुपम बालक झालें ।।
मुनिच्या कण्ठीं घालुनी विळखा बालक जेव्हां पाही तन्मुखा
समाधि मुनिची तुरंत भंगे घडे चमत्कृति तदङ्गसंगें ।।
अर्भक विनवी मुनितें येण्या अपुल्या संगें जनां सेविण्या
विनति शिशूची अवमानीण्या धजे न मुनि ये शिशुमागुनियां ।।
सप्तर्षिंतला जो अवतरला खास तो मुनी नरेन्द्र झाला
नरेन्द्रेंहि जें मज सांगितलें तें मम अनुभूतीसी जुळलें ।।
(टीपः या दृष्टान्तातील ' अर्भक ' स्वतः श्रीरामकृष्ण होत.)

72

श्रीरामकृष्णांच्या दिव्य सहवासात नरेन्द्र आपले दिवस अत्यंत आनंदात घालवीत होता. पण गुरुचरणांच्या प्रथम दर्शनानंतर केवळ चार वर्षांच्या आत, म्हणजे 1884 साली, नरेन्द्राचे वडील निवर्तले. पित्याच्या निधनामुळे नरेन्द्रावर दारुण प्रसंग ओढवला. विश्वनाथ दत्त, नरेन्द्राचे वडील, जरी नावाजलेले वकील होते, त्यांचे उत्पन्न जरी दांडगे होते तरी त्यांची वृत्ती अतिउदार असल्यामुळे खर्च बेसुमार होता. अतएव आपल्या पश्चात् ते काहीच ठेवू शकले नाहीत; उलट किंचित् कर्जच होते.

नरेन्द्राला आता प्राणधारणेपुरतेदेखील अन्नवस्त्रादी मिळविणे दुष्कर

झाले ! जिवाचीं हुल्लड करुनसुद्धा एखादी नोकरी मिळविणे त्यास साध्य होईना ! सर्व परींनी लायक, विश्वविद्यालयीन शिक्षण झालेला, पदवीधर मुलगा; पण त्याला चरितार्थाचे एकही साधन मिळू नये ! आणि ही नव्वद वर्षांमागील गोष्ट; जेव्हा नोकऱ्या अनायासे मिळू शकत !

परिस्थितीशी झुंज देता देता नरेन्द्राचा जीव आंबला.

त्याच्या स्वभावतःच अन्तर्मुख मनाने जीवनाचे गूढ उकलण्यासाठी स्वस्वरुपी बुडी घेतली. त्याचा विवेक जागृत झाला. मन आत्माभिमुख झाले. हा संसार बिनबुडाचा, पोकळ, मायावी आहे असे त्यास निश्चयात्मक ज्ञान झाले. त्याला दिसले की, आपल्या मनावरील मायेची पटले एकामागून एक निपटली जात आहेत व त्याचबरोबर साऱ्या सांसारिक चिंता, औदासीन्य वगैरे अस्तावत आहेत ! आनंद, उत्साह नसानसातून संचरत आहे !

नरेन्द्र आता साऱ्या प्रापंचिक गोष्टींविषयी उदासीन झाला. या चंचल, नश्वर जागतिक सुखासाठी, केवळ कुटुंबपोषणासाठी, देहमनादींस सतत राबविण्याची कल्पनाच त्यास सहन होईना ! संन्यास घेण्याचे त्याने ठरविले ! गृहत्यागाचा दिवसही निश्चित केला ! गुरुंची अनुज्ञा, आशिर्वाद घेऊन चलावे !

नरेन्द्राच्या मनात विचारचक्र चालू झाले- ' गुरुजींकडे जाईन व त्यांना सांगेन ' -

'व्यर्थ केली पायपीट होउनी मी अती धीट
दाटण्या हें वाळवंट भवसीकितेचें ।।
अहंतेच्या धरतीवरी मोहरश्मि धी पसरी
विषयमृगजला निर्मुनि भविं मज भ्रमवी ।।
विनति गुरो ही तुम्हा अनुमति द्या मज जाण्या
गेहादिक वर्जुनियां मोक्ष साधण्या ।।
मोहपाश मम समस्त तोडण्या व्हावें संन्यस्त
यास्तव ठेवावा हस्त मस्तकीं गुरो माझ्या ' ।।

73

पृथ्वीवरच राहून पाहिल्यास पृथ्वी गोल असल्याचे दिसते काय? पृथ्वीपासून अती दूर जावे म्हणजेच तिचे खरे रुप, तिची वर्तुळाकृती, दिसेल. तसेच अती थोर माणसाच्या सान्निध्यात राहिल्यास त्याचा मोठेपणा

आम्हाला नाही दिसत. नरेन्द्राचेही असेच झाले. आपल्या गुरुच्या अतिमानवी शक्तीची त्यास साक्ष पटूनदेखील तो घर सोडून, कलकत्त्याहून, गुरुचरणांपासून, दूर जाऊ इच्छीत होता. त्याच्या सा-या आध्यात्मिक आशा आकांक्षा पुरविण्यास गुरुचरण समर्थ होते. ' आपणासारीखे करिती तात्काळ' अशा कोटीतील त्यांचे गुरु होते. पण याची जाण नरेन्द्रास पूर्णपणे झाली नव्हती. आपल्या वर्तमान व भविष्यकाळांना देखील वाटेल ते रुप देण्यास श्रीगुरु समर्थ आहेत. किंबहुना या गोष्टी त्यांनी अगोदरच ठरवून ठेवलेल्या आहेत; आपण काय बोलावे काय करावे याची देखील आखणी त्यांनी आधीच केलेली आहे, हे बिचा-या नरेन्द्राला काय ठाऊक !

नरेन्द्राला निदान आपल्या हयातीत तरी संन्यास नको घेऊ म्हणून गुरुंनी सांगितले. बरे; घरी राहिल्यावर प्रापंचिक जबाबदा-या नको का उचलावयाला ? उत्पन्न घटले आणि खर्चाचे जमेशी व्यस्त प्रमाण होऊ लागले. म्हणजे कशी तिरपीट धांदल उडते, विशेषतः ज्याला समाजात आपली पत राखावयाची असेल त्याची कशी केविलवाणी स्थिती होते, याचा नरेन्द्रास आता अनुभव येऊ लागला ! त्याला यावेळी रामकृष्णांवाचून अन्य कुणाचाच आसरा दिसत नव्हता !

श्रीरामकृष्ण कालीमातेकडे बोलत; तिचा सल्ला घेत, वगैरे गोष्टी नरेन्द्राला ज्ञात होत्याच. पण यावेळी नरेन्द्राच्या मनावर ब्राह्मसमाजाच्या विचारांचा पगडा होता. त्याच्या अन्तर्मनात जरी सगुण ईश्वरावर श्रद्धा होती, त्याचा पिंड जरी सगुण भक्तीचा होता, तरी ब्राह्मसमाजाच्या निराकारवादाने प्रभावित झालेली त्याची बुद्धी साकार देव स्विकारीत नव्हती. त्याच्या बुद्धीस- तार्किक विचारांस- प्रतिकूल परिस्थितीचे तडाखे बसताच ती मूग गिळून बसली, आणि आता त्याच्या अन्तर्मनात शब्द घुमू लागले. क्ष्याला आपल्या हृदयदेवतेचा आवाज ऐकू येऊ लागलाः ' माझे गुरु देवीशी बोलतात. तिला ब्रह्मस्वरुपिणी, चिन्मयी म्हणतात. ती काही पोकळ बडबड नसावी. तेव्हा माझ्यासाठी कालीमातेकडे प्रार्थना करावयास त्यांना विनवावे'.

नरेन्द्राने श्रीरामकृष्णांकडे धाव घेतली. आपले अंतर त्यांच्याकडे उघडले. आपणावर गुदरलेल्या घोर प्रसंगाची त्यांस जाणीव करुन दिली व आपल्या कुटुंबियांची अन्नवस्त्राच्या बाबतीत देखील जी आबाळ होत आहे

तिच्या निरसनार्थ देवीस प्रार्थना करण्यास त्यांना विनविले.

श्रीरामकृष्ण म्हणाले, ' काय सांगू बाळ, तुला ? तुझे क्लेश टळावे म्हणून आईला मी कितीतरी विनवण्या केल्या. पण तू आपला आईस मानीत नाहीस; म्हणून तीही दुर्लक्ष करीत असावी. तेव्हा तूच जा आईकडे आज रात्री. आज मंगळवार आहे. आईला नमस्कार कर. जे मागावयाचे असेल ते मागून घे. तुझे मागणे ती अवश्य पुरवील. माझी आई चिन्मयी आहे. तिला असाध्य ते काय? केवळ इच्छामात्रे करुन ती वाटेल ते घडवून आणण्यास समर्थ आहे'.

या आश्वासनाने नरेन्द्राचा जीव खाली पडला. नुसत्या प्रार्थनेने समस्त यातनांचा परिहार होणार ! नरेन्द्र सारा दिवस हीच आशा वागवीत होता. एकदाची रात्र आली. नरेन्दाच्या उत्साहाला उधाण आले होते ! अतीव उत्कंठेने, श्रद्धेने त्याने मंदिरात प्रवेश केला; आणि मूर्तीवर दृष्टी जाताच आपणास काय दिसले- त्या रात्री काय घडले - याचे नरेन्द्र वर्णन करतोः

वर्तलें कोण तें नवल मुखीं तेज दिसे कोमल
नयनीं प्राण जणुं तरळे चैतन्यहि मूर्तित खेळे ।।
लोपली मूर्ति मृण्मयी देखिली देवी चिन्मयी
पडे विसर विश्वाचा आनंद वर्णुं तो कैचा ।।
भाकणें अन्नवस्त्रासी साध्य हो न तें मजसी
मंदिरीं तीनदां जातों परी भक्तिज्ञान याचितों ।।
ही सर्व गुरुंची करणी म्हणुनी त्यांच्या चरणीं
पातलों झणें जाउनी अणि केली तयां विनवणी ।।
' जा अन्नवसन तुम्हांतें मिळेल गरजेपुरतें '
गुरुवच हें ऐकतां शमली सारी चिंता ।।

74

आपल्या जीवनाच्या पूर्वार्धात अश्रुतपूर्व अशा साधना करुन श्रीरामकृष्ण अध्यात्मशक्तीचे एक प्रचंड केन्द्र बनले. साऱ्या प्रमुख धर्मांच्या तत्त्वांचे, तसेच अध्यात्मजगतातील विविध अनुभवांचे त्यांच्यात संमीलन झाले. अनेक युगांच्या, अनेक योगांच्या, अनेक पंथांच्या उच्चनीच थरातल्या साऱ्या साधकांच्या आशा आकांक्षा त्यांच्यात पूर्णत्व पावल्या; फळास आल्या

! म्हणूनच तर एखाद्या प्रचंड लोहचुंबकाकडे लोहचूर्ण आकृष्ट व्हावा तद्वत् श्रीरामकृष्णांकडे नाना साधनपथावरील वाटसरु आकृष्ट होत. या ज्ञानपिपासूंची आर्त मुमुक्षूंची, भवडोहात पोळल्या जाणा-या विपन्न जनांची, श्रीरामकृष्णांच्या चरणी सारखी रीघ लागे; आणि श्रीरामकृष्ण देखील आपल्या निर्व्याज प्रेमाचा अविरतपणे त्यांच्यावर सडा शिंपीत. त्यांचे सारे तपोधन, ज्ञानधन अजाण, अप्रबुद्ध जनतेसाठीच नव्हते का ? ज्या तळमळीपोटी त्यांनी अलौकिक साधना केल्या तीच लोकहिताची तळमळ, तोच आर्तांविषयींचा कळवळा, त्यांना या ज्ञानधनाची पखरण करण्यासाठी आता सतत राबवू लागला.

त्यांच्या वचनामृताचे पान करण्यासाठी आसुसलेले हजारो जीव शेकडो मैलांची वाट तुडवीत श्रद्धाभरल्या अन्तःकरणाने पायीच त्यांच्याकडे येत; आणि अर्थातच श्रीरामकृष्णसुद्धा जीव कोरडा पडेपर्यंत मोठ्या प्रेमाने, कळकळीने तासन् तास त्यांच्याशी बोलत ! स्वामी विवेकानंद म्हणत की दिवसातून वीस वीस तास अविरतपणे आपले गुरुदेव भक्तजनांना उपदेश करीत ! आणि हे केवळ एक दोन दिवस नव्हे ! महिने न् महिने !

अविश्रान्त साधनांनी आधीच नाजूक बनलेल्या त्यांच्या शरीराला हे परिश्रम अत्यंत घातक ठरले. त्यांना असाध्य असा कंठरोग झाला ! अशा परिस्थितीत देखील हे त्यांचे ज्ञानदानाचे सत्र चालूच होते ! त्यात ते कधीच खळ पडू देत ना ! कोणाच जिज्ञासूला, दर्शनेच्छू व्यक्तीला, कधीच मज्जाव नव्हता ! शरीररक्षणार्थ अंमळ विश्रान्ती घेण्यास त्यांना सांगितल्यास, घशास ताण पडू नये म्हणून बोलणे कमी करण्यास त्यांस विनविल्यास, ते म्हणत, ' या देहाची का एवढी काळजी ? एखाद्या माणसाचे त्यायोगे कल्याण होत असेल तर मी असे हजारो देह ओवाळून टाकीन'. एकदा एका गृहस्थाने त्यांना म्हटले, ' महाराज, आपण योगी आहात. आपल्या योगबलाने आपण या रोगाचे निराकरण का नाही करीत ? ' प्रथम या प्रश्नाला त्यांनी उत्तरच दिले नाही. पण तुम्हा तोच प्रश्न विचारण्यात येताच ते म्हणाले, ' मला वाटत होते की तू साधू आहेस; तुला समज आहे. तू सुद्धा सामान्य प्रापचिकांप्रमाणे बोलतोस ? अरे, जे मन एकदा ईश्वरचरणी लावले, ते पुन्हा तेथून या क्षुद्र देहाच्या ठिकाणी आणावे ? हे तुला योग्य वाटते ? .....' अशा प्रकारे आपल्या भेटीसाठी आलेल्याशी बोलण्याचा ते हट्ट धरीत. कधीच

त्यांच्याकडे बोलल्याविना त्यांना धाडीत नसत.

श्रीरामकृष्णांच्या या वाग्गंगेचे आकण्ठ पान केल्याने आनंदाने तुडुंब भरलेले घट ज्यांच्या हृदयात हेलावत आहेत असे भक्त श्रीरामकृष्णांना म्हणतातः

मातेहुनीही स्नेहाळ पित्याहुनी तूं प्रेमळ
कान्तेच्याहुनी कोमल अन्तर तुझें रे ।।
नातरी ही व्यथा कण्ठीं घेउनीया भक्तांसाठीं
तोडण्यासी भवगांठी काया कष्टवीसी ।।
भवताप निवारण्या शांतिजलें शमविण्या
बोधदुग्ध त्यां पाजिण्या किति अधीर तूं रे ।।

75

श्रीरामकृष्ण कण्ठरोगाने आजारी असता त्यांचे एक अति उच्च आध्यात्मिक अवस्था गाठलेले, संत पदवीस पोहोचलेले, गृहस्थ शिष्य त्यांस भेटावयास आले. जगासमोर संन्यास धर्माचा आदर्श ठेवावा म्हणून श्रीरामकृष्णांनी जसे नरेन्द्राचा स्वामी विवेकानंद केले तसेच या गृहस्थांना - डॉ. दुर्गाचरण नाग यांना- त्यांनी गार्हथ्य धर्माचे एक सोज्वल, सजीव प्रतीक बनविले ! साधू नागमहाशयांना श्रीरामकृष्णपरिवारात प्रेमाचे व आदराचे असे अगदीच आगळे स्थान होते.

आपल्या दर्शनास आलेल्या डॉ. दुर्गाचरण नाग यांस श्रीरामकृष्ण म्हणतातः

' किती गांजलों या रोगाने कितिक झालीं भेषजपानें
साध्य न का या तुज घालविणें करशिल का मज बरा? ।।
' तीव्र धरोनी जन उत्कंठा येती येथें परि या कण्ठा
दुर्वार अशा दुःसह व्यथा होतां ना बोलवे ।।
' दुरुनि येती जरी भेटण्या उरीं जोपुनी आस ऐकण्या
बोल येथुनी तरी त्यां जनां असेच का परतूं ? ।।'

76

गुरुसेवेची आपणास अपूर्व संधी मिळाल्याचे पाहून कृतज्ञतेने व प्रेमाने नागमहाशयांचे ऊर दाटून आले. गुरुंची अनुमती मिळाल्यास त्यांचे दुखणे आपणावर ओढवून घ्यावे, या असह्य यातनांतून त्यांस मुक्त करावे

आणि आपल्या कर्तव्यास, इमानास जागावे ही दुर्गाचरणांची मनीषा ! गुरुदेवांचा रोग आपणावर घ्यावयाची कुवत त्यांच्यात होती ! नड होती ती केवळ गुरुंजींच्या अनुज्ञेची. म्हणून-

' हा मी अपुलें करितों काज माझ्यापाशीं असे इलाज '
म्हणत महाशय पुढें सरकले परि त्यां गुरुंनी दूर सारिलें ।।
रामकृष्ण निज मनीं जाणती वसते दुर्गाचरणीं शक्ती
घेऊं अपुला रोग निश्चितीं म्हणुनी निकटूं न तयां देती ।।

77

आश्विन महिन्याची अमावस्या असल्यामुळे (6-11-1885) हा कालीपूजेचा दिवस. ' आज आईची पूजा करावयाला हवी', श्रीरामकृष्ण एका भक्ताकडे म्हणाले. लागलीच भक्तमंडळींनी पूजेची सारी सामग्री गोळा केली व श्रीरामकृष्णांसन्निधच तिची मांडणीही करण्यात आली. दिवस परतला. पूजासमय आला. श्रीरामकृष्ण आता पूजा करणार; त्या पूजेचे दर्शनसुख आपणास आता लुटता
येणार म्हणून सारी मंडळी आशावत आहे. श्रीरामकृष्णांनी त्यांना ध्यान करण्यास सांगितले. सर्वजण ध्यानाला बसले. ध्यान संपले. अजून रामकृष्ण शय्येवरच बसलेले ! पूजेची कोठेच काही चिन्हे दिसेनात !

एवढ्यात गिरीशबाबूंच्या डोक्यात एक कल्पना चमकली :
' गुरुमहाराजांच्या मनात आज आमच्याकडून देवीज्ञानाने आपलीच पूजा करुन घ्यावयाचे असावे ! ' या विचारासरशी त्यांचे हृदय भक्तिभावाने उचंबळून आले. नकळत तोंडावाटे, ' जय रामकृष्ण, जय रामकृष्ण ' असे उद्‌गार निघाले ! देवीसाठी बनविलेला पुष्पहार त्यांनी भावभरे गुरुचरणी अर्पिला ! मग काय ! एकामागून एक, सारेचजण भावविवश होऊन, मोठ्याने जयघोष करीत या जिवंत जगदंबापदी पुष्पाञ्जली वाहू लागले !! त्या घोषाने सारे वातावरण दुमदुमू लागले ! त्या आनंदास अस्मानही थिटे झाले !!

श्रीरामकृष्णांच्या मुखमंडलावर दिव्य कांती झळकू लागली ! रुग्णावस्थेची छाया पार लोपली ! ते गाढ समाधीत आनंदरुप होऊन राहिले होते ! त्यांच्या प्रत्येक लोमकूपातून आनंद जणू ओसंडत होता ! मंडळी भवती देवीचे अनेक स्तव गाऊ लागली ! बऱ्याच वेळाने श्रीरामकृष्ण

देहभूमीवर उतरले. तेव्हा त्यांना नैवेद्य दाखविण्यात आला; व तो प्रसाद सर्वांनी मोठ्या श्रद्धेने, भक्तीने ग्रहण केला. या प्रसंगी श्रीरामकृष्णांना गिरीश घोष देवीज्ञानाने प्रार्थना करतातः

' नरतनु घेउनी जरी दवडिलें जीवन मी वायां
पतित पातकी देवी झालों प्रपन्न तव पायां ।।
आज्ञा बाळपणीं न पाळिल्या आईवडिलांच्या
यौवन आहारीं मम गेलें काम-काञ्चनांच्या ।।
एकहि न दिसे पाप भूवरी जे म्यां नाचरिलें
मुक्तिमार्ग साधाया वा मी मनही नावरिलें ।।
माते मजवरी घे काकुळती अनुतापें तापलों
जाणे न च मी कवण्या पुण्यें तव चरणीं पातलों ।।
नरकमुताचें जलही जेंवी गङ्गौघीं पडतां
पुनीत होई तेंवी हा तव चरणांप्रति येतां ' ।।

78

एवढ्या साधना करुन, अत्यंत दुःसाध्य असे आध्यात्मिक अनुभव मिळवून, नाना पंथातील विविध साक्षात्कार जोडून, साक्षात् कैवल्य स्थितीचा आनंद भोगीत असता देखील श्रीरामकृष्णांना जर शारीरिक व्यथा चुकविता आल्या नाहीत, तर मग या साधनांचे, जपतपांचे प्रयोजन ते काय? शरीर धारण केल्यावर तत्संबधित रोग व भोग साक्षात्कारी माणसाला देखील अटळ असतील तर त्यांचे मरणोत्तर जीवनसुद्धा इतरांच्याहून अधिक सुखकर होईल याची काय निश्चिती ? अशा शंका कित्येकांच्या मनात उद्भवणे शक्य आहे. पण येथे एक गोष्ट आपण ध्यानात ठेवणे अवश्य आहे. श्रीरामकृष्णांसारख्या लोकोत्तरांच्या आणि इतर सामान्य जनांच्या जीवनात, त्यांच्या मनःस्थितीत, गजरजाचे अंतर आहे. एकजण बळेच आपले मन देहाच्या ठिकाणी ठेवतो आणि दुसरा इन्द्रियवश होऊन, अज्ञानाधीन होऊन, प्राकृतिक गुणांनी बद्ध होऊन, असहाय झाल्यामुळे शारीरिक दुःखे भोगीत असतो. श्रीरामकृष्णांसारखे नरोत्तर परोपकारास्तवच देहबंध स्विकारतात, देहभूमीवर आपले मन बळेच आणतात, हे आपणाला त्यांच्या चरित्रातील घटनांवरुन असंदिग्धपणे दिसून येते. उदाहरणादाखल एका प्रसंगाचा येथे उल्लेख करुः

श्रीरामकृष्णांचा कण्ठरोग अजून बरा झाला नव्हता. त्यांना कलकत्त्यामधील काशीपूर बागेत ठेवण्यात आले होते. त्यांच्यासमवेत त्यांच्या लीलासहचरी श्रीसारदादेवी व इतर युवक शिष्य तेथे शुश्रूषेसाठी राहत असत. एके दिवशी त्या बागेत असलेल्या खजुरीच्या झाडाचा रस काढण्यात येत होता. तेव्हा श्रीरामकृष्णांच्या तरुण शिष्यांना तो पिण्याची इच्छा झाली व ते त्या झाडाखाली जमले. बंगल्याच्या वरच्या मजल्यावर आपल्या शय्येवर पडून असलेल्या श्रीरामकृष्णांनी हे पाहिले. त्यांचे शरीर तेव्हा एवढे दुर्बल झालेले होते की कुशी बदलण्यास देखील त्यांना इतरांची मदत घ्यावी लागे ! माताजी (श्रीसारदादेवी) तेव्हा तळमजल्यावर आपल्या खोलीत बसून होत्या. त्यांना दिसले की श्रीरामकृष्ण अत्यंत वेगाने जिन्यावरुन उतरत आहेत ! त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. लागलीच त्या माडीवर गेल्या. अंथरुण रिकामे ! रामकृष्ण जागी नव्हते ! जे कुशी पालटण्याससुद्धा असमर्थ, ते अशा द्रुतगतीने जाऊ शकतात !! त्या आपल्या खोलीत परतल्या. ' कोठे गेले असावे ठाकूर ? ' त्या आपल्याशी विचार करीत आहेत, तोच पुन्हा भर वेगाने श्रीरामकृष्ण पाय-या चढून जात असल्याचे त्यांना दिसले. हा भ्रम असणे शक्य नाही. प्रत्यक्ष चर्मचक्षूंना दिसलेली ही घटना न मानता राहावे कसे ? सारदादेवींना हे गूढ उकलेना. श्रीरामकृष्णांना याविषयी पृच्छा करिता ते माताजींस म्हणाले, ' ही मुले जमली होती तेथे एक भयानक, अति विषारी साप आला होता ! कदाचित् तो सर्वांचा काळ ठरला असता ! त्याला हाकलून पुन्हा येथे न येण्यास मी बजावून आलो !!'

माताजी अवाक् झाल्या ! विस्मयासंगेच विषाद त्यांच्या हृदयात दाटू लागला ! त्यांना पुरेपूर कळून चुकले की स्थूल कायेचा रामकृष्णांवर आता यत्किंचितही ताबा नाही ! ते वाटेल तेव्हा शरीर विसर्जू शकतात ! एवढेच काय ? त्यांच्या इच्छेनेच त्यांच्या ठायी हा रोग राहू शकतो !!

श्रीरामकृष्ण आपल्या शिष्यांस म्हणत, ' केवळ तुमच्यासाठी ही शरीराची खोळ, एवढ्या यातना सोसूनसुद्धा, मी ठेवीत आहे'. त्यांना यातना होत असत हे खरे; पण कोठवर ? ते देहभान ठेवीत तोवरच ! वाटेल तेव्हा त्यांना आपले मन देहापासून अलग करता येत असे ! केवळ स्वेच्छेने ते देहभूमीवर राहात ! नाही तर अशा तीव्र वेदना होत असता ते समाधीत कसे

जाऊ शकले असते ? एखाद्या क्षुल्लक दुखण्याने देखील आपल्याला देहापासून मन निवृत्त करणे, ते तत्त्वचिंतनी लावणे, असाध्य होते. मग रामकृष्णांना तर दुर्धर असा रोहिणी रोग जडला होता. त्यांना असह्य यातना होत होत्या. तरी समाधी साधणे त्यांना कसे बरे शक्य झाले ?

या प्रश्नाला एकमेव उत्तर म्हणजे श्रीरामकृष्णांचे मन देहापासून सहज अलग होऊ शकत असे ! वाटेल तेव्हा देहाच्या खोळीत शिरावे व वाटेल तेव्हा तिच्यातून निसटावे ही त्यांची अजब क्रीडा होती ! वस्तुतः ते देहातींतच होते- मुक्त होते. जनहितास्तव देहज्ञान वागवीत तेव्हाच त्यांच्यात देहधर्म भासत. वास्तविक ते शारीरिक सीमांनी वा दोषांनी अस्पृष्ट होते. कारण-

कण्ठीं वेदना असती तरीही निशिदिनिं वदती
येती त्यां भक्तांप्रति कसे हे यती ।।
यातना होती असह्य तरी साधती ते लय
सांडुनी संज्ञाही बाह्य हें कसें घडे ।।
वेदना न त्यां होती गुणातीत त्यांची मति
देहस्थिति वागविती स्वयं हे बळें ।।

79

एक जानेवारी, 1886. गिरीश घोष वगैरे मंडळी काशीपूर येथे एका झाडाखाली बसून बोलत आहेत. इतक्यात श्रीरामकृष्ण
तेथे येऊन पोहोचले व गिरीशबाबूंना म्हणाले, ' गिरीश, माझ्या मध्ये तू असे काय पाहिले आहेस की तू ज्याला त्याला या गोष्टी (मी अवतार आहे वगैरे) सांगत सुटतोस ? या एकाएकी विचारण्यात आलेल्या प्रश्नाने गिरीश यत्किंचित्ही गोंधळले नाहीत ! तत्क्षणीच ते उठले व श्रीरामकृष्णांच्या चरणांपाशी गुडघे टेकून अतीव आदराने व भक्तीने म्हणाले,

ज्याच्या अंशें येई जगीं अवतार तेंची परात्पर ब्रह्म तुम्ही ।।
निराकारासीही तुमचें हें तन अद्‌भुत कोंदण वसवीतसे ।।
व्यास वाल्मीकांची वाचा पांगुळली वर्णीतां जयासी तेची तुम्ही ।।
सगुण- निर्गूणांचेंही अधिष्ठान ऐसें हें निर्वाण ध्यान तुमचें ।।

80

गिरीशबाबूंचे हे उत्तर ऐकताच श्रीरामकृष्णांना गाढ समाधी लागली,

त्यांच्या मुखमंडलावर अलौकिक तेज विलसू लागले ! ते पाहून गिरीशचंद्रांच्या भक्तीला उधाण आले ! ' जय रामकृष्ण, जय रामकृष्ण ! असा घोष करीत त्यांनी गुरुमहाराजांची पदधूली मस्तकी धारण केली.

एवढ्यात श्रीरामकृष्ण अर्धबाह्य स्थितीत अवतरले. त्यांच्या वदनावर दिव्य स्मित झळकू लागले. भवती उभ्या असलेल्या भक्तांना ते म्हणाले, ' तुम्हा सर्वांना चैतन्य प्राप्त होवो ! ' हे आशीर्वचन ऐकताच समस्त भक्तांच्या अंतरातून आनंदाची एक प्रचंड लाट उठली ! त्या आनंदाबरोबरच रामकृष्णनामाचा जयध्वनी सा-या परिसरात घुमू लागला ! कोणी रामकृष्णचरणी दंडवत घालताहेत ! कोणी पदधूली घेताहेत; तर कुणी फुले वाहात आहेत ! ए ून आनंदाची लयलूट !!

आज (1 जानेवारी, 1886) श्रीरामकृष्ण प्रत्यक्ष कल्पतरु बनले होते ! नव्हे; कल्पतरु म्हणणे देखील त्यांना उणेपणा आणणेच होईल. कारण कल्पतरु केवळ कामनाच पुरवितो. पण आज श्रीरामकृष्णांनी कोणत्याही कामनांचा उद्‌भवच होऊ न देणा-या अशा सर्वग्रासी आनंदाचे दान केले ! काही महाभागांच्या हृदयमंदिरात हा आनंद चिरंतन सुखाची निष्कंप ज्योत होऊन राहिला !! कोण अद्‌भुत लीला ही ! जो जो त्यांचे चरणरज घेई, त्यास विरज आनंद प्राप्त होई; उच्च आध्यात्मिक अनुभूती मिळे; एवढेच काय, त्याच्या मनात स्थायी सुखाचा घट वसविला जाई ! हे सारे श्रीरामकृष्णांनी केवळ स्पर्शाने घडवून आणले ! या अलौकिक घटनेच्या पुण्य स्मरणार्थ जानेवारीचा पहिला दिवस रामकृष्णभक्त ' कल्पतरु दिन ' म्हणून मोठ्या आदराने व उत्साहाने पाळतात.

या अध्यात्मशक्तीसंतर्पण प्रसंगी भावापन्न होऊन कोणी एक हसू लागला, कोण रडू लागला; कोण ध्यानमग्न होऊन बसला तर कोणी आपणास इष्टदर्शन झाल्याच्या आनंदात गाऊ लागलाः

जगीं संत असती फार चमत्कार करिती थोर
परी आत्मसाक्षात्कार घडविती न ते ।।
वासना ते वाढवीती वैराग्या न बाणवीती
चमत्कारें इच्छापूर्ती करुनी जनांची ।।
संगें ज्यांच्या काम झडे देवदर्शनही घडे
सुटे संसाराचें कोडें संत ते खरे ।।

अशांचा शिरोवतंस रामकृष्ण परमहंस
बकाचाही बनवी हंस आपुल्या बळें ||
आशीर्वचनें आणि स्पर्शें उघडी दार चैतन्याचें
भाण्डार ब्रह्मानंदाचें मोकळें करी ||
अनादी जन्मांचें जाण अखिल मानवांचें पुण्य
फळा येई रामकृष्णरुपें आजी ||

81

भारतीय संस्कृतीचा पाया रामायण व महाभारत या ग्रंथ-याने रचला असे मानण्यात येते. रामायणाची कथा श्रीरामाच्या जीवनाच्या धाग्यादो-यांनी विणलेली दिसते तर महाभारतातील मध्यवर्ती व्यक्ती म्हणजे अतिमानव श्रीकृष्ण असे गणले जाते. राम हा कामाचा काळ ! रामाचे जीवन म्हणजे काम जिंकण्याची शिकवण ! तस्मात् रामायणाचा संदेश एवढाच की ' कामावर विजय संपादा व रामधाम गाठा. ' तसेच श्रीकृष्णाच्या निष्काम कर्माचा, परहितरत जीवनाचा आम्हापुढे आदर्श ठेवून, सत्तेच्या व राज्याच्या लोभामुळे पांडवांचा कसा निःपात झाला हे दाखवून, श्रीमन्महाभारत आम्हाला लोभत्यागाचीच दीक्षा देते; आणि श्रीरामकृष्णांच्या शिकवणीचे तर ' काम- काञ्चन त्याग' हेच पालुपद होते. भारतीय संस्कृतीचीच नव्हे तर सर्व- धर्मांची उभवणी ' कामकाञ्चन त्यागाच्या ' मूलाधारावरच झाली आहे.

' कामिनी व काञ्चन ' किंवा ' मोह व लोभ ' म्हणजेच सर्व-दुःखप्रसवा माया. हे विश्व ' सत्, चित्, आनंद, नाम व रुप ' असे पंचलक्षणात्मक असल्याचे सांगण्यात येते. यातील आद्यत्रितय परमात्म्याचे लक्षण होय व नंतरचे दोन मायेचे आविष्कार होत. यापैकी ' नाम ' (याचा अर्थ विषयांचे चिंतन-जे शब्दरुप असते असा करावा.) लोभ उत्पन्न करते व ' रुप ' (याचा अर्थ चित् (ज्ञान)स्वरुप ब्रह्माला झाकाळणारे पदार्थांचे ' आकार ' असा करावा.) मोह पाडते. ' रुप ' आपल्या अन्तरी असणा-या अरुप सच्चिदानंदाला छपवून निराळेच काहीतरी दाखविते ! ज्याने लोभ, मोह जिंकले त्याने नामरुपात्मक माया जिंकली ! तो परमात्मरुप झाला ! लोभ व मोह यांची गट्टी फार. ते एकमेकांना सोडून कधीच राहावयाचे नाहीत. नाम-रुप जसे विभक्त होत नाहीत तसेच हे. नामरुपांची सत्ता तोवरच की जोवर सच्चिदानंदाचे दर्शन घडत नाही ! सच्चिदानंदाचे ज्यास

दर्शन घडले, तो नामरुपांच्या तावडीतून निसटला- मुक्त झाला.

मुक्त पुरुषांना नामरुपात्मक जग दिसत नाही का ? दिसते; पण ते त्यांना मोह पाडण्यास अक्षम असते; कारण ब्रह्ममयी दृष्टीने विद्ध झालेली नामरुपे तेव्हा हतबल होतात; मोह पाडण्याची त्यांची शक्ती तेव्हा नष्ट होते. मोह व लोभाचे कार्य म्हणजे मानवी मनात ' मी व माझे ' पणाचे बी पेरणे आणि त्यातून अंकुरणा-या संसाररोपाची मशागत करणे ! ज्ञानी जनांना अन्तर्बाह्य व्यापून राहिलेले सर्वगत, सच्चिदानंद ब्रह्मच दिसत असल्यामुळे, ' मी व माझे ' अशा कल्पना उद्‌भवावयाला वावच उरत नाही. जोवर ' नामरुपे ' सच्चिदानंदाला आच्छादित करतात- छपवितात- तोवर अज्ञानाचा बाजार भरतो. नामरुपांच्या बुडाशी असलेले आनंदस्वरुप ब्रह्म दिसले, म्हणजे मग या जगरुपी पसा-याला फसणार कोण ? जोवर ब्रह्माचे एकरसत्व मोडत नाही तोवर द्वैत उरणे शक्य नाही. आणि जेथे द्वैत नाही तेथे मोह कुणाला व कुणी पाडावयाचा ? समुद्रामध्ये तरंग, तुषार, बुडबुडे, फेस ही सारी जशी एका उदकाचीच अंगे तसे ब्रह्म हे एकमात्र सत्य असून नामरुपात्मक जग त्याचाच आविष्कार होय असा ज्यास युक्ती व अनुभूती यांच्या योगे सम्यक् उमज पडला, तो स्वतःच ब्रह्म झाला असे समजावे ! ' ब्रह्मविद्- ब्रह्मैव भवति ' या मुंडकोपनिषदातील वचनाचा अर्थ हाच.

' मी व माझे ' ही वृत्ती वागविणे म्हणजेच सर्व आपदांना कवटाळणे. ' मी ' असा कोणीच नाही ! देवा, तूच तेवढा सत्य; बाकी सारे असत्य, असे नित्य चिंतन करणे हाच सर्वदुःखनिवारणाचा, आत्मविमोचनाचा उपाय ! ईशनामाचा आम्हाला जप करावयास सांगतात तो याचसाठी; देवा, तूच तेवढा सत्य; तुजवाचून वस्तुतः काहीच नाही. अणुरेणूत तूच भरलेला आहेस ! फार काय ? ' मी ' सुद्धा वास्तविक नाही ! ' मी नि माझे ' हे सर्व तूच ! तूच ' मी ' पणाने माझ्यात स्फुरतोच ! म्हणूनच तर मी तुझे नाव घेतो.' असा भाव मनात वागवीत नामोच्चार करावयाचा असतो; आणि अशा नामोच्चाराने मीपणाच्या अतीत, नामरुपाच्या पलीकडे, जावयाचे असते.

' मी परमात्माच आहे ' या भावनेने आमच्या मनात मूळ घ्यावे; ती दृढ व्हावी, म्हणून आमच्या दिव्यत्वाचा आम्हास साक्षात्कार घडवून देण्यासाठी, परमात्मा, राम, कृष्ण इत्यादी रुपे घेऊन, अवतरत असतो. श्रीरामकृष्णसुद्धा असेच आले होते, असा सर्वसाधारणपणे सर्वांचा विश्वास

होता. पण श्रीरामकृष्णांना दुःसाध्य कण्ठरोग झाल्याचे पाहून नरेन्द्राचे मन क्षणभर चळले ! एकच क्षण; त्याला वाटले, ' आपले गुरुदेव सांगतात की जो राम व कृष्ण झाला, तोच आता या कुडीत रामकृष्ण होऊन आला आहे ! असे असते तर यांना या व्यथा का ? आता, या घटकेला, पुन्हा जर ते तसेच म्हणतील तर ते मी स्विकारीन ! ' हा विचार नरेन्द्राच्या डोक्यात उमटतो न उमटतो, इतक्यात श्रीरामकृष्ण नरेन्द्रावर दृष्टी खिळवून त्यास गंभीर स्वरात म्हणाले, ' अजून संशय ? जो राम, जो कृष्ण होऊन आला, तोच हा रामकृष्ण ! वेदान्ताच्या दृष्टीने नाही हे सांगत ! प्रत्यक्ष !! ' हे गुरुवचन ऐकताच नरेन्द्र गार बसला.

ही घटना 14 ऑगस्ट, 1886 ची. यानंतर दोनच दिवसात सोळाव्या तारखेस, श्रीरामकृष्णांनी आपल्या मायातनूच्या सीमा सांडल्या व असंख्य भक्तांचा उद्धार साधण्यास विराट रुपात प्रवेश केला !

' जो राम, जो कृष्ण झाला तोच हा रामकृष्ण,' असे पुनश्च वाग्दान मिळालेला नरेन्द्र आपल्या गुरुबंधूंना म्हणतो-

' काम लोळवी रावणा लोभ ग्रासी कौरवांना
परी जिंकी राम कामा कृष्ण लोभा उच्चाटी ।।
काम लोभ बली थोर महिमा त्यांचा अपार
सुर नर तैसेहि असुर किंकर त्यांचे सदा ।।
रामकृष्ण या वीरां ताडुनियां मर्दी शिरां
प्रेमें नामोच्चारा करितांही तयाच्या ।।
रामरुपें जो आला तोचि कृष्ण मग झाला
आणि कलिंत अवतरला रामकृष्ण होउनी ।।
श्रीरामाची शुद्ध नीति श्रीकृष्णाची सहजस्थिति
दोन्ही पावति संयुति रामकृष्णतनुंत या ।।'

स्वामी प्रभानंद